उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



दिल्ली कॅपिटल्सने केएल राहुलला १४ कोटींना केले खरेदी



लिलावात ऋषभ पंतने मोडला रेकॉर्ड, ठरला सर्वात महागडा खेळाडू

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ८३ ■ नाशिक, सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# मुख्यमंत्रिपदाचा सस्पेन्स कायम

## शिवसेना गटनेतेपदी शिंदे; राष्ट्रवादी गटनेतेपदी अजित पवार

**मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला रेकॉर्डब्रेक बहुमत मिळाल्यानंतर आता राज्यात सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.काल शिंदे गट शिवसेनेची बैठक पार पडली.यात गटनेतेपदी एकनाथ शिंदे यांची निवड झाली. तर राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी अजित पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मुख्यमंत्रीपदाबाबत अजून निर्णय झालेला नसला तरी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला संघाची पसंती असल्याने त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची चर्चा आहे. दुसरीकडे काल अजित पवार गटाच्या आमदारांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मुख्यमंत्रीपदासाठी पसंती दिली असून, तसा आग्रह धरला आहे. शिवसेनेकडून एकनाथ शिंदे यांनाच कायम ठेवावे, अशी मागणी केली जात आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री कोण होणार? याबाबतचा सस्पेन्स कायम आहे. दिल्लीत याबाबतचा निर्णय होऊ शकतो.**



महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं आहे. महायुतीनं २८८ पैकी २३६ जागांवर विजय मिळवला आहे. भाजपने १३२, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागांवर विजय मिळवला आहे. याशिवाय अपक्ष आणि छोट्या पक्षांच्या पाठिंब्यावर महायुतीकडे २३६ जागांचे संख्याबळ आहे. महायुतीला पूर्ण बहुमत मिळालं असल्यानं घाई न करता व्यवस्थित निर्णय घेऊन सरकार स्थापन केलं जाईल, अशी सूत्रांची माहिती आहे.

महायुतीला पूर्ण बहुमत मिळालं असल्याने घाई न करता व्यवस्थित निर्णय घेऊन सरकार स्थापन केले जाणार आहे. २६ तारखेला जरी या सरकारची मुदत संपत असली तरी एकनाथ शिंदे हे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कारभार पाहणार आहेत. तोपर्यंत राज्यात आणि केंद्रात चर्चा पूर्ण करून /-...४

### मंत्रिपदाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा

महायुतीने २३० जागांवर विजय मिळवला. यामध्ये भाजप १३२ जागा, शिवसेना शिंदे गट ५७ आणि राष्ट्रवादी अजित पवार गट ४१ जागांवर आघाडीवर आहेत. तर अपक्ष-इतर यांना १२ जागा मिळाल्या आहेत. यासोबत महाविकास आघाडीला अवघ्या ४६ जागांवर समाधान मानावे लागले आहे. यात काँग्रेस १६ जागा, ठाकरे गट २० जागा आणि राष्ट्रवादी शरद पवार गट /-...४

**पक्षीय बलाबल**

| | |
|---|---|
| महायुती | २३६ |
| मविआ | ४९ |
| इतर | ३ |
| भाजपा | १३२ |
| शिवसेना (शिंदे) | ५७ |
| राष्ट्रवादी(अजित) | ४१ |
| काँग्रेस | १६ |
| राष्ट्रवादी (शरद पवार गट) | १० |
| शिवसेना (ठाकरे) | २० |
| समाजवादी पार्टी | २ |
| जन सुराज्य शक्ती | २ |
| रा.यु.स्वा. पार्टी | १ |
| रासप | १ |
| एमआयएम | १ |
| सीपीआय (एम) | १ |
| पीडब्ल्यूपीआय | १ |
| राजर्षी शा.वि.आघाडी | १ |
| अपक्ष | २ |



## लाडक्या बहिणींना मिळणार २१०० रुपये

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात महायुतीला मिळालेल्या मोठ्या यशा नंतर आज संध्याकाळी लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवास स्थानी दाखल होत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे औक्षण करून अभिनंदन करत एकनाथ शिंदेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत असे सांगण्यात आले.

या वेळी नीलम गोऱ्हे यांच्या समवेत मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व लाडक्या बहिणींचे अभिनंदन करून आभार मानले, त्याच बरोबर हा लाडका भाऊ सदैव आपल्या पाठीशी उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले असून त्याच बरोबर लाडकी बहिण योजनेचे १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्याचा निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

राज्यात लाडक्या बहिणींनी इतिहास घडविला आहे. लाडकी बहिण योजना सर्वात लोकप्रिय ठरली असून बहिणींमुळे विरोधकांना धडकी भरली व त्यामुळे निवडणुकीत विरोधी पक्षाला धूळ चारली गेली असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. या वेळी लाडक्या बहिणीसाठी सुरु करण्यात आलेल्या योजनाबद्दल सांगत त्यांनी राज्यातील सर्व लाडक्या बहिणींचे आभार मानले आहेत.

## तरुण नेतृत्व उभारणार, घरी बसणार नाही

### शरद पवार : बटेंगे तो कटेंगेमुळे ध्रुवीकरण

सातारा: विधानसभा निवडणुकीत महायुतीला न भूतो न भविष्यती असे महाप्रचंड यश मिळाले. ८६ जागांवर निवडणूक लढवणाऱ्या पक्षाला फक्त १० जागा मिळाल्या. या पराभवानंतर पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी काल अखेर मौन सोडलं. मी घरी बसणार नाही. तरुण नेतृत्व उभे करील. लाडक्या बहिणींबरोबरच योगींच्या घोषणेमुळे मतांचे ध्रुवीकरण झाल्याचे कबूल करत इव्हीएमवर काहींनी संशय व्यक्त केला आहे.परंतु मी माहिती घेऊन त्यावर भाष्य करेल, असे ते म्हणाले.

कराडमध्ये माध्यमांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, काल निकाल लागला अन् आज मी कराडमध्ये आलोय. असा निकाल लागल्यानंतर एखादा घरी बसला असता. पण मी घरी बसणार नाही. आमच्या तरुण पिढीला /-...४



**पराभव मान्य**

राज्य विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठा विजय मिळाला. यात आमचा झालेला पराभव स्वीकरत आहोत. मात्र, आमची अपेक्षा होती तसा निकाल लागला नाही, पण शेवटी लोकांनी दिलेला निर्णय आहे. आमची अपेक्षा होती तसा निकाल नाही लागला, पण हा लोकांचा निर्णय आहे. त्यांनी निकालाचे अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले आणि आम्ही पुन्हा जोमाने कामाला लागू.

## निकालातून आत्मपरीक्षण करू

### सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने दिलेला कौल आम्ही नम्रपणे स्वीकारत असल्याचे सुप्रिया सुळे यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या निकालातून नक्कीच आत्मपरीक्षण करू आणि भविष्यातील सक्षम महाराष्ट्र उभा करण्यासाठी प्रामाणिकपणे लढू. राज्यातील शेतकरी, कष्टकरी,महिला, तरुण तसेच सर्व घटकांसाठी आम्ही कायम लढत



राहू, असे त्यांनी म्हटले आहे.

पराभव झाला असला तरी शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचे विचार पुढे नेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. याच बरोबर त्यांनी निवडणुकीत विजयी झालेल्या सर्वांचे /-...४

## हेमंत सोरेन यांचा २८ ला शपथविधी

### सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होणारे पहिले नेते

**रांची:** झारखंडमध्ये पुन्हा इंडिया ब्लॉकचे सरकार स्थापन होणार आहे. रविवारी इंडिया आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांची मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यामध्ये हेमंत सोरेन यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर त्यांनी राजभवनात जाऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि नवे सरकार स्थापन करण्याचा दावा केला.



राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच सरकारची पुनरावृत्ती होत आहे. आतापर्यंत प्रत्येक निवडणुकीत सरकार बदलत असे. राजभवनाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना हेमंत सोरेन म्हणाले- राज्यपाल संतोष गंगवार यांनी हंगामी मुख्यमंत्र्यांची नियुक्ती केली आहे. २८ नोव्हेंबरला शपथविधी होणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, युती ५ आमदारांसाठी एक मंत्रीपदाचा फॉर्म्युला ठरवू शकते. यामध्ये झामुमोला ६, काँग्रेसला १ आणि आरजेडीला १ मंत्रीपद मिळू शकते. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहू शकतात. /-...४

**आज मनसेची बैठक**

**मुंबई :** राज्यात विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव पत्करावा लागलेल्या मनसेने आज शिवतीर्थावर बैठक बोलावली आहे. मनसेला राज्यात एकही जागा मिळविता आली नाही.मागील वेळेस आलेल्या राजू पाटील यांच्या जागेवरही यावेळी पराभव पत्करावा लागला. तर मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे पूत्र अमित ठाकरे यांचाही माहिममध्ये पराभव झाला. त्यामुळे आज होणाऱ्या बैठकीत राज ठाकरे काय बोलतात? याकडे लक्ष लागून आहे.

## मनसेची पक्ष मान्यता धोक्यात?

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंच्या मनसेला सर्वात मोठा धक्का बसला. यंदा महायुतीचं सरकार येईल आणि मनसेच्या पाठिंब्यानं भाजपचा मुख्यमंत्री होईल, असं भाकित राज ठाकरेंनी वर्तवलं होतं. पण प्रत्यक्षात तसं काहीच घडलं नाही. मनसेचा एकही उमेदवार विजयी झालेला नाही. मागील २ निवडणुकांमध्ये मनसेला प्रत्येकी एक उमेदवार निवडून आणता आला होता. पण यंदा मनसेची पाटी कोरी लागली नाही. त्यांना भोपळाही फोडता



आला नाही. त्यामुळे मनसेची मान्यता रद्द होण्याची शक्यता आहे.

मनसेला निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेली मान्यता रद्द होऊ शकते. मान्यता कायम राखण्यासाठी काही निकष आहेत. मनसे ते निकष पूर्ण करताना दिसत नाही. त्यामुळे निवडणूक आयोग लवकरच त्यांना नोटीस पाठवेल अशी माहिती विधिमंडळाचे माजी प्रधान सचिव अनंत कळसे यांनी दिली. राज्यातील मतदारांची संख्या ९ कोटी ७० लाख इतकी आहे. त्यातील ६ कोटी मतदारांनी यंदा मतदान केलं अशी शक्यता गृहित धरल्यास ८ टक्के मतं मनसेसाठी गरजेची होती. तर त्यांची मान्यता कायम राहिली असती. त्यांना ४८ लाख मतं मिळणं आवश्यक होतं. पण तसं झालं नाही. /-...४

## ज्यांनी मला त्रास दिला ते सगळे साफ झाले

### अशोक चव्हाणांची थोरात-देशमुखांवर टीका

**नांदेड :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मविआत सर्वात खराब कामगिरी काँग्रेसची ठरली. पक्षातील अनेक दिग्गजांचाही दारुण पराभव झाला. यावरुन आता भाजप नेते अशोक चव्हाण यांनी बोचरी टीका केली आहे. काही काळापूर्वी भाजपमध्ये



आलेल्या अशोक चव्हाणांना भाजपने राज्यसभेवर पाठवले, तर त्यांची मुलगी /-...४

## पुन्हा आमरण उपोषण करणार : जरांगे

**अंतरवली सराटी :** विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने महाविकास आघाडीचा पराभव केला. या निवडणुकीमध्ये २३२ विधानसभा मतदारसंघामध्ये महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला. या निवडणूक निकालानंतर मनोज जरांगे पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. यावेळी मनोज जरांगे यांनी मोठी घोषणा केली. नवं सरकार स्थापन झाल्यानंतर पुन्हा आमरण उपोषण करणार



अशी घोषणा जरांग पाटील यांनी केली.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निकालावर प्रतिक्रिया दिली. विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून राज्यामध्ये महायुतीला बहुमत मिळालं आहे. दरम्यान लोकसभेला महाराष्ट्रासह मराठवाड्यात जसा मनोज जरांगे पाटील फॅक्टर चालला तसा या विधानसभेला चालला नाही असं बोललं जात आहे. मात्र मी विधानसभेच्या रिंगणात नव्हतोच तर माझा फॅक्टर कसा चालणार. , असे मनोज जरांगे यांनी सांगितले. तसंच, मराठा /-...४

## मविआला विरोधी पक्षनेते पदही नाही

### राज्यसभेतील संख्याबळही होणार कमी

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत महायुतीचा अभूतपूर्व आणि निर्विवाद एकतर्फी विजय झाला. महायुतीला २३६ जागा मिळाल्या. तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांची धुळधाण झाली. मविआला केवळ ४९ जागांवर समाधान मानावे लागणार आहे. यामध्ये ठाकरे गटाला २०, काँग्रेसला १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला १० आणि मित्रपक्षाला चार जागाच जिंकता आल्या.

महाविकास आघाडीच्या या अपयशामुळे शरद पवार, संजय राऊत आणि प्रियंका चतुर्वेदी यांना पुढील राज्यसभेचा कार्यकाळ देखील मिळणार नाही. महाराष्ट्रातून राज्यसभेत जाण्यासाठी सामान्यपणे ४३ चा कोटा निर्धारित होतो. त्यानुसार महाविकास आघाडीत तेही एका नावावर सहमती झाल्यास केवळ एक राज्यसभा सदस्य निवडून आणता येईल असे समोर आले आहे.



शरद पवारांच्या जागेवरही राष्ट्रवादीला राज्यसभेवर कुणाला पाठवता येणार नाही. शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेस या तीनही पक्षांना एकत्रित मिळून एकच खासदार निवडून देता येणार आहे. त्यामुळे यंदा विधानसभेत विरोधी पक्षनेता तर नसेलच, पण आता मविआचे (इंडी आघाडी) राज्यसभेतील संख्याबळही कमी होणार आहे. राज्यात विरोधी पक्षनेते पदासाठी आवश्यक २८+१ = २९ सदस्यांची संख्या सध्या कोणत्याच विरोधी पक्षाकडे नाही. सत्ता स्थापन करताना एकत्रित येऊन संख्याबळ सादर कराव लागतं. मात्र पक्षनेता निवडताना किमान /-...४

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीला जनमान्यता

### भुजबळ : मनोज जरांगेंनाही लगावला टोला

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. विधानसभा निवडणुका लढवणार अशी घोषणा केलेल्या जरांगे पाटील यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतली. तसेच, तुम्हाला ज्याला निवडून द्यायचंय ते द्या, ज्याला पाडायचे त्याला पाडा अशा शब्दात मराठा समाजाला आवाहन केले होते. आपणही कुणाच्या प्रचाराला जात नाही, किंवा कोणाला पाठिंबा जाहीर केला नाही हेही त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, निवडणूक प्रचाराची मुदत संपत असताना त्यांनी येवल्यात जाऊन सांत्वन दौरा केला होता. या दौऱ्यावेळी मराठा समाज बांधवांशी बोलताना त्यांनी दोघांना पाडा असे आवाहन केले होते. मात्र, विधानसभा



निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार छगन भुजबळ विजयी झाले त्यामुळे, आपल्या विजयानंतर पहिली प्रतिक्रिया देताना त्यांनी थेट मनोज जरांगे यांचे नाव घेऊन टोला लगावला.

छगन भुजबळ यांनी काल माध्यमांशी संवाद साधला. जनतेच्या जनादेशामधून हे स्पष्ट झाले की राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष अजित पवारांचाच आहे. कायद्याच्या दृष्टीनेही हा प्रश्न सुटला असून निवडणुकांत निवडून आलेल्या आमदारांच्या कौलमुळे राष्ट्रवादीबाबत आता लोकांमध्ये संभ्रम राहिलेला नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले.

शरद पवार यांनी माझ्या मतदारसंघात सभा घेतली. अभ्यास करुन त्यांनी माझ्याविरुद्ध उमेदवार दिला. आमचे मित्र जरांगे, त्याचे काय काम होते. त्यांनी तर सांगितले होते की निवडणुकीमध्ये मी पडणार नाही, बोलणार. पण, प्रचार संपण्याच्या आदल्यादिवशी सकाळी १० पासून रात्री २ वाजेपर्यंत /-...४

## महत्त्वाचे

### आयसीए ग्लोबल कॉन्फरन्स आजपासून

**मुंबई:** पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२५ चे संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष लाँच करतील, अशी घोषणा भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाची इफको लिमिटेड आणि आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या १३० वर्षांच्या इतिहासात इफकोच्या पुढाकाराने या ६ दिवसीय जागतिक सहकार चळवळीच्या आयसीए महासभेचे आणि जागतिक सहकारी परिषदेचे आयोजन प्रथमच भारतात करण्यात आले आहे.

### हिंसेशी मोदी, शहांचा संबंध नाही : कॅनडा

**ओटावा :** कॅनडामधील शीख फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्या प्रकरणासह कॅनडामधील गुन्हेगारी जगताशी पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे नाव जोडण्याचे वृत्त चुकीचे आणि काल्पनिक असल्याचे कॅनडाने म्हटले आहे. कॅनडाच्या पंतप्रधानांच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि गुप्तवार्ता सल्लागार नथाली ड्रौइन यांनी या वृत्ताचे खंडन केले. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा दाखला देऊन 'द ग्लोब अँड मेल' वृत्तपत्राने संबंधित वृत्त प्रसिद्ध झाले होते. या अधिकाऱ्याचे नाव वृत्तात दिले नव्हते.

### ज्ञानवापी प्रकरणी मुस्लीम पक्षाला सुप्रिमची नोटीस

**नवी दिल्ली :** वाराणसीतील ज्ञानवापी संकुलाशी संबंधित प्रकरणावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. हिंदू पक्षाने ज्ञानवापीशी संबंधित सर्व १५ खटले अलाहाबाद उच्च न्यायालयात वर्ग करावेत, जेणेकरून त्यांची एकत्रित सुनावणी होईल, अशी मागणी केली आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम पक्षाला नोटीस बजावली आहे. मुस्लिम पक्षाला २ आठवड्यांत उत्तर देण्यास सांगितले आहे.

### मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर गॅस टँकर पलटी

**पुणे:** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर वारजे पुलाजवळ चर्चच्या बाजूला आज सकाळी गॅस टँकर पलटी झाल्याची दुर्घटना घडली. मुंबईहून साताऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या या टँकरला अचानक तोल गमावल्यामुळे हा अपघात घडला. अपघातामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली असून वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. गॅस टँकरमधून गळती होण्याचा धोका असल्यामुळे सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. अपघातस्थळी विशेष टीम पाठवून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.अपघातामुळे मुंबईकडून साताऱ्याच्या दिशेने जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

### छत्तीसगडमध्ये दहा नक्षलवादी ठार

**सुकमा :** छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दहा नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी सुरक्षा दलांच्या कामगिरीचे कौतुक केले असून, बस्तर भागात शांतता आणि प्रगतीचा काळ पुन्हा आल्याची प्रतिक्रिया दिली आहे. भेज्जी पोलीस स्थानकाच्या हद्दीत शुक्रवारी सकाळी चकमकीला सुरुवात झाली. सुरक्षा दलाचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेत सहभागी झाले.

### रुदरफोर्डचे १० षटकांच्या सामन्यातही शतक

**अबू धाबी :** अबू धाबी टी१० लीग स्पर्धेत म्हणजेच प्रत्येकी १० षटकांच्या सामन्यात शतक झळकावण्याची करामत नॉर्दन वॉरियर्स संघाच्या शेरफन रुदरफोर्डने केली. अबू धाबी इथे झालेल्या लढतीत नॉर्दन वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना १४२ धावांची मजल मारली. १४२ पैकी १०३ धावा शेरफन रुदरफोर्डच्या होत्या. शेरफनने ७ चौकार आणि १० षटकारांसह ४० चेंडूत नाबाद १०३ धावांची अविश्वसनीय खेळी केली. शेरफन वेस्ट इंडिजचा असून जगभरात विविध टी२० लीगमध्ये खेळतो.

## महत्त्वाचे

### सदाशिव पेठेत घरफोडी

**पुणे :**

भरदिवसा सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील अमेरिकन डॉलर चोरून नेल्याची घटना सदाशिव पेठेत घडली. चोरलेल्या अमेरिकन डॉलरचे मूल्य भारतीय चलनात एक लाख ५१ हजार ९८५ रुपये आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ महिला सदाशिव पेठेतील सिद्धी हाऊसिंग सोसायटीत राहायला आहेत. १८ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ महिला आणि त्यांचे पती बाराच्या सुमारास नातीला शाळेतून आणण्यासाठी सदनिका बंद करून बाहेर पडले. दुपारी एकच्या सुमारास ते नातीला घेऊन घरी परतले. तेव्हा सदनिकेचे कुलूप चोरट्यांनी तोडल्याचे लक्षात आले. चोरट्यांनी शयनगृहातील कपाटात ठेवलेले १८०० अमेरिकन डॉलर चोरून नेले. भरदिवसा घरफोडी झाल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस उपनिरीक्षक गणेश फरताडे तपास करत आहेत. शहरात गेल्या काही महिनाभरापासून घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली. सोसायटीतील बंद सदनिकांची पाहणी करुन चोरटे ऐवज चोरून नेतात. मुकुंदनगर भागात अडीच लाखांचा ऐवज चोरीला स्वारगेट भागातील मुकुंदनगर परिसरात सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड आणि सोन्याचे दागिने असा दोन लाख ५० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याबाबत जिनेश मोहनलाल ओसवाल (२८, रा. केदार रेसीडन्सी, मुकुंदनगर) यांनी स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ओसवाला कुटुंबीय बाहेर गेले होते. चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून ऐवज चोरून नेला. पोलिस उपनिरीक्षक पूनम पाटील तपास करत आहेत.

### छळामुळे महिलेची आत्महत्या

**पुणे :**

माहेरहून पैसे आणण्याची मागणी करणाऱ्या पतीच्या छळामुळे महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कोंढवा भागात घडली. महिलेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रियंका अक्षय गाडे (वय २७, रा. आनंदनगर, हांडेवाडी, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी पती अक्षय राजेंद्र गाडे (२९ रा. आनंदनगर, हांडेवाडी, हडपसर, मूळ रा. कोतन, ता. पाटोदा, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रियंका यांचे वडील अजिनाथ सीताराम चांदणे (६१, रा. पाटसरा, ता. आष्टी, जि. बीड) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. अक्षयने प्रियंकाकडे माहेरहून पैसे आणण्याची मागणी केली. तिने नकार दिल्याने तो तिला त्रास देत होता. अक्षय तिला मारहाण करायचा. त्याच्या छळामुळे तिने राहत्या घरात गळफास घेऊन नुकतीच आत्महत्या केली. प्रियंकाने आत्महत्या करण्यापूर्वी एका पुठ्ठ्यावर मजकूर लिहून ठेवला होता. त्याच्या छळामुळे आत्महत्या करत असल्याचे तिने पुठ्ठ्यावर लिहून ठेवले होते. सुरुवातीला पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली होती. प्रियंकाच्या वडिलांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर याप्रकरणी अक्षयविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहायक पोलीस निरीक्षक शेटे तपास करत आहेत.

### आर्थिक व्यवहारातून आत्महत्या

**पुणे :**

वराह पालन व्यवसायातील आर्थिक व्यवहारातून एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठेत घडली. व्यावासयिकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एकाविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला. राजा परदेशी (४४, रा. महाराष्ट्र तरुण मंडळाशेजारी, हरकानगर, कासेवाडी, भवानी पेठ) असे आत्महत्या केलेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. याबाबत पत्नी कंचन राजा परदेशी (३८, रा. कासेवाडी, भवानी पेठ) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी लक्कडसिंग याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परदेशी यांचे ताडीवाला रस्ता परिसरात गोदाम आहे. लक्कडसिंग त्यांना वराह पुरवितो, वराहाचे मांस विक्रीचा परदेशींचा व्यवसाय आहे. पावसाळ्यात परदेशी यांच्या गोदामात पाणी शिरल्याने नुकसान झाले. गोदामात ठेवलेल्या दहा लाख रुपयांच्या मालाचे नुकसान झाले.आर्थिक नुकसान झाल्याने परदेशी यांनी लक्कडसिंगला पैसे परत करण्यासाठी वेळ मागितला. तेव्हा लक्कडसिंगने पैसे परत करण्यासाठी तगादा लावून त्यांना शिवीगाळ केली. मुलांचे अपहरण करण्याची धमकी त्याने दिली होती. त्याच्या त्रासामुळे परदेशी यांनी शनिवारी सायंकाळी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. परदेशी यांच्या पत्नीने तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

# ओझरला जनशांती धर्म सोहळा ध्वजारोहण सोहळा

## ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात ११ धर्म ध्वजांचे लक्षवेधी ध्वजारोहण



**ओझर : वार्ताहर**

**कठोर तपस्वी निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या ३५ व्या पुण्यस्मरणा निमित्त ओझर आश्रमात जनशांती धर्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य-दिव्य धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण पालखी मिरवणुकीनंतर उत्तराधिकारी अनंत विभूषित महामंडलेश्वर सद्गुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अनेक साधू संत व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात.. पुष्पृष्टी व फटाक्यांची आतषबाजी करत जय बाबाजी अशा प्रचंड गगनभेदी जयघोषात जनशांती धर्म सोहळ्याचे ११ ध्वजाचे ध्वजारोहण करत लक्षवेधी सोहळा झाला.**

निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या ३५ व्या पुण्यतिथी निमित्त ओझर येथील देवभूमी जनशांती धाम येथे उत्तराधिकारी अनंत विभूषित महामंडलेश्वर स्वामी शांतीगिरिजी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत गुरुवार दिनांक ५ ते १२ डिसेंबर दरम्यान जनशांती धर्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्या दरम्यान जनशांती धामातील विविध मंदिरांवर लखलखीत सुवर्ण कलशांची स्थापना तसेच मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार आहे.या भव्य दिव्य सोहळ्याचे ध्वजारोहण मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.कार्यक्रमाच्या प्रारंभी ओझर येथील मारुती वेस येथील हनुमान मंदिर व नागेश्वर महादेव मंदिर येथून विधिवत पूजन करत श्रीफळ वाढवून श्रीबाबाजींची सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

त्यात धर्मध्वज व कशाधारी महिला,कुमारिका व भाविक सहभागी झाले होते. मिरवणुकी दरम्यान अनंत विभूषित महामंडलेश्वर सद्गुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांची उपस्थिती लाभल्याने भाविकांचा उत्साह वाढला. मिरवणुकी नंतर ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात.. पुष्पृष्टी व फटाक्यांची आतषबाजी करत जय बाबाजी अशा प्रचंड जयघोषात जनशांती धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.यावेळी भक्त परिवारातील काही निवडक भाग्यवान भाविकांच्या हस्ते ११ धर्म ध्वजाचे लक्षवेधी ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी उपस्थितांना ५ डिसेंबर पासून ओझर आश्रमात होणाऱ्या जनशांती धर्म सोहळ्याची माहिती देण्यात आली. हजारो भाविकांच्या उपस्थितीत होणाऱ्या या लक्षवेधी धर्म सोहळ्या प्रसंगी महाजपानुष्ठान,१०८ कुंडात्मक कार्यसिद्धी महायज्ञ, अखंड नंदादीप, महाअभिषेक पूजन, हस्त लिखित नामजप, नामसंकीर्तन, भागवत पारायण, रोज पहाटे ब्रह्म मुहूर्तावर नित्य नियम विधी, आरती, सत्संग ,भागवत वाचन, श्रमदान यांसह विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जय बाबाजी परिवाराच्या वतीने देण्यात आली.कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्र संपन्न विलासशास्त्री कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन नागेश्वरानंद महाराज यांनी केले.ध्वजारोहण सोहळ्या प्रसंगी स्वामी परमेश्वरानंदगिरीजी महाराज, स्वामी कैवल्यानंदगिरीजी महाराज, स्वामी जनेश्वरानंदगिरीजी महाराज, स्वामी कमलानंदगिरीजी महाराज, कैलासगिरीजी महाराज, नागेश्वरानंद महाराज, अवधेशानंद महाराज, देवानंद महाराज, अविरमुक्तेश्वरानंद महाराज, श्रीपादानंद महाराज, ऋग्वेदानंद महाराज,माधवानंद महाराज, रवींद्रानंद महाराज, पांडुरंगानंद महाराज, पिनाकेश्वरानंद महाराज यांसह आश्रमीय संत, भक्त परिवाराच्या विविध संस्थांनचे प्रमुख पदाधिकारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान धर्म ध्वजांच्या ध्वजारोहणाने संपूर्ण आश्रम परिसर भगवामय झाला होता.उपस्थित भाविकांनी अनंत विभूषित महामंडलेश्वर सदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी केली.



# तीन दिवसांत शबरी नॅचरल्सची लाखोंची उलाढाल

## कृषीथॉन महोत्सवात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक : प्रतिनिधी**

**राज्यभरातून आदिवासी बांधवांनी बनविलेल्या प्रीमियम उत्पादनांना व्यासपीठ देणाऱ्या शबरी नॅचरल्सला नाशिकमध्ये भरघोस प्रतिसाद मिळत आहे. ठक्कर डोम येथे आयोजित कृषीथॉन महोत्सवात तीन दिवसांत लाखोंची उलाढाल झाली आहे. आदिवासी बांधवांच्या या प्रीमियम उत्पादनांना मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे त्यांचे जीवनमान नक्कीच उंचावणार आहे. नाशिककरांनी ही उत्पादने विकत घ्यावी आणि वापरून बघावी, असे आवाहन शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या मा. व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी केले आहे.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या वतीने राज्यभरातील आदिवासी बांधवांच्या शेतकरी उत्पादक संघटनांना निधी पुरवून त्यांना लाभ मिळेल या हेतूने वित्त पुरवठा करत असते. त्यांना बाजारपेठ मिळवून देणाऱ्या शबरी नॅचरल्स या नव्या ब्रँडखाली उत्पादने घेऊन आले आहे. शहरामध्ये ठक्कर डोम येथे आयोजित कृषीथॉन महोत्सवात शबरी महामंडळाच्या वतीने आदिवासी बांधवांच्या प्रीमियम उत्पादनांसाठी स्टॉल उभारण्यात आले आहे.

या उत्पादनांना गेल्या तीन दिवसात नाशिककरांनी भरघोस प्रतिसाद दिला असून लाखो रुपयांची उलाढाल झाली आहे. यामुळे आदिवासी बांधवांना आर्थिक फायदा होत आहे. आदिवासी भागातील पूर्णपणे नैसर्गिक असलेले उत्पादनांमध्ये वरई, रागी, रागी कुकीज, हातापासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, बांबू पासून हाताने बनविलेल्या प्रकाशाच्या माळा, थेट शेतातून आलेला तांदूळ, विविध फुलांपासून तयार झालेले मध तसेच मोहाच्या फुलापासून बनविण्यात आलेले लाडू, चॉकलेट्स, मोहाचे तेल, मोहाचे सिरप, मोहाचा साबण यांचा समावेश आहे. सोमवार पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवामध्ये सर्वच नाशिककरांनी सहभागी व्हावे, असे देखील व्यवस्थापकीय संचालक बनसोड यांनी सांगितले आहे.

**मोहाची वाईन ठरतेय आकर्षणाचा केंद्रबिंदू**

आदिवासी बांधवांसाठी कल्पवृक्ष अशी ओळख असलेल्या मोहाच्या फुलापासून मोहाची या ब्रँड अंतर्गत शबरी महामंडळाच्या वतीने तयार करण्यात आलेली आहे. देशात सर्वप्रथम अशी वाईन तयार झाल्यानंतर सर्वप्रथम कृषीथॉन महोत्सवातच उपलब्ध असल्याने संपूर्ण महोत्सवात मोहाची वाईन आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# विकासाच्या मुद्यांवर छगन भुजबळ यांचा विजय

**येवला :**

**संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या येवला विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार छगन भुजबळ यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. माणिकराव शिंदे यांचा पराभव करून मंत्री भुजबळ यांनी २६ हजार ४०० मतांनी विजय मिळविला मतदार संघातील जनतेने विकासाच्या मुद्यांवर पुन्हा पाचव्यांदा भुजबळ यांना आमदार केले.**



**येवला निवडणूक विश्लेषण**

**विलास पगारे**

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत चुरस वाढल्याने भुजबळ यांना निवडून येण्यासाठी मोठी कसरत करावी लागली परंतु मतदान संघात केलेला विकास बघता जनतेने भुजबळ यांना पुन्हा पसंती देत आमदार केले निवडणुकीत ओबीसी, मुस्लिम, दलित, आदिवासी, भटके, तसेच काही प्रमाणात मराठा समाज, तसेच इतर काही समाजातील समाज बांधव मंत्री भुजबळ यांच्या बरोबर होते.

तसेच लासलगाव आणि परिसरात विकास हा मुद्दा लोकांनी डोळ्यासमोर ठेऊन भुजबळ यांना मतदान केले तर मतदार संघात भुजबळ यांनी विकासाच्या मुद्यांवर येवला शहरात तसेच लासलगाव परीसरातील विविध ठिकाणी सभा, प्रचार रॅली, घेवून आपण केलेला विकासाची आठवण करून दिली. त्यामुळे भुजबळ यांना मतदार संघातील जनतेने विधानसभेत पाठवले भुजबळ यांच्या विरोधात मतदारसंघात मनोज जरांगे यांचा फॅक्टर चालेल असे वाटत असताना या फॅक्टर चा काहीच परिणाम झाला नाही. या उलट मतदार संघातील जनतेने भुजबळ यांना साथ दिली भुजबळ यांच्या बरोबर असलेले मराठा समाजाचे नेते माजी आमदार कल्याणराव पाटील, सहकार नेते अंबादास बनकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष साहेबराव मढवई, वसंतराव पवार, शेवाळे माऊली, मोहन शेलार, यांनी साथ दिल्याने भुजबळ यांना सहकार्य मिळाले तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, माजी नगराध्यक्ष हुसेनभाई शेख, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, बाळासाहेब लोखंडे, युवा नेते मकरंद सोनवणे आदींनी भुजबळांचा प्रचार करीत त्यांना विजयात बळ मिळवून दिले.

भुजबळ यांनी येवला मतदार संघात विविध प्रकारची विकास कामे केली आहेत. त्याचबरोबर रस्ते, शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सेनापती तात्या टोपे यांच्या स्मारकाचे काम पूर्ण केले आहे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम सुरु आहे तसेच इतर विकासाची कामे मार्गी लागल्याने मतदार संघातील केलेला विकास जनतेच्या मनात आजही घर करुन आहे.

भुजबळ यांनी केलेल्या विकासाला साथ म्हणून जनता बरोबर असल्याचे चित्र निवडणुकीत दिसुन आले त्यामुळे भुजबळ यांना निवडणुकीत आपला विजय मिळविण्यात यश मिळाले. निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मराठा समाज ॲड. माणिकराव शिंदे यांच्या बाजूने उभा राहिला तसेच मुस्लिम, दलित, आदिवासी, इतर समाजाने शिंदे यांना साथ दिली. त्यामुळे शिंदे यांना एक लाखाच्या वर मताधिक्य मिळाले. निवडणूक म्हटली जय-पराजय असतो मात्र यानिमित्ताने निवडणूक चुरसीची झाली.

**महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. शिंदे यांना एक लाखाच्या वर मताधिक्य**

येवला विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार छगन भुजबळ, आणि महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. माणिकराव शिंदे यांच्यात चुरसीचा सामना पहावयास मिळाला या निवडणुकीत मंत्री भुजबळ यांना १ लाख ३५ हजार,२३ मते मिळाली तर ॲड.शिंदे यांना१ लाख ८ हजार ६२३ मते मिळाली असुन भुजबळ यांनी २६ हजार ४०० मतांनी ॲड. शिंदे यांचा पराभव केला परंतु असे असले तरी ॲड. माणिकराव शिंदे यांनी एक लाखांच्या वर मताधिक्य घेतल्याने त्यांची राजकीय ताकद वाढल्याचे दिसुन आली



# शहापुरात महायुतीच्या दौलत दरोडांचा विजय

**शहापूर :**

**१३५ शहापूर (अ.ज.) विधानसभा मतदारसंघात झालेल्या अटीतटीच्या लढतीत महायुतीचे दौलत दरोडा हे ७३ हजार ८१ मते मिळवत १ हजार ६७२ मतांनी विजयी झाले आहेत तर महाविकास आघाडीचे उमेदवार पांडुरंग बरोरा यांना ७१ हजार ४०९ मते मिळाल्याने त्यांचा निसटता पराभव झाला आहे.**

या निवडणुकीत ते दोन नंबर वर राहिले आहेत तर जिजाऊ संघटनेच्या रंजना उघडा यांनी कडवे आव्हान देत तब्बल ४२ हजार ७७६ मते मिळवून त्या तीन नंबरला राहिल्या.दरम्यान ४ हजार ८७२ मतदारांनी नोटाचे बटन दाबून आपली नापसंती व्यक्त केली.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे दौलत दरोडा यांन ७६ हजार ५३ मते मिळवून ते विजयी झाले होते. तर शिवसेनेतून उमेदवारी लढवलेले पांडुरंग बरोरा यांना ६० हजार ९४९ मते मिळाली होती.१५ हजार १०४ मतांनी पांडुरंग बरोरा यांचा पराभव झाला होता.

२०२४ च्या शहापूर विधानसभा मतदारसंघात २ लाख ८५ हजार इतकी मतदार संख्या असून यापैकी २ लाख ५ हजार ४१० मतदारांनी हक्क बजावून ७०.५७ टक्के इतके मतदान झाले.या मतदार संघात ३२९ मतदान केंद्रावर मतदान शांततेत पार पडले.निवडणूकीचे काम सुरळीत पार पडण्यासाठी सहकार्य केलेल्या पोलिस प्रशासनासह सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा शहापूर तहसीलदार परमेश्वर कासूळे यांनी कौतुक केले.

**पोस्टल मते कोणाकडे?**

२०२४ मधील विधानसभेच्या निवडणुकीत पोस्टल मतदारांनी पांडुरंग बरोरा यांना पसंती दिली असल्याचे दिसून आले. यामध्ये महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पांडुरंग बरोरा यांना ६७३ पोस्टल मते मिळाली. महायुतीचे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे दौलत दरोडा यांना ३०६ मते तर अपक्ष उमेदवार रंजना उघडा यांना २६८ मते मिळाली.

**पोलिस प्रशासनाचा चोख बंदोबस्त**

१३५ शहापूर (अ.ज.) विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.मतदान झाले त्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याने पोलीस प्रशासनाचे समाजमाध्यमातून कौतुक केले जात आहे. डीवायएसपी मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १७ पोलिस अधिकारी,२७५ पोलीस कर्मचारी व २५० होमगार्ड प्रामाणिकपणे कर्तव्य बजावतांना दिसून येत होते.

**उमेदवार व त्यांचे मतदान**

१) महायुती दौलत दरोडा ७३ हजार ८१ मते.
२)आघाडी पांडुरंग बरोरा ७१ हजार ४०९ मते.
३)बसपा यशवंत वाख२ हजार १८९ मते.
४) मनसेचे हरिश्चंद्र खंडवी ५ हजार ६०९ मते.
५)अपक्ष अविनाश शिंगे ९५५
६)अपक्ष गणेश निरगुडे ४७५

दरम्यान दौलत दरोडा हे टपाली मतदानासह १६७२ मतांनी विजयी झाले आहेत.

# महाराष्ट्र योगशिक्षक संघातर्फे राज्यस्तरीय संमेलन, योगासन स्पर्धा बक्षीस वितरण

**चांदवड : वार्ताहर**

**योग फाउंडेशन संचालित महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या वतीने महायोगोत्सव २०२४ पुणे निमित्ताने राज्यस्तरीय भव्य ऑनलाईन योगासन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. विविध वयोगटातील महिला व पुरुषांनी यात सहभाग नोंदवला, ज्यामध्ये स्पर्धकांनी आपल्या योग कौशल्यांचे प्रदर्शन करत योगाचे महत्त्व अधोरेखित केले. सदर स्पर्धा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष, क्रीडा समिती व स्पर्धा प्रमुख राहुल (अंबादास) भिलाजी येवला व तांत्रिक अधिकारी मनाली देव यांच्या मार्गदर्शखाली घेण्यात आल्या.**





**चांदवड : राज्यस्तरीय योगासन स्पर्धा बक्षीस वितरण प्रसंगी राज्य क्रीडा समिती व स्पर्धा प्रमुख राहूल बी. येवला, तांत्रिक सहायक मनाली देव, राज्याध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, सचिव शरद बजाज, नियोजन समिती प्रमुख सदानंद वाली, पुणे जिल्हाध्यक्ष चंद्रज्योती दळवी सर्व विजेते स्पर्धक आदी.**

या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांचे वयोगटानुसार वर्गीकरण करण्यात आले होते. सब-ज्युनिअर: वय १०+ ते १५ वर्षे, ज्युनिअर : वय १५+ ते २१ वर्षे, सिनिअर: वय २१+ ते ३० वर्षे, सिनिअर : वय ३०+ ते ४० वर्षे, सिनिअर : वय ४०+ ते ५० वर्षे, सिनिअर : वय ५०+ ते ६० वर्षे, सिनिअर : वय ६० वर्षांच्या पुढे या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून ४१८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक वयोगटातील विजेत्या स्पर्धकांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय व रोख रक्कम, सन्मान चिन्ह, व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच, दोन उत्तेजनार्थ खेळाडूंना विशेष मेडल आणि प्रमाणपत्र देण्यात आले. सर्वात जास्त मेडल घेणारा सर्वोत्कृष्ट मान ठाणे जिल्हा संघाला चॅम्पियन ट्रॉफी देण्यात आली तर सर्वात जास्त सहभाग नाव नांदणीसाठी अकोला जिल्ह्याला उत्कृष्ट जिल्हा म्हणून ट्रॉफी देऊन सन्मानित देण्यात आले. बक्षीसांचे वितरण समारंभ दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी मुंबई फूटवाला धर्मशाळा, धरिवाल सभागृह, माऊली मंदिरासमोर, आळंदी देवाची, पुणे येथे करण्यात आला.

सर्व स्पर्धकांना रोख रक्कमचे बक्षीस श्री निखिलेश्वरानंद योग विद्यालय, (एनआयओएस) राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्थान, गोंदियाच्या संचालिका कु. सुमतीताई किसान डोलारे (जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र योगशिक्षक संघ गोंदिया) यांच्याकडून देण्यात आले तसेच पुण्याचे योगशिक्षक मिलिंद सरदार व ऋषिकेश गावडे, सन्मानचिन्ह देण्यासाठी सहकार्य केले. त्याचप्रमाणे या स्पर्धेसाठी महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे टेक्निकल डायरेक्टर सतीश मोहगावकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच स्पर्धा परीक्षकांचे (पंचांचे) सहकार्य लाभले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य क्रीडा समिती व स्पर्धा प्रमुख राहुल (अंबादास) भिलाजी येवला व तांत्रिक अधिकारी मनाली देव, प्रज्ञा अबोटी, क्रीडा समिती सदस्य, मोहन कवठेकर, चाली राजा, नितीन खैरनार, तानाजी पाटील, राहुल सांडभोर, आरुषी शिंगोटे, गौरी पाटील, उज्वला गायकवाड, धनश्री पाठक, स्मिता बनकर, पल्लवी तापकीर, रिया यादव आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरुषी शिंगोटे, यांनी केले. प्रमुख अतिथींचा परिचय गौरी पाटील यांनी करून दिला तर मंदार भागवत यांनी आभार मानले.

यावेळी प्रमुख अथिती म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, राज्य नियोजन समिती अध्यक्ष सदानंद वाली, कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, सचिव शरद बजाज, सदस्य विनायक बारापात्रे, चंद्रकांत अवचार, कृणाल महाजन, उत्तमराव अहिरे, अशोक पाटील, राहुल (अंबादास) येवला, अर्जुन शिंदे, पुणे जिल्हाध्यक्ष चंद्रज्योती दळवी, डॉ. शिवांगी पांडे, गोंदिया, मिलिंद सरदार, ऋषिकेश गावडे, योगशिक्षक पुणे उपस्थित होते. त्याचप्रमाणे बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी राज्य व जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते, स्पर्धक, पालक व मार्गदर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा व कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संघटनेच्या संचालक मंडळ, राज्य, विभाग, व जिल्हा पदाधिकारी, योगशिक्षक, कार्यकर्ते तसेच स्पर्धक, पालक, मार्गदर्शक आदींनी अभिनंदन व्यक्त केले.

गांवकरी



## महत्त्वाचे

### पोलिस प्रशिक्षण केंद्रातून तोतया पोलिसाला अटक



**दौंड** - नानवीज (ता. दौंड) येथील राज्य राखीव पोलिस दलाच्या प्रशिक्षण केंद्रात पोलिस दलातील चालक असल्याची बतावणी करून वावरणार्या एका तोतया पोलिसाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तोतया पोलिसाने प्रशिक्षण केंद्राचे व्हिडिओ चित्रीकरण केल्याने त्याच्या हेतूची चौकशी केली जात आहे..पुणे जिल्ह्यातील दौंड पोलिस ठाण्याचे निरीक्षक गोपाळ पवार यांनी या बाबत माहिती दिली. जय राजेंद्र यादव (वय-२५, रा. विर्शी, ता. भातकुली, जि. अमरावती) या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ नोव्हेंबर रोजी दुपारी जय यादव या तरूणाने नानवीज येथील राज्य राखीव पोलिस दलाच्या प्रशिक्षण केंद्राच्या प्रवेशद्वारावर पोलिस दलात चालक असल्याचे सांगत प्रवेश मिळविला. राज्य पोलिस दलाचे बोधचिन्ह असलेले शारीरिक प्रशिक्षणाचे टी शर्ट व पॅण्ट असा पेहराव करीत त्याने केंद्रात प्रवेश केला..दरम्यान जय यादव याने त्याच्याकडील मोबाइल संचात प्रशिक्षण केंद्राच्या आवारातील इमारती, कार्यालये व मैदानाचे छायाचिक्षण करीत व्हिडिओ चित्रण देखील केले. राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या आत व्हिडिओ चित्रण सुरू असल्याने व जय यादव याचे वर्तन शंकास्पद असल्याचे लक्षणात आल्याने कर्तव्यावरील अंमलदारांना त्याची शंका आल्याने त्यांनी त्याला थांबवून विचारणा केली..चौकशीत त्याने अमरावती जिल्हा पोलिस दलात चालक असल्याचे सांगितले. तसेच नानवीज येथे एका वर्षापूर्वी चालकाचे प्रशिक्षण घेतल्याचा त्याने दावा केला. त्याने राज्य राखीव पोलिस दलाचे हुबेहुब ओळखपत्र तयार करून घेतले होते, परंतु त्यावर कोणत्याही वरिष्ठ अधिकार्याची स्वाक्षरी व हुद्दा नमूद करण्यात आला नव्हता..दौंड पोलिस ठाण्यात राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्रातील उप निरीक्षक दत्तू शिंदे यांनी फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार जय यादव याच्याविरूध्द भारतीय न्याय संहिता मधील कलम ३३३ (दुखापत, हल्ला किंवा अन्य कृत्य करण्याच्या उद्देशाने गृह अतिक्रमण करणे ) व कलम २०५ ( लोकसेवक वापरतात त्याप्रकारचा गणवेश किंवा ओळखचिन्ह कपटी उद्देशाने परिधान करणे) अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे..पोलिसांनी केलेल्या अंगझडतीत जय यादव याच्याकडे पोलिस पेहरावातील टोपी, शारीरिक प्रशिक्षण व कवायतीचे बूट, कंबरपट्टा, आढळून आले. राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्रात प्रवेश करण्याचा आणि व्हिडिओ चित्रण करण्याचा जय यादव याचा नेमका हेतू दौंड पोलिस तपासत आहेत.

### सोलापूर विमानतळावरून मुंबई आणि गोवासाठी थेट विमानसेवा सुरू होणार

**सोलापूर:** सोलापूरकरांची बहुप्रतीक्षित थेट विमानसेवा सुरू होणार आहे. होटगी रोड सोलापूर विमानतळावरून फ्लाय ९१ एअरलाईन्सची विमानसेवा २० डिसेंबरपासून सुरु होणार असून मुंबई आणि गोवा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी थेट उड्डाणे दिली जाणार आहेत, अशी माहिती सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय जाधव यांनी दिली आहे. ही सेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंचाच्या अथक प्रयत्नांमुळेच हे स्वप्न साकार होऊ शकले आहे. सोलापूरकरांसाठी हे अत्यंत अभिमानाचे आणि आनंदाचे क्षण आहेत. मुंबईसाठी उड्डाण वेळापत्रक - सोलापूर मुंबई सकाळी ०९:४० वाजता विमान उडणार. स. १०:४० मुंबईत पोचणार, मुंबई सोलापूर दुपारी १२:४५ वाजता विमान उडणार. दुपारी १:४५ सोलापुरात येणार, **गोवासाठी उड्डाण वेळापत्रक-** सोलापूर गोवा- दुपारी ०२:१५ वाजता, दु. ०३:१५ गोवा पोचणार,,गोवा- सोलापूर-सकाळी ०८:१० वाजता, स. ०९:१० सोलापुरात पोचणार.

### जप्त वाहनांचा होणार लिलाव

**ठाणे :** वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. विभागाच्या वायुवेग पथकाने कारवाईत जप्त केलेल्या ४० वाहनांचा या लिलावात समावेश आहे. त्यामध्ये रिक्षा, चारचाकी, मिनी बसचा समावेश आहे.ठाण्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात वायुवेग पथकातील अधिकाऱ्यांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी वाहने जप्त केलेली आहेत. ही वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे, राज्य परिवहन भिवंडी आगार, भिवंडी, राज्य परिवहन मिरा-भाईंदर आगार, मुंब्रा वाहतूक पोलिस ठाणे, राज्य परिवहन शहापूर आगार येथे असलेल्या जागेत अटकाव केलेल्या स्थितीत ठेवलेली आहेत. एकूण ४० वाहनांचा जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी वापरून ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात २९ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता ऑनलाइन पद्धतीने लिलाव करण्यात येणार होता. काही तांत्रिक कारणास्तव हा लिलाव ३ डिसेंबरला सकाळी ११ वाजता होणार आहे, अशी माहिती परिवहन विभागाकडून देण्यात आली आहे. इच्छुकांनी या लिलावात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. लिलावाच्या अटी व शर्ती; तसेच अनामत रक्कम याबाबतची माहिती लिलावाच्या अगोदर ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली.

### वाहतूक कोंडींचा संताप; वाहनधारक त्रस्त

**मुंबई:** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील महालक्ष्मी ते चारोटी दरम्यान सिमेंट कॉंक्रीटचे काम सुरू आहे. त्यात अपूर्ण सेवा रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीत वाढ होत आहे. डहाणू-जव्हार राज्य मार्गावरील चारोटी उड्डाणपुलाखाली तर दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक, विद्यार्थी आणि रुग्ण त्रस्त झाले आहेत. या वाहतूक कोंडींचा त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांमधून संताप व्यक्त केला जात आहे.. डहाणू-जव्हार राज्य मार्ग हा चारोटी उड्डाणपुलाखालून जातो; मात्र या पुलाची उंची कमी असल्याने मोठ्या अवजड वाहनांची वाहतूक अडचणीत येते. सध्या या मार्गावर मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने ये-जा करत असल्याने सकाळी आणि संध्याकाळी उड्डाणपुलाखाली मोठी वाहतूक कोंडी होते. शिवाय, पुलाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या सेवा रस्त्यांवर अनेक वाहने उभी असल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.वाहतूक कोंडीमुळे शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यात विलंब होतो. तसेच रुग्णांना रुग्णालयात पोहोचणे अवघड बनले आहे. नागरिकांनी कासा पोलिस ठाणे किंवा चारोटी वाहतूक पोलिस मदत केंद्रातर्फे या ठिकाणी कायमस्वरूपी पोलिस बंदोबस्त ठेवण्याची मागणी केली आहे. अनेकदा वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका सापडल्यास रुग्णालयात पोहचण्यास विलंब होत असतो.

### गुन्हा दाखल न करण्यासाठी ३० हजारांची लाच; उपनिरीक्षकासह पंटर ताब्यात

**भुसावळ (जळगाव) :** गुन्हा दाखल न करण्यासाठी ३० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या उपनिरीक्षकासह त्याच्या पंटरला अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई केली. किरण सोनवणे असे अटकेतील पोलिस अधिकाऱ्याचे नाव आहे..भुसावळ येथील राज्य उत्पादन शुल्क विभागातील उपनिरीक्षक किरण सोनवणे (वय ३९) यांनी पथकासह मंगळवारी (ता. १९) तक्रारदाराच्या घरी अवैध दारू विक्रीबाबत छापा टाकला होता. या छाप्यात तक्रारदाराकडे असलेल्या ३० ते ३५ हजार रुपयांच्या दारूच्या बाटल्या जप्त केल्या होत्या. या वेळी तक्रारदाराकडून १० हजार रुपये घेतले होते, तसेच या प्रकरणी गुन्हा दाखल न करण्यासाठी तक्रारदाराकडून ५० हजार रुपयांची लाच मागितली होती.. त्याबाबत तक्रारदाराने जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची पडताळणी केली असता, कारवाईदरम्यान दोन्ही संशयितांनी दारू विक्री करण्यासाठी व तक्रारदारांना त्रास न देण्यासाठी प्रथम ५० हजारांची मागणी करून तडजोडीअंती ३० हजार रुपयांची मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. शुक्रवारी संशयित किरण माधव सूर्यवंशी (वय ३७, भुसावळ) व खासगी इसमास ३० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना पकडले. त्यांच्यावर फैजपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# आयपीएल लिलावात ऋषभ पंतने मोडला रेकॉर्ड

## ठरला सर्वांत महागडा खेळाडू



**मुंबई: इंडियन प्रीमियर लीग २०२५ साठीचा (आयपीएल) मेगा लिलाव सुरू झाला आहे. हा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबरला सौदी अरेबियातील जेद्दामध्ये होत आहे.**

पहिल्या दिवशी सर्वांच्या नजरा स्टार विकेटकीपर फलंदाज ऋषभ पंतवर होत्या. त्याला लखनऊ सुपर जायंट्सने जबरदस्त बोली लावत २७ कोटी रूपयांना खरेदी केले.

या पद्धतीने पंतने २० मिनिटांत आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडूचा रेकॉर्ड तोडला.

पंतने गेल्या हंगामात दिल्ली कॅपिटल्सचने नेतृत्व केले होते. त्याला दिल्ली संघाला रिटेन केले नव्हते. अशातच पंत २०१६ नंतर पहिल्यांदा लिलावात उतरला. दरम्यान, पंत दिल्लीने आरटीएम कार्ड नियमाचा वापर केला होता. मात्र अखेरीस लखनऊ संघाने मोठी बोली लावत पंतला खरेदी केले.

आरटीएम कार्डमुळे २७ कोटींचा विकला गेला पंत

खरंतर, ऋषभ पंतची बोली जेव्हा २०.७५ कोटी रूपयांपर्यंत पोहोचली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सने आरटीएम कार्डचा वापर केला. दरम्यान, लखनऊ सुपर जायंट्सने या लिलावासाठी २७ कोटी रूपये केले. त्यानंतर दिल्ली कॅपिटल्सने पुन्हा पंतसाठी आरटीएम करण्यास रस दाखवला नाही. पंतसाठी लखनऊ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमध्ये जोरदार बोली लावली. यानंतर सनरायजर्स हैदराबादने एंट्री घेतली. दोघांमध्ये ही बोली २०.७५ कोटीपर्यंत पोहोचली होती.

### दुचाकींना धडक देत टेम्पो पलटी, एकाचा जागीच मृत्यू

**अंबरनाथ:** भरधान टेम्पोने दोन दुचाकींना धडक दिली. त्यानंतर हा टेम्पो थेट दुचाकीस्वाराच्या अंगावर पलटी झाला. या अपघातामध्ये दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अंबरनाथच्या मे फ्लॉवर गार्डनसमोर हा भीषण अपघात झाला. अपघाताची ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या अपघाताचा तपास अंबरनाथ पोलिसांकडून सुरू आहे. . : बसचा मोठा अपघात टळला; समोरून येणाऱ्या वाहनाला वाचविण्यात बस उलटली.मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथच्या शिवमंदिररोडवर शनिवारी सकाळी हा भीषण अपघात झाला. प्रमोद यादव असं या अपघातामध्ये मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. प्रमोद यादव नेहमीप्रमाणे आपली दुचाकी घेऊन कामावर जाण्यासाठी घरातून निघाला होते.



## कंपनीच्या गोदामाला भीषण आग

**बोईसर: तारापूर औद्योगिक क्षेत्राजवळील कारखान्याच्या गोदामाला आज सकाळी भीषण आग लागली. या आगीत गोदामातील तयार आणि कच्चामाल जळून खाक झाला. तर आगीमुळे बोईसर परिसरातील आकाशात मोठ्या प्रमाणात काळाकुट्ट धुर पसरल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचा त्रास सहन करावा लागला.**

तारापूर औद्योगिक क्षेत्रात जवळील बेटेगाव येथील दोरखंड तयार करणाऱ्या रिस्पॉन्सिव्ह इंडस्ट्रीज या कारखान्यातील गोदामाला गुरुवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीमुळे गोदामातील कच्चा आणि तयार माल जळाल्याने मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला. आगीची खबर मिळताच तारापूर अग्निशमन दल, तारापूर अणुऊर्जा प्रकल्प आणि पालघर नगरपरिषद यांच्या एकूण चार बंबानी तातडीने घटनास्थळी पोचून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. गोदामात साठा केलेल्या ज्वलनशील कच्च्या मालामुळे आग धुमसत असल्याने आकाशात मोठ्या प्रमाणात काळा धूर पसरला होता. संपूर्ण बोईसर परिसरात काळा धूर पसरल्यामुळे नागरिकांना प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागला. तीन तासानंतर सकाळी दहा वाजेच्या सुमारास अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यास यश आले. आग लागल्याचे समजताच कारखाना आणि गोदाम परिसरातून कामगारांना वेळीच बाहेर काढल्याने कोणत्याही प्रकारचे जीवित हानी झाली नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज यावेळी अग्निशमन दलाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# सर्वेक्षण करा, जी ज्याची जागा असेल त्याला देऊन टाका



**नवी दिल्ली: शेतकरी नेते राकेश टिकैत रविवारी भारतीय किसान यूनियनच्या कार्यकर्ता बैठकीसाठी बदायूंमधील सहसवान येथे आले होते. येथे भारतीय किसान यूनियनच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत कले.**

यावेळी टिकैत यांनी पत्रकांशी बोलताना उत्तर प्रदेशातील संभल येथील घटना आणि डीएपी खताच्या मुद्द्यावरही प्रतिक्रिया दिली.यावेळी पत्रकारांनी राकेश टिकैत यांना संभलमधील जामा मशिदीच्या सर्वेक्षणासंदर्भात निर्माण झालेल्या गदारोळासंदर्भात प्रश्न केला. यावर ते म्हणाले, टीमला शांततापूर्वक सर्वेक्षण करू द्यायला हवे. आमचे म्हणणे आहे की, सर्वेक्षण करा, जी ज्याची जागा असेल, त्याला देऊन टाका.संपूर्ण राज्यात डीएपी खताची समस्या - डीएपी खताच्या मुद्द्यावर बोलताना टिकैत म्हणाले, ''केवळ जिल्ह्यातच नाही, तर संपूर्ण राज्यातच डीएपी खताची समस्या दिसून येत आहेत. दर वर्षी, जेव्हा जेव्हा गव्हाच्या पेरणीला सुरुवात होते, तेव्हा तेव्हा शेतकर्यांना डीएपी खताच्या समस्येला सामोरे जावे लागतले.

यासाठी, किसान युनियन काय करणार? असे विचारले असता, ''डीएपी सरकार, अधिकारी आणि व्यापाऱ्यांच्या पोटात आहे. डीएपी व्यापाऱ्यांच्या दुकानात सापडेल. जे ब्लॅकमध्ये विकताना आढळतील त्यांना पकडा.आपल्याला हळूहळू सेंद्रिय शेतीकडे वळावे लागेल -टिकैत पुढे म्हणाले, ''डीएपीच्या या आजारापासून दूर रहायला हवे. ४० वर्षांपूर्वी डीएपी होते का? आपल्या पूर्वजांनी डीएपी शिवाय शेती केली. येणाऱ्या काळात ही समस्या आणखी वाढणार आहे. आपल्याला हळूहळू सेंद्रिय शेतीकडे वळावे लागेल. यावर हा एकमेव उपाय आहे

# बनावट एडिशनल एसपी असल्याचे खोटे सांगून महिलेची फसवणूक



**मुंबई: बनावट एडिशनल एसपी असल्याचं खोट सांगून एका महिलेने फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भोपाळ पोलीस ठाण्यात जाऊन तिने इतर अधिकाऱ्यांना आपला धाक दाखवला. शिवानी चौहान असं नाव असल्याचं सांगितलं.**

तिला पाहताच पोलीस ठाण्याच्या इंचार्जनेही जय हिंद म्हणत महिलेला सॅल्यूट मारला. पण नंतर जे बोलणं झालं त्यामध्ये महिलेची एक चूक झाली आणि ती पकडली गेली.

एएसपीचा यूनिफॉर्म परिधान करून पोलिसांना त्रास देणाऱ्या महिलेचा पर्दाफाश झाला. महिला पोलिसांनीच बनावट महिला एडिशनल एसपीला पकडलं आहे. बनावट पोलीस अधिकारी बनलेल्या महिलेला तिच्या कृत्याचा पश्चाताप होत आहे. तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ती एडिशनल एसपीच्या यूनिफॉर्ममध्ये टीटी नगर पोलीस स्टेशनमध्ये पोहोचली होती. ती पोलीस ठाण्यातील हेड कॉन्स्टेबलला आपण अधिकारी असल्याचं सांगायची.

पोलीस ठाण्याचे टीआय आणि एसीपी तिला सॅल्यूट करायचे. महिलेने ती २०१८ च्या बॅचमधील असल्याचं सांगितलं. या बॅचला अद्याप प्रमोशन देण्यात आलेलं नाही. हे अधिकाऱ्यांना माहीत होतं त्यामुळेच महिलेची सर्वांसमोर पोलखोल झाली. आईची तब्येत खूप खराब आहे. तिला खूश करण्यासाठी पोलीस खात्यात काम करत असल्याचं खोटं सांगितलं अशी माहिती महिलेने दिली आहे. पोलिसांना दिलेल्या माहितीत शिवानीने सांगितलं की, तिने इंदूरमधील पोलीस कॅन्टीनसमोर असलेल्या दुकानातून पोलिसांचा युनिफॉर्म, बेल्ट आणि शूज खरेदी केले होते. तिला तेथून एक बिल्लाही मिळाला. एडिशनल एसपीचा गणवेश कसा दिसतो, त्यावर अशोक चिन्हे आणि स्टार आहेत आणि ते कसं लावलं जातं, हे सर्व ती यूट्यूबवर पाहून शिकली. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# बसपा कोणतीही पोटनिवडणूक लढवणार नाही: मायावती



**लखनौ : उत्तर प्रदेशातील ९ जागांच्या विधानसभा पोटनिवडणुकीचे निकाल शनिवारी आले. या पोटनिवडणुकीत भाजपने सहा जागा जिंकल्या आहेत. याशिवाय, सपा दोन जागांवर तर आरएलडीने एका जागेवर विजय मिळवला आहे.**

दरम्यान, या पोटनिवडणुकीत एकही जागा न जिंकल्याने बसपा प्रमुख मायावती यांनी रविवारी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत मायावती यांनी निवडणुकीत बनावट मतदान होत असल्याचा आरोप करत देशात बनावट मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोग जोपर्यंत कठोर पावले उचलत नाही, तोपर्यंत आमची पार्टी यापुढे देशातील कोणतीही पोटनिवडणूक लढवणार नाही,असे त्यांनी सांगितले.मायावती म्हणाल्या की, उत्तर प्रदेशात विधानसभेच्या नऊ जागांवर झालेल्या पोटनिवडणुकीत यावेळी जे मतदान झाले आणि काल जो निकाल आला. त्यावरून लोकांमध्ये अशी सामान्य चर्चा आहे की, यापूर्वी देशात बॅलेट पेपरद्वारे निवडणुका जिंकण्यासाठी सत्तेचा गैरवापर करून बनावट मतं टाकली जात होती. आता आता हे कामही ईव्हीएमच्या माध्यमातून होत आहे, ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. देशातील लोकसभा आणि राज्यांतील विधानसभा निवडणुकांबरोबरच विशेषत: पोटनिवडणुकांच्यावेळी हे काम आता अगदी उघडपणे केले जात आहे. हे सर्व आपण नुकत्याच झालेल्या उत्तर प्रदेशच्या पोटनिवडणुकीत पाहिले आहे. तसेच, महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीतही याबाबत खूप आवाज उठवला जात आहे. ही सुद्धा आपल्या देशासाठी आणि लोकशाहीसाठी मोठी धोक्याची घंटा आहे, असे मायावती यांनी सांगितले. पुढे त्या म्हणाल्या, अशा परिस्थितीत आमच्या पार्टीने आता निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत देशातील बनावट मतदान रोखण्यासाठी देशाच्या निवडणूक आयोगाकडून कठोर पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत आमची पार्टी देशातील कोणतीही पोटनिवडणूक लढवणार नाही.

आमची पार्टी संपूर्ण तयारी आणि ताकदीने देशातील लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवणार आहे, असे मायावती यांनी सांगितले.

# उरुळी देवाची, फुरसुंगी ही गावे पालिकेकडून वगळण्याचा निर्णय

**पुणे : महापालिकेच्या हद्दीतून काढून नगर परिषद करण्याचा निर्णय झालेल्या फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन्ही गावांतील बांधकामांशी संबंधित सर्व कागदपत्रे तातडीने संबंधित नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्याचे आदेश राज्य सरकारने महापालिकेला दिले आहेत.**

नगरविकास विभागाने हे आदेश दिले असून, यामुळे या गावातील नगररचना (टीपी) स्कीमचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेली उरुळी देवाची आणि फुरसुंगी ही गावे महापालिकेकडून वगळण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतला आहे. ही गावे पालिकेतून वगळण्यात आल्यानंतर तेथील बांधकाम प्रकल्पांच्या परवानग्या महापालिकेकडे अडकून पडल्या होत्या. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी नगरविकास विभागाला पत्र पाठवून या गावांसाठी बांधकाम विभागाशी संबंधित कामांबाबत स्पष्ट आदेश देण्याची विनंती केली होती. त्यावर नगरविकास विभागाने पालिकेला आदेश पाठवून ही जबाबदारी नगर परिषदेची असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता पालिकेला येथे कोणताही हस्तक्षेप करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

या गावांतील अनेक बांधकाम परवानग्या महापालिकेकडे प्रलंबित आहेत. ही गावे महापालिकेतून वगळल्याने महापालिकेला या गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून असलेले अधिकार संपुष्टात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त भोसले यांनी राज्य सरकारला पत्र पाठवून स्पष्टता मागितली होती.

# कांदा, बटाटा, लसूण, भेंडी, गवार, कोबी, शेवगा महागला

**पुणे:- गुलटेकडी येथील मार्केट यार्डातील तरकारी बाजारात राज्यासह परराज्यांतून येणारी फळभाज्यांची आवक गेल्या आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे. परिणामी फळभाज्यांना मागणी वाढल्याने कांदा, बटाटा, लसूण, भेंडी, गवार, कोबी आणि शेवग्याच्या भावात वाढ झाली असून हिरवी मिरची, शिमला मिरची आणि घेवड्याच्या भावात घट झाली आहे.**



इतर सर्व प्रकारच्या फळभाज्यांचे भाव स्थिर होते. मार्केटयार्डमध्ये रविवारी राज्यासह परराज्यांतून सुमारे १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली..कर्नाटक आणि गुजरात येथून हिरवी मिरची १२ टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी चार टेम्पो, कर्नाटकातून पावटा दोन टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडूतून शेवगा तीन टेम्पो, इंदूर येथून गाजर सात टेम्पो, कर्नाटक आणि गुजरातमधून घेवडा पाच टेम्पो, गुजरात येथून भुईमूग शेंगा ५० गोणी, मध्यप्रदेशातून लसणाची आठ टेम्पो आवक झाली. स्थानिक भागातून सातारी आले ६०० गोणी, भेंडी सहा टेम्पो, गवार सहा टेम्पो, टोमॅटो आठ हजार क्रेट, हिरवी मिरची पाच टेम्पो, काकडी आठ टेम्पो, फ्लॉवर १२ टेम्पो, कोबी पाच टेम्पो, सिमला मिरची १२ टेम्पो, भुईमूग शेंग ५० गोणी, पुरंदर, पारनेर, वाई आणि सातारा परिसरातून मटार ५० गोणी, तांबडा भोपळा १२ टेम्पो, कांदा ८० ट्रक, इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाट्याची४५ ट्रक आवक झाली, अशी माहिती मार्केट यार्डमधील ज्येष्ठ अडतदार विलास भुजबळ यांनी दिली.फळभाज्यांचे १० किलोचे भाव : कांदा नवीन : ४५०-५५०, जुना : ६००-७००, बटाटा : २२०-४२०, लसूण : २३००-३५००, आले सातारी : २००-४००, भेंडी : ४५०

# कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'विधी विधान इंटर्नशिप'

**मुंबई: कायदेशीर प्रस्तावांची तपासणी करण्याची प्रक्रिया, विधेयक व अध्यादेशाचा मसुदा तयार करणे तसेच दुय्यम विधी विधान तयार करणे याबाबतची माहिती राज्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी विधी विधान इंटर्नशिप उपक्रम २० जानेवारी ते २८ फब्रुवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.**

या उपक्रमाद्वारे शासनाच्या कामकाजाची माहिती, विधेयके, अध्यादेश, नियम, अधिसूचनांचे प्रारूप तयार करण्याबाबतची कार्यपद्धती, विधान मंडळात विधेयके पारित करण्याची कार्यपद्धती, विधी व न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद, संविधानातील कायदेविषयक तरतुदी व त्यांचा प्रत्यक्ष वापर, विविध कायदे व तरतुदींची माहिती, विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत कामाचा प्रत्यक्ष अनुभव, विविध विषयांवर व्याख्याने तसेच संबंधित



कार्यालयाना भेटी देण्याची रूपरेषा ठरविण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील विधी महाविद्यालये व विद्यापीठे यामधील ५ वर्षाच्या विधी पदवी अभ्यासक्रमाचे चौथ्या किंवा पाचव्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी, ३ वर्षाच्या विधी पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी तसेच विधी पदव्युत्तर पदवीचे पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी या विधी विधान इंटर्नशिपसाठी पात्र आहेत. तथापि, या उपक्रमासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याचे वय २८ वर्षापेक्षा जास्त नसावे, असेही स्पष्ट करण्यात येत आहे.

# जोफ्रा आर्चर पुन्हा राजस्थान संघात



**मुंबई: इंडियन प्रीमियर लीग २०२५ लिलाव जेद्दाहमध्ये रविवारी सुरु झाला. पहिल्याच दिवशी अनेक स्टार खेळाडूंवर मोठ्या बोली लागल्या. रात्री ९ वाजेपर्यंत ४२ खेळाडूंवर बोली लागली आहे. तब्बल २० खेळाडूंना १० कोटींपेक्षा अधिक रक्कम मिळली आहे. यामध्ये इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर याचाही समावेश आहे.**

जोफ्रा आर्चर आयपीएलमध्ये खेळणार की नाही, याची चर्चा सुरुवातीपासून होती. त्याला दुखापतीमुळे गेली २-३ वर्षे बराच काळ क्रिकेटपासून दूर रहावे लागले होते. पण काही दिवसांपूर्वीच तो आयपीएल २०२५ मध्ये संपूर्ण आयपीएल हंगामासाठी उपलब्ध असणार असल्याचे कळाल्याने त्याचा समावेश आयपीएल लिलावातील खेळाडूंच्या अंतिम यादीत करण्यात आला होता. . २०२५ : श्रेयस अय्यर आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला, ने मोजली तगडी रक्कम.त्यानंतर त्याचे नाव पहिल्याच दिवशी वेगवान गोलंदाजांच्या सेटमध्ये आले. त्याला संघात घेण्यासाठी सुरुवातीला मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स मैदानात उतरले होते. त्यांच्यात ८.२५ कोटींपर्यंत चढाओढ झाली. नंतर लखनौने माघार घेतली. त्यानंतर राजस्थान रिंगणात आले. मुंबई आणि राजस्थान यांच्यात चुरस होती. अखेर राजस्थानने १२.५० कोटींपर्यंत बोली वाढवल्यानंतर मुंबईने माघार घेतली. त्यामुळे राजस्थानने त्याला १२.५० कोटी रुपयात संघात घेतले. .आर्चरने आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडूनच २०१८ मध्ये पदार्पण केले होते. तो २०२० पर्यंत या संघाकडून खेळला होता. त्यानंतर तो मुंबई संघात गेला. पण आता पुन्हा आर्चरचे राजस्थान संघात पुनरागमन झाले आहे.मुंबईने खरेदी केला पहिला खेळाडूअनेक फ्रँचायझी आपला संघ पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असताना मुंबई इंडियन्स मात्र शांत होते. अखेर त्यांनी ८ वाजल्यानंतर पहिला खेळाडू खरेदी केला. मुंबईने न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ड याला या लिलावात खरेदी केले. .बोल्ट यापूर्वीही २०२० आणि २०२१ मध्ये मुंबईकडून खेळला होता, त्याने मुंबईकडून चांगली कामगिरीही केली होती. पण मुंबईने त्याला २०२२ लिलावाआधी करारामुक्त केले. त्यामुळे तो राजस्थान रॉयल्सकडून खेळला. पण आता पुन्हा मुंबईने त्याला संघात घेतले आहे. मुंबईने बोल्टसाठी १२.५० कोटी रुपयांमध्ये खरेदी केले. मुंबईने हा एकमेव खेळाडू रात्री ९ पर्यंत खरेदी केला

वनिता ॲग्रोकेम (इं.) प्रा. लि. खालील नमुद केलेले पाण्यात १०० % विद्राव्य मिश्रखत नोटिफिकेशन नं. एस.ओ. २९०० (ई) दि. २४/१०/२०१५ प्रमाणे स्वउत्पादीत किंवा आयात करून महाराष्ट्र राज्यात विक्री करणार आहेत.
N:P:K 38 : 05 : 00, N:P:K 15 : 15 : 30
वनिता ॲग्रो
आय एस ओ ९००१ प्रमाणित
वनिता ॲग्रोकेम (इं) प्रा. लि.
उत्पादक : विद्राव्य खते, सुक्ष्मअन्नद्रव्ये
फॅक्टरी : मु.पो. टाकवडे-४१६ १२१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र, फोन : ८३८००३४९१६, Website : www.vanitaagro.com

# गोखले एज्युकेशन सोसायटीमध्ये आज अंतरीक्ष बस : एक फिरते प्रदर्शन

## आर. एच. सपट अभियांत्रिकी महाविद्यालयाने केले आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

**गो. ए. सोसायटी संचलित आर. एच. सपट अभियांत्रिकी महाविद्यालयाने काल स्पेस ऑन व्हील्स म्हणजेच अंतरीक्ष बस : एक फिरते प्रदर्शनाला गुरुदक्षिणा सभागृहाच्या प्रांगणात आमंत्रित केले होते.**

हा भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि विज्ञान भारती यांचा अनोखा संयुक्त उपक्रम असून, अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागील उद्दिष्ट अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञान सर्व नागरिकांपर्यंत पोहचावे आणि भारताच्या वैज्ञानिक विकासाच्या दृष्टीकोनाची विद्यार्थी आणि सामान्य लोकांच्या मनात जाणीव करून देण्यासाठी रॉकेट, उपग्रह आणि त्यांच्या अनुप्रयोगांच्या तैनातीमध्ये इस्रोच्या पराक्रमाबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे हा आहे. 'स्पेस ऑन व्हील्स' या बसमध्ये इस्रोचे महत्त्वपूर्ण मिशन्स जसे की, चांद्रयान-१, २, ३, ४, मंगलयान १, २, शुक्रयान, गगनयानचे क्र्यू मोड्यूल यांच्या प्रतिकृती आहेत. तसेच भारताचे विविध उपग्रहांची माहितीदेखील प्रतिकृतींसह प्रदर्शित करण्यात आलेली आहे.



या प्रदर्शनाचे उद्घाटन गो. ए. सोसायटीचे प्रकल्प संचालक पी. एम. देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी गो. ए. सोसायटीचे प्रकल्प संचालक पी. एम. देशपांडे, आस्थापना संचालक शैलेश देशपांडे, समन्वयक एस. पी. अग्निहोत्री, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. साने यांसमवेत विज्ञान भारतीचे विनय जोशी आणि श्रीशैल बुधले, नाशिकमधील अनेकविध विज्ञानप्रेमी आणि संशोधक जसे की, इस्रो अन् नासा स्पेस एज्युकेटर अपूर्वा जाखडी, मराठी विज्ञान परिषदेचे सदस्य गिरीश पिंपळे, कल्पना युथ फाउंडेशनचे सदस्य सुशांत राजोळे, कमला सोहनी विज्ञान केंद्राचे अमित टिल्लू, ज्येष्ठ खगोल अभ्यासक रमाकांत देशपांडे, सायन्स फोरमचे राजेंद्र वडनेरे आणि प्रवीण जोशी, डॉ. ओम प्रकाश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी विनय जोशी यांनी अंतरीक्ष बस : एक फिरते प्रदर्शन या मोहिमेचे उद्दिष्टे सांगत असताना टे म्हणाले की, गूगलवर सर्व माहिती उपलब्ध असूनही प्रत्यक्ष बस नागरिकांच्या भेटीस आणणे म्हणजे विज्ञान मेळा भरविणे होय. स्वदेशी विज्ञान प्रचार आणि प्रसार करणे हा यामागील मुख्य हेतू आहे. विज्ञान हे स्वदेशीच असावे तरच देशाची खरी प्रगती म्हणता येते, असे प्रतिपादन जोशी यांनी केले. विज्ञान भारतीच्या विविध मासिके, स्पर्धा आणि उपक्रमांविषयी देखील त्यांनी यावेळी माहिती दिली.

यावेळी उपस्थित अपूर्व जाखडी यांनी इस्रोचा अवकाश तंत्रज्ञान चा संपूर्ण प्रवास या बस मध्ये दाखविला आहे, असे सांगितले. इस्रोच्याविविध मोहिमांबद्दल माहिती देऊन जास्तीत जास्त नाशिकच्या विद्यार्थ्यांनी स्पेस एज्युकेशनकडे वळावे, करियर म्हणून देखील इस्रो चा विचार करावा, असे आवाहन उपस्थितांना केले.

या प्रदर्शनासाठी आर. एच. सपट अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह सर्व प्राध्यापक वर्ग तसेच प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, तसेच नाशिक परिसरातील अनेकविध शाळांचे, रिमांड होमचे विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग उपस्थित होते. उपस्थित संशोधकांनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला.

## आर्थिक व्यवहारातून व्यावसायिकाची आत्महत्या

**पुणे :** वराह पालन व्यवसायातील आर्थिक व्यवहारातून एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठेत घडली. व्यावासयिकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एकाविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पान नं. १ वरून...

## मुख्यमंत्रिपदाचा सस्पेन्स कायम

२८ ते २९ तारखेपर्यंत सत्ता स्थापन होण्याची शक्यता

शिवसेनेच्या पदाधिकारी आणि नवनिर्वाचित आमदारांनी त्यांच्या पक्षाचा निर्णय घेण्याचे सर्वाधिकार एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. शिवसेनेच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून एकनाथ शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षानं अजित पवार यांची देखील पक्षाच्या गटनेते पदी निवड केलेली आहे. भाजपची भाजपची पार्लमेंट्री बोर्डाची मीटिंग होणे आवश्यक आहे, जी अजून झाली नाही. त्यानंतर राज्यातील तिन्ही मुख्य नेते आणि अमित शहा यांची मीटिंग होणे आवश्यक आहे, त्यात मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्री निवडले जातील, त्यानंतर राज्यात आधी हे ३ शपथविधी पार पडतील. अशी माहिती आहे.

उर्वरित मंत्रिमंडळासाठी शिंदे, फडणवीस आणि पवार यांच्यात बैठक होईल, आणि गरज पडलीच तर शहा यांच्यासोबत बैठक होईल, त्यानंतर उर्वरित मंत्रिमंडळ विस्तार होईल, अशी माहिती आहे. दरम्यान, महाराष्ट्राच्या राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख एम. चोक्कलिंगम यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत २८८ मतदारसंघात विजयी झालेल्या आमदारांची यादी सोपवली आहे.

## मंत्रिपदाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा

१० जागा मिळाल्या आहेत. यावरून आता राज्यात महायुतीची सत्ता येणार असल्याचे निश्चित झाले आहे. अशातच सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असताना महायुतीमध्ये मंत्रिपदाच्या वाटपासाठी फॉर्म्युल्यावर चर्चा झाली असल्याची माहिती सूत्रांकडून मिळतेय. ६ ते ७ आमदारांच्या मागे एत मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. तर भाजपचे १३२ आमदार विजयी झाले आहेत. त्यामुळे भाजपच्या वाट्याला २२ ते २४ मंत्रिपदं मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ५७ आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे शिवसेनेला १० ते १२ मंत्रिपदं आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४१ जागा मिळाल्या आहेत त्यामुळे त्यांना ८ ते १० मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. मात्र महायुतीचे तिनही प्रमुख नेते यावर अंतिम निर्णय घेणार आहेत.

## तरुण नेतृत्व उभारणार, घरी बसणार नाही

हा निकाल लागेल, असं वाटलं नव्हते. त्यांचा आत्मविश्वास वाढला पाहिजे, त्यांना पुन्हा नव्याने उभे करणे गरजेचे आहे. कर्तृत्वान पिढी उभारणे हा माझा यापुढे कार्यक्रम राहील, असं शरद पवार म्हणाले. मतांचं ध्रुवीकरण झालं...निकालाबाबत बोलताना शरद पवारांनी लाडकी बहीण योजनाचा उल्लेख केला. ते म्हणाले, लाडक्या बहिणांना काही रक्कम देण्यात आली आहे. यापुढे आम्ही सत्तेत आलो नाही, तर ही योजना बंद होईल, असा प्रचार महायुतीकडून करण्यात आला. त्यामुळे लोकांनी आमच्या विरोधात मतदान केले, असे वाटते. दुसरीकडे या निवडणुकीत महिलांचे मतदान वाढले आहे, असे आकडेवारीवरुन दिसत आहे. तो फायदा महायुतीला मिळाला आङे. बटेंगे तो कटेंगे या घोषणेमुळे मतांचे ध्रुवीकरण झाले, त्याचा फायदाही महायुतीला झाला. निकालानंतर उद्धव ठाकरेंसह काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी निकालांवर संशय व्यक्त करत चा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यावर बोलताना शरद पवार म्हणाले, जोपर्यंत माझ्याकडे अधिकृत माहिती येत नाही, तोपर्यंत मी या विषयावर काही बोलणार नाही. विधानसभा निवडणुकीतील अपयशानंतर शरद पवार निवृत्ती होणार? ही चर्चा सुरु झाली. त्या प्रश्नावर बोलताना शरद पवार म्हणतात, माझ्या निवृत्तीची वेळ विरोधकांनी सांगू नये.अजितदादांच्या विजयावर शरद पवार म्हणतात...अजित पवारांच्या पक्षाला जादा जागा मिळाल्या, यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, युगेंद्र पवार आणि अजित पवार यांची तुलना होऊ शकत नाही. अजितदादांच्या जागा जास्त आल्या आहेत, हे अमान्य करण्याची गरज नाही. पण राष्ट्रवादीचा संस्थापक कोण आहे, हे महाराष्ट्राला माहीत आहे. कुणीतरी बारामतीत उभं राहणं गरजेचं होतं. तिथं कुणीलाही उभं केलं नसतं, तर महाराष्ट्रात मेसेज काय गेला असता. युगेंद्र आणि अजितची तुलना होऊ शकत नाही, हे आम्हाला माहीत होते.अजित पवार यांचं अनेक वर्षापासूनचं राजकारण, सत्तेतील सहभाग आणि दुसऱ्या बाजूला नवखा तरुण हे आम्हाला माहीत आहे, असं शरद पवार म्हणाले.

## निकालातून आत्मपरीक्षण करू

अभिनंदन देखील केले. नवे लोकप्रतिनिधी राज्यातील जनतेच्या हितासाठी काम करतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीत मायबाप जनतेने जो कौल दिला तो अतिशय नम्रपणे आम्ही स्वीकारत आहोत. या निकालातून बोध घेऊन नक्कीच आत्मपरीक्षण करू आणि भविष्यातील सक्षम महाराष्ट्र उभा करण्यासाठी प्रामाणिकपणे लढत राहू. शेतकरी, कष्टकरी,महिला, तरुण व समाजातील प्रत्येक घटकांच्या हक्काची व स्वाभिमानाची लढाई आम्ही खंबीरपणे कायम लढत राहू. आता जरी आम्ही पराभूत झालो असलो तरी आपल्या मूल्यांसाठी प्रांजळपणे काम करत राहू आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांची ही पालखी निष्ठेने, सर्व शक्तीनिशी पुढे नेऊ. या निवडणुकीत विजयी झालेल्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

## हेमंत सोरेन यांचा २८ ला शपथविधी

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चाईबासाचे आमदार दीपक बिरुवा आणि घाटशिलामधून विजयी झालेले रामदास सोरेन हे पुन्हा नव्या सरकारमध्ये मंत्री होणार हे निश्चित मानले जात आहे. याशिवाय महतो व्होट बँक टॅप करण्यासाठी मथुरा महतो यांचा समावेश केला जाऊ शकतो. हाफिझुल हसन आणि एमटी राजा यांच्यापैकी कोणालाही अल्पसंख्याक कोट्यातून मंत्री बनवू शकते. हफिजुल हे मागील सरकारमध्ये मंत्री होते. प्रादेशिक समतोल राखण्यासाठी पक्ष संथाल परगणा आणि उत्तर छोटानागपूरमधील एखाद्याला मंत्री म्हणून नियुक्त करू शकतो. त्याचवेळी काँग्रेसमधील अल्पसंख्याक कोट्यातील एकमेव आमदार इरफान अन्सारी विजयी झाले आहेत. ते पुन्हा लॉटरी जिंकू शकतात. दुसरे नाव रामेश्वर ओराव असू शकते. ओराव हे मागील सरकारमध्ये अर्थमंत्री होते. हेमंत मंत्रिमंडळातील ते सर्वात श्रीमंत मंत्रीही होते. काँग्रेस प्रदीप यादव आणि दीपिका पांडे सिंग यांना मंत्री करू शकते. तर, राजद पक्षाकडून संजय प्रसाद यादव आणि संजय कुमार यादव यांच्यापैकी एकाला मंत्री बनवण्याचे निश्चित मानले जात आहे.

## मनसेची पक्ष मान्यता धोक्यात?

त्यामुळे आता मनसेचं रेल्वे इंजिन चिन्ह काढून घेण्यात येईल. त्यांना आता निवडणुकीच्या आधी निवडणूक आयोग फ्री चिन्हांपैकी एखादं चिन्ह देईल, असं कळसेंनी सांगितलं.

## ज्यांनी मला त्रास दिला ते सगळे साफ झाले

श्रीजया यांना नांदेडच्या भोकर मतदारसंघातून उमेदवारी दिली. महायुतीच्या त्सुनामीत श्रीजया यांनी दणदणीत विजय मिळवला. श्रीजया यांच्या रुपाने चव्हाण कुटुंबाची तिसरी पिढी राजकारणात उतरली आहे.

दरम्यान, निवडणूक निकालानंतर अशोक चव्हाण आणि त्यांची कन्या श्रीजया यांनी रविवारी भोकर मतदार संघातील विविध गावात जाऊन मतदारांचे आभार मानले. मुदखेड येथे मतदारांशी संवाद साधताना अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या देशमुख बंधू, नाना पटोले यांच्यासह बाळासाहेब थोरातांवर बोचरी टीका केली.काँग्रेसमध्ये राहिलंय काय? सगळे साफ झाले...लातूरमध्ये एक पडला आणि दुसरा निसटता निसटता कसातरी निघालाय. हे महाराष्ट्राचे नेतृत्व करणार होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले तर नांदेड अन् भोकरच्या नावाने बोंबलून बोंबलून निघून गेले. फक्त दिडशे मतांनी कसेबसे निवडून आलेत. हे नेते महाराष्ट्राचे नेतृत्व करणार होते. त्या काँग्रेसमध्ये राहिलंय काय आता? माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सगळे साफ झाले. ज्यांनी ज्यांनी मला त्रास दिला, ते सगळे साफ झाले...त्यामुळे मला कुणी त्रास देऊ नका, अशी बोचरी टीका खा. अशोक चव्हाण यांनी यावेळी केली.श्रीजया चव्हाण यांनी राखला गडमहाराष्ट्राला मुख्यमंत्री देणारा आणि चव्हाण कुटुबियांचा बालेकिल्ला म्हणून भोकर मतदारसंघाची ओळख आहे. येथे शंकरराव चव्हाण यांनी विजय मिळवित सतत २० वर्षे नेतृत्व केले होते. त्यानंतर सातत्याने हा मतदार संघ चव्हाण कुटुंबियांच्या पाठीशी राहिला आहे. २०१४ अमिता चव्हाण, २०१९ मध्ये अशोक चव्हाण यांनी मतदारसंघाचे नेतृत्व केले होते. त्यानंतर यावेळी खुद्द अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आणि त्यांनी त्यांनी कुटुंबाचा गड राखला. त्यांच्या विरोधात काँग्रेसचे तिरुपती कदम होते. या निवडणुकात श्रीजया यांना १३३१८७ मते मिळाली, तर कदम यांच्या पारड्यात ८२६३६ मते पडली.

## पुन्हा आमरण उपोषण करणार : जरांगे

आरक्षणासाठी नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आंतरवाली सराटीत सामूहिक आमरण उपोषण करणार., अशी घोषणा देखील मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केली. त्यांच्या समोर मराठा आरक्षणाचा मुद्दा कायम राहिल.

## मविआला विरोधी पक्षनेते पदही नाही

एका पक्षाकडे २९ सदस्य असणं गरजेचं आहे. सध्या विरोधी पक्षातील कोणताच पक्ष अपेक्षित संख्याबळ गाठत नाही.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीला जनमान्यता

हाताला सलाईन आणि मी पहा आजारी आहे. आता, माझे काहीही होईल, आपल्या समाजाची जी लेकरे बाळे आहेत. काहीतरी करा, ज्यांनी विरोध केला त्यांना पाडा, असे सांगितले. माझ्या मताधिक्यावर त्याचा परिणाम झाला. निश्चितच परिणाम झाला. परंतु, इतर अल्पसंख्याक समाज एकत्र आला आणि त्यांनी आमचे तारु किनाऱ्याला लावले. अशा शब्दात छगन भुजबळ यांना विजयानंतर पहिली प्रतिक्रिया देताना थेट नाव घेऊन मनोज जरांगे पाटील यांना टोला लगावला. मराठा समाजानेही महायुतीला जरांगे सातत्याने सांगत होते, भुजबळ आणि फडणवीस यांच्याविरुद्ध, यांना पाडा असे सांगितले.पण ते अजिबात चालले नाही, लोकांनी देवेंद्र फणवीसांच्या नेतृत्वात १३२ मेजॉरिटीने भाजपला निवडून दिले. असेही भुजबळ यांनी म्हटले.

## प्रिय बंधु-भगिनींनो... सप्रेम नमस्कार...

### देवेंद्र फडणवीस यांचे एक्सवर पोस्ट



मुंबई: महाराष्ट्र विधानसभा निडवणुकीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला अतिप्रचंड बहुमत मिळाले आहे. राज्यातील जनतेने महायुतीला स्पष्ट कौल दिला आहे. भरभरून मतदान केले आहे. महत्वाचे म्हणजे, या निवडणुकीत भाजपलाही नभूतो, असे यश मिळाले. भाजपने महाराष्ट्रात सलग तिसऱ्यांदा १०० हून अधिक जागा जिंकल्या आहेत. यानंतर आता, भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार मानण्यासाठी राज्यातील जनतेला पत्र लिहिले आहे.

यात, ''मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास, या विजयाचे खरे शिल्पकार असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

जसं आहे तसं... –प्रिय बंधु–भगिनींनो,सप्रेम नमस्कार, महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत महायुतीला मिळालेला महाविजय फक्त भाजपा –महायुतीचा नाही, तर महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासाचा आहे. तुम्ही दाखवलेल्या या विश्वासासाठी आणि दिलेल्या प्रेमाबद्दल महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी नतमस्तक होतो.मेहनत, एकजूटता, लाडक्या बहिणींचे आशीर्वाद आणि मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्त्वावर महाराष्ट्राच्या तमाम जनतेने दाखविलेला विश्वास या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी, मित्रमंडळी आणि माझा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता ज्यांनी गेले काही दिवस जिवाचे रान करून वेळ–काळ न पाहता मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला, अशा सर्वांचा मी कायम ऋणी राहीन!आपणा सर्वांच्या पाठिंब्यामुळेच महायुतीला मिळालेल्या या विजयाने एक नवीन दिशा दिली आहे. हे यश आपल्या महाराष्ट्राला एक प्रगतीशील आणि सर्वसमावेशक भवितव्यासोबत मा. मोदीजींच्या नेतृत्वात विकसित भारतासह विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रेरणा देत राहील.पुन्हा एकदा आपले मनःपूर्वक आभार. आपला विश्वास आणि प्रेम सदैव राहो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

– आपलाच,
देवेंद्र फडणवीस


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### Wanted

Accountant for Amma Builders Knowing Tally, GST, TDS, etc. Contact-9373905562/ 8975719707

### पाहिजेत

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो. नं.९०४९०-३४९९९**

---

न्यू अनारकली फॅशन &NX दुकानासाठी अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व सेल्समन, हेल्पर पाहिजे. ठिकाण: एम.जी.रोड, भारत बुकसमोर, फावडे लेन,

---

**संपर्क- ९८८१३८३०१९**
स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

### पाहिजेत

कॉलेजरोड नाशिक येथील नामांकित ब्युटी पार्लर व शासन मान्यताप्राप्त ब्युटी कल्चर कोर्सेस, अ‍ॅकेडमीसाठी अनुभवी ब्युटीशियन, उत्तम संवाद कौशल्य असलेल्या अनुभवी रिसेप्शनीस्ट, टेली कॉलर्स मुली, महिला पाहिजेत.- अपेक्षेसह बायोडेटा पाठवा. संपर्क ९३०९२४००७५, ८३७८८८७८६२

---

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा- कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

### ब्राह्मण वधू पाहिजे

मुलगी उंच असावी, समजूतदार, मनमिळाऊ, पदवीधर, वय २४ ते २७. **संपर्क मोबाईल नंबर ९५५२२७७०९७, ९५११६८०९९८**

### विकणे आहे

शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

### ज्योतिष

गायत्री ज्योतित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### CHANGE OF NAME

I Tahamina Behera wife of No 15147473L Rank Hav Arup Kumar Behera is serving at 341 Fd Regt, C/O 99 APO Add:- Vill-Badadia, Post- Dangamal, Teh- Rajanagar, Dist-Kendrapara, Odisha 754248. That i have changed my Name from Tahamina Behera to **Tahamina Nayak** due to wrongly entered in service record of my husband as per affidavit NO 3778

---

My old name is MOSIN KADIR PATHAN has been changed to my new name **MOHSIN KADIR PATHAN** as per adhaar No.422838349852

### नावात बदल

माझे पूर्वीचे नाव वैजयनाथ वामन लोखंडे असे होते आता माझे नाव **विजय वामन लोखंडे** असे आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. **आधार क्र. ३६६५ ९२९७ ४८३८ नुसार**

---

माझे लग्नापूर्वीचे नाव निता लक्ष्मण दाणी असे होते. आता लग्नानंतर माझे नाव **सुयोगी योगेश मांडवगणे** असे झाले आहे. आधार क्र. ५००१ ७४३३ ४२६९ नुसार

### पाहिजेत

मथुरा हॉटेल प्युअर व्हेज मुक्तीधामच्या पाठीमागे, साठी वेटर-२, तंदूरकुक-१, किचन हेल्पर-१, वेटर हेल्पर-१ पाहिजे. संपर्क-९३७२८८९१११

### विकणे आहे

संपूर्ण प्लॅन्ट विकणे आहे ३६/७ ऑईल एक्सपेलिअर २ कन्व्हेअर ५० एचपी मोटार ३००० एल रिफायनी स्पेअर पार्ट सेट २, स्टार-डेल्टा स्टार्टर
**संपर्क- ग्रीन लिफ इंडस्ट्रीज ९४२२९९०२७८**

जाहिरात छोटी किमया मोठी!


## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मौजे बेळगांव ढगा**, ता. जि. नाशिक येथील बिनशेती मिळकत यांसी भूमापन क्र.व उपविभाग १३६/२ पैकी मंजूर ले-आऊटमधील **प्लॉट नं. २० यांसी क्षेत्र १६२.०० चौ. मी.** ही मिळकत.

उपरोक्त प्लॉट मिळकत **सिजी जोजी वरघीस** यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे त्यांनी सांगितले आहे. तथापी मिळकतीचे निर्वेधपणाची खात्री करणेकामी सदरची टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सबब सदर मिळकतीबाबत कोणतेही व्यवहार, गहाण, दान, तारण, लिन, लिज, भाडेपट्टा, अन्नवस्त्र, खावटी, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विकसन करारनामा, हक्क हितसंबंध, हरकत असल्यास त्या संबंधित इसमाने अगर संस्थेने त्यांचे लेखी कागदपत्रांचे पुराव्यानिशी आपली हरकत आमचे खालील कार्यालयात प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **(सात)** दिवसांचे आत नोंदवावी.मुदतीनंतर व कोणत्याही पुराव्याशिवाय हरकत नोंदविल्यास अगर परस्पर वर्तमानपत्रात हरकत प्रसिध्द केल्यास, ती हरकत आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व वर नमूद मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याबाबतचा दाखला मिळकत मालकांना देण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस.

**नाशिक. दिनांक : २४/११/२०२४**

**समाधान एन. देवकर, अ‍ॅडव्होकेट**
ऑफीस-बी-२०५, मेघदूत शॉपींग सेंटर, सी.बी.एस., जिल्हा न्यायालयासमोर, नाशिक मो.नं.९७६६०५७९८८

## जाहीर नोटीस

नि.६ **अ‍ॅड.एन.बी.जाधव**

**दि.चौ.अर्ज क्र:४१/२०२४**

**दिंडोरी येथील मा.दिवाणी न्यायाधीश साहेब-क,स्तर दिंडोरी (पनाड साहेब) यांचे न्यायालयात...**

**श्रीमती.पारीबाई चिल्या भोये.** **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

अर्जदार हिचे पती मयत **चिल्या रतन भोये** यांचे **दि. २८/०१/२०२४** रोजी रा.घोडांबे, ता.सुरगाणा, जि. नाशिक येथे निधन झाले आहे. ते पी.डब्ल्यू.डी मध्ये मैल कामगार म्हणून कामाला होते, त्याचे पश्चात वर नमूद अर्जदार हे वारस आहेत. त्यांचे ठिकाणी पेन्शन मिळणेकामी वारस म्हणून नाव लावणेकामी पी.डब्ल्यू.डी अधिकारी सुरगाणा यांनी मे.कोर्टामार्फत वारस दाखल्याची मागणी केली आहे. बॉम्बे रेगुलेशन अ‍ॅक्टप्रमाणे मा.न्यायालयाकडून (Hership Certificate) मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांचे अर्जास अर्जदार यांना वारस दाखला देण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सबंधीतांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **३०** दिवसांत अगर **दि.२१/१२/२०२४** रोजी सकाळी ११:०० वाजता न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. अन्यथा हरकत नाही असे समजून अर्जदाराची मागणी ग्राह्य धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. **दि.२३/११/२०२४**

**सही/- दिवाणी न्यायालय क.स्तर, दिंडोरी** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक क.स्तर, दिंडोरी**

## जाहीर नोटीस

नि.०७, प्रोसेस जमा **अ‍ॅड. प्रवीण अर्जुन अहिरे सटाणा कोर्ट, ता. सटाणा जि. नाशिक**

सक्सेशन अर्ज नं.१२६/२०२४

**सटाणा येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो सटाणा यांचे कोर्टात.**

**१) श्री. त्र्यंबक नारायण माळी** वय ४८ वर्ष, धंदा-शेती.
**२) श्री. मुकेश नारायण माळी** वय ४८ वर्ष, धंदा-शेती. अर्जदार नं. १ व २ रा. ब्राह्मण हाटी, मुल्हेर, ता-बागलाण, जि. नाशिक. **अर्जदार**

**विरुद्ध**

**कुणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे मयत **बुधा देवसिंग माळी** यांचे कायदेशीर वारस असून अर्जदारांनी बॉम्बे रेगुलर अ‍ॅक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. सह दि. न्या. क. स्तर साो सटाणा यांचे कोर्टात, दिवाणी चौ.अर्ज दाखल केला असून मयत **बुधा देवसिंग माळी** यांचे मयतानंतर कायदेशीर वारस असल्याने अर्जदारांचे नावाने वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदरहू अर्जाच्या कामी अर्जदार यास वारस दाखला देणे कामी कोणाचीही काही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक **११/१२/२०२४** रोजीपावेतो अथवा तत्पूर्वी या न्यायालयात स्वतः अगर नेमून दिलेल्या वकिलामार्फत हजर राहावे व आपले म्हणणे मांडावे, मुदतीत आपले म्हणणे न मांडल्यास अगर गैरहजर राहिल्यास अर्जदाराच्या लाभात बॉम्बे रेगुलशेन अ‍ॅक्ट, १९२७ प्रमाणे हुकूम देण्यात येईल यांची नोंद घ्यावी कळावे.

**सही/- कामगिरी लिपिक दिवाणी न्यायालय, सटाणा** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, सटाणा**

## जाहीर नोटीस

नि.०९, प्रोसेस जमा **अ‍ॅड.प्रवीण अर्जुन अहिरे सटाणा, जि. नाशिक**

**जा.क्र.३३८९/२०२४ सक्सेशन अर्ज नं.१३०/२०२४**

**सटाणा येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर साो. सटाणा यांचे कोर्टात**

**१) श्री. रामदास जयराम माळी** वय-४५ वर्ष, धंदा-शेती.
**२) श्री. संतोष देवराम माळी** वय-३३ वर्ष, धंदा-शेती. **३) श्री. सुक्राम देवराम माळी** वय-३८ वर्ष, धंदा-शेती नं. १ ते ३ रा. वडेदिगर, पो- मुल्हेर, ता-बागलाण, जि-नाशिक. **अर्जदार**

**विरूध्द**

**१) राजाराम जयराम माळी** वय ५० वर्ष, धंदा-शेती. **सा.वाला**
**२) श्री.पाखरू देवराम माळी,** वय-३० वर्ष, धंदा-शेती. सा. वाले नं. १ व २ रा.वडेदिगर, पो-मुल्हेर, ता-बागलाण, जि.नाशिक.

ज्याअर्थी अर्जदार नं. १ सा.वाला नं. १ हे **जयराम देवीसिंग/देवसिंग माळी** यांचे मुले म्हणून कायदेशीर वारस आहेत. तर अर्जदार नं. २ व ३ व सा.वाला नं. २ हे **जयराम देवीसिंग/देवसिंग माळी** यांचे नातू म्हणून कायदेशीर वारस असून अर्जदारांनी बॉम्बे रेगुलर अ‍ॅक्ट अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. सह दि.न्या.क.स्तर साो!, सटाणा यांचे कोर्टात, दिवाणी चौ. अर्ज दाखल केला असून मयत **जयराम देवीसिंग/ देवसिंग माळी** यांचे मयतानंतर कायदेशीर वारस असल्याने अर्जदारांचे नावाने वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदरहू अर्जाच्या कामी अर्जदार यास वारस दाखला देणे कामी कोणाचीही काही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **दिनांक ११/१२/२०२४** रोजी पावेतो अथवा तत्पूर्वी या न्यायालयात स्वतःअगर नेमून दिलेल्या वकिलामार्फत हजर राहावे व आपले म्हणणे मांडावे. मुदतीत आपले म्हणणे न मांडल्यास अगर गैरहजर राहिल्यास अर्जदाराच्या लाभात बॉम्बे रेगुलशेन अ‍ॅक्ट VIII, १९२७ प्रमाणे हुकुम देण्यात येईल यांची नोंद घ्यावी कळावे.

**सही/- कामगिरी लिपिक दिवाणी न्यायालय, सटाणा** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय, सटाणा**

## जाहीर नोटीस

**अ‍ॅड. श्री. रमेश मोतीराम जाधव सटाणा कोर्ट, सटाणा ता. सटाणा, जि. नाशिक.**

**जा.क्र.३४३४/२०२४ दि.२१/११/२०२४**
**निशाणी नंबर ३३ चे आदेशान्वये पी.डब्ल्यू.डी.व्ही.अर्ज नंबर ६६/२०२२,** **प्रोसेस जमा**

**सटाणा येथील मे. न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम वर्ग यांचे न्यायालयात...**
**(श्रीमती पी. एच अहिरे यांचे न्यायालयात)**

**सौ. पुनम वैभव नहिरे** **अर्जदार**
**विरुध्द**
**श्री. वैभव वसंत नहिरे, वगैरे** **सा.वाला**

कारणे सदरचे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तमाम जनतेस/विशेष करुन सामनेवाला नं. **२. श्री. वसंत प्रभु नहिरे**, सामनेवाला नं. **३. सौ. दगुबाई वसंत नहिरे**, दोघे रा. बस स्टॅण्डच्या पाठीमागे, सोमपूर, ता. बागलाण, जि. नाशिक, सामनेवाला नं. **५ सौ. मृणाली यशवंत पगारे**, रा. पिंपरी चिंचवड, डांगे चौक पुणे, सामनेवाला नं. **६. सौ. वैशाली उर्फ सुनिता प्रविण भाटजिरे**, **द्वारा प्रविण मार्तंडराव भाटजिरे**, रा. भाजी मार्केट यार्ड शेजारी, मु.पो. घोटी, ता. इगतपुरी, जि. नाशिक यांना सदरचे जाहीर समन्स नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आपणाविरुध्द वर नमूद अर्जदार हिने सटाणा न्यायालयात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम १२,१७,१८,१९,२०,२२ अन्वये प्रकरण दाखल केले आहे. त्याकामी कोर्टात हजर राहुन आपण आपले म्हणणे मांडण्याकामी मे. कोर्टाने आपणास वेळोवेळी समन्स/नोटीस काढली असता आपण सामनेवाला नं. २ व ३ यांनी वरील पत्त्यावर दरवाजा बंद, घरास कुलूप, बाहेरगावी राहतात सबब समन्स/नोटीस बजावता आली नाही तसेच आपण सामनेवाला नं. ५ व ६ यांचा पत्ता अपूर्ण, सबब समन्स नोटीसीची बजावणी करता येत नाही. असा शेरा संबंधीत बजावणी अधिकारी यांनी मा. न्यायालयात दाखल केल्यामुळे प्रकरणाचे चौकशीचे कामकाज लांबणीवर पडत असल्यामुळे सदर जाहीर समन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरण **दि.०९/०१/२०२५** रोजी नेमले असून आपण न चुकता या दिवशी सकाळी **ठीक ११:०० वा.** हजर राहुन आपले म्हणणे मांडावयाचे आहे. याउपर आपण वर निर्देशित रोजी व वेळी गैरहजर राहिल्यास आपल्या गैर हजेरीत आपले काहीएक म्हणणे नाही असे गृहीत धरुन अर्जाचे पुढील कामकाज पार पाडण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे. आज **दि.२१/११/२०२४** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**सही/- कामगिरी लिपिक दिवाणी व फौजदारी न्यायालय प्रथम वर्ग, सटाणा** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय प्रथम वर्ग, सटाणा**

गांवकरी



## महत्त्वाचे

### ओझर पोलिस ठाण्यात सापाची एन्ट्री

**ओझर : वार्ताहर**

येथील ओझर पोलिस ठाण्यात सापाने एन्ट्री केली असता पोलिस निरीक्षक अरुण धनवडे यांनी सापाला पकडून जंगलात सोडून दिले. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास एचएएल टाऊनशिप वसाहतीत असलेल्या ओझर पोलिस ठाण्यात धामण जातीच्या सापाची एन्ट्री झाली होती. पोलिस ठाण्याच्या आवती भोवती भरपूर झाडी झुडपे आणि गवत असल्याने सरपटणारे प्राणी कायम नजरेस पडतात. परंतु आज चक्क धामण जातीच्या सापाने भेट मागच्या बाजूने पोलिस ठाण्यात प्रवेश केला. पोलिस कर्मचाऱ्यांच्या नजरेस पडल्याने साप साप असा एकच गोंधळ उडाला. गोंधळ झाला म्हणून पोलिस निरीक्षक अरुण धनवडे हेच बाहेर आले. त्यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट सापाच्या हालचालीवर लक्ष ठेवले. पोलिस ठाण्यात खाली फरशी असल्याने सापाला पळता येईना त्याचा फायदा घेत अरुण धनवडे यांनी न डगमगता त्याला पकडले. त्यासरशी सर्वांनी सुरक्षेचा नि:श्वास सोडला साप पकडून त्यांनी जंगलात सुरक्षितरित्या सोडून दिला.



**ओझर पोलिस ठाण्यात शिरलेल्या सापाला पकडताना पोलिस निरिक्षक अरुण धनवडे.**

### पारेगावला साईसिद्धी स्कूलमध्ये विविध स्पर्धा उत्साहात



**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील पारेगाव येथील साई सिद्धी लर्न स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध स्पर्धांचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत काकड, संचालिका प्रियंका काकड, तसेच मुख्याध्यापिका शितल महाजन आदिच्या हस्ते पंडित नेहरु तसेच सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका शीतल महाजन यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्व पटवून दिले. आसिफ पठाण यांनी विद्यार्थ्यांना पंडित नेहरुविषयी व त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगत स्पर्धा घेण्यात आल्या. बालदिनानिमित्त नर्सरी ते केजीची सहल आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता सांगळे यांनी केले.तर आभार आशिफ पठाण यांनी मानले.

### शस्त्र बाळगल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा

**जळगाव :** तालुक्यातील शिरसोली प्र. न. येथे गावठी कट्टा पाहत असताना त्यातून अचानक गोळी सुटल्याने ती थेट पोटात लागून एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवार, २१ रोज घडली होती. ही घटना ताजी असताना जळगाव शहरात पेट्रोलिंग करत असतांना पोलिसांनी एकाला गावठी पिस्तूल व मॅक्झिनसह ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून बत्तीस हजार रुपयांचे शस्त्र जप्त जप्त करण्यात आले आहे. या संशयित आरोपीविरोधात जळगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी संशयित आरोपीस ताब्यात घेवून त्याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उप निरीक्षक दत्तात्रय पोटे यांनी केली.

# सीमा हिरे यांचे भावी मंत्री म्हणून लागले बॅनर

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातुन मतदारांनी सलग तिसऱ्यांदा आमदारकीची गळ्यात माळ टाकत हॅट्ट्रिक केल्यामुळे नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी अतीशय मीतभाषी, जाणकार आणि मतदार संघाच्या विकासासाठी दूरदृष्टी असलेल्या सीमा हिरे यांची भावी मंत्री पदावर नियुक्ती व्हावी असे मतदार संघातील नागरिकांना वाटत आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सीमा हिरे यांच्या समर्थकांकडून नाशिक पश्चिम मतदार संघात 'भावी मंत्री' असा उल्लेख असलेले शेकडो बॅनर्स लावण्यात आले आहेत.**

नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार सीमा हिरे यांचे गणेश चौक, त्रिमूर्ती चौक, पाथर्डी गाव उत्तमनगर, पवननगर, इंदिरानगर, सातपूर, खुटवडनगर, माऊली लॉन्स परिसर, अंबड, पाथर्डी फाटा यासह विविध भागात मुख्य रस्त्यांवर चौका चौकात आमदार सीमा हिरेंच्या समर्थकांकडून सलग तीन वेळा आमदार म्हणून हॅट्रिक केल्याबद्दल शुभेच्छा तसेच 'भावी मंत्री' असा उल्लेख असलेले शेकडो शुभेच्छा फलक लावण्यात आले आहे. फलक लावून समर्थकांनी मंत्रिमंडळ विस्ताराच्या पूर्वीच आमदार सीमा हिरे यांना भावी मंत्री म्हणून शुभेच्छा दिल्या. यामुळे येत्या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आमदार सीमा हिरे यांची वर्णी लागण्याची शक्यता असल्याचे कार्यकर्त्यांकडून बोलले जात आहे.

आमदार सीमा हिरे यांनी गेल्या दहा वर्षाच्या आमदारकीच्या कालावधीत सातपूर, अंबड औद्योगिक वसाहतीतील अनेक बंद पडलेले छोटे मोठे प्रकल्प सुरु करुन रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न केले आहेत. त्याचप्रमाणे त्यांची राज्याच्या मंत्रीमंडळात वर्णी लागल्यानंतर अंबडसह सातपूर औद्योगिक वसाहतील विविध प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी मतदार संघातील सर्वानीच सीमा हिरे यांना शुभेच्छा दिल्या. सीमा हिरे यांची मंत्री मंडळात वर्णी लागली म्हणजे मतदारांच्या अपेक्षा पूर्ण होतील.




नाशिक शहरात भाजपाचे तीन आमदार असून यात आमदार सीमा हिरे या सलग तीन वेळा निवडून आल्या आहेत. त्यांचे कामकाज लक्षात घेता नाशिक लोकसभा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांना सहा विधानसभापैकी या पश्चिम विधानसभा मतदार संघातून मोठे मताधिक्य मिळाले आहे. त्यात यावेळी देखील सीमा हिरे या तब्बल ७० हजार मताधिक्यांनी निवडून आल्या. यामुळे आमदार सीमा हिरे यांचा शांत संयमी मनमिळावू स्वभाव व दांडगा संपर्क, कामकाजाची पद्धत लक्षात घेत यांना देखील मंत्रिपद मिळण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. नाशिक विधानसभा मतदार संघाची २००९ साली निर्मिती झाली त्यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडुन नितीन भोसले निवडून आले होते. त्यांनतर सीमा हिरे या २०१४ सलग दोन टर्म आणि आता तिसऱ्यांदा निवडून आल्याने त्यांनी हॅट्ट्रिक केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात आमदार सीमा हिरे यांची मंत्री म्हणून वर्णी लागणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# गाढवेलोळी मळा येथे बिबट्याला केले जेरबंद

### पिंजऱ्यात अलगद अटकला बिबट्या



**जुन्नर : शिवारातील गाढवेलोळी मळा येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (दि. २४) पहाटेच्या दरम्यान बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. जेरबंद बिबट्यास माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात हलविण्यात आले आहे.**

याबाबत माहिती अशी की, वडगाव आनंदच्या पिंपळगाव कालव्याच्या लगत असलेल्या गाढवीलोळी मळा येथे शनिवारी (दि. २३) पहाटे सुवर्णा शिंदे यांचे गोठ्यातील एक शेळी बिबट्याने ठार करत काही अंतरावर नेऊन फस्त केली होती.

या घटनेचा वनविभागाने पंचनामा करत ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत तातडीने बिबट्याने शेळी फस्त केलेल्या ठिकाणाजवळ पिंजरा लावला.

वनविभागाच्या या पिंजऱ्यात रविवारी पहाटेच्या दरम्यान बिबट्या जेरबंद झाला. जेरबंद बिबट मादी असून अंदाजे चार वर्षे वयाची असल्याचे आळे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनरक्षक कैलास भालेराव यांनी सांगितले.

आळे वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत असलेल्या आळे, संतवाडी, कोळवाडी, राजुरी, उंचखडक, वडगाव आनंद, पिंपरी पेंढार, काळवाडी, पिंपळवंडी, उंब्रज नंबर एक उंब्रज नंबर दोन या गावांमध्ये बिबट्यांचा उपद्रव लक्षात घेऊन त्यांना जेरबंद करण्यासाठी सुमारे २४ वर पिंजरे आजही कार्यरत असल्याची माहित वनपाल अनिल सोनवणे यांनी दिली.

### अक्राळे फाट्यावर मिळाला युवकाचा मृतदेह

**दिंडोरी : प्रतिनिधी**



**येथील एक युवकाचा मृतदेह नाशिक कळवण रोडवरील अक्राळे फाट्याजवळ कचराकुंडीत संशयास्पद स्थितीत आढळला. याबाबत दिंडोरी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. दिंडोरी पोलिस घटनेचा तपास करत आहे.**

नाशिक-कळवण रस्त्यावरील अक्राळे फाट्याचे अलीकडे दिंडोरी येताना वळणाजवळ रस्त्याचे कडेला टाकलेल्या कचऱ्यात एक युवकाचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला. पोलिसांनी तपास सुरू करताच हा मृतदेह हा शहरातील शिवाजीनगर येथील दीपक रमेश गांगोडे (वय २१) एक खाजगी कंपनीत काम करणाऱ्या युवक कामगाराचा असल्याची माहिती पुढे आली. पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांचे मार्गदर्शनाखाली दिंडोरी पोलिसांनी चौकशी सुरू केली असून उत्तरीय तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे कारण समजणार आहे.

## पुण्यातील विमानतळ नापासवरून पास

**पुणे : पुणे विमानतळावरील प्रवासी सुविधांच्या दर्जात दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे विमानतळ सेवा गुणवत्ता निर्देशांकात पुणे विमानतळ ७६ वरून ७४ व्या स्थानी आले आहे. असे असले तरी काही सुविधांमध्ये पुणे विमानतळाचा दर्जा घसरला आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे पुण्यातील असल्याने पुणे विमानतळावरील प्रवासी सुविधांमध्ये आणखी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

एअरपोर्ट्स कौन्सिल इंटरनॅशनलच्या वतीने सर्वेक्षण करून विमानतळ सेवा गुणवत्ता (एएसक्यू) निर्देशांक जाहीर केला जातो. यात देशातील १४ विमानतळांचा समावेश आहे. यंदा जुलै ते सप्टेंबर या तिमाहीतील सर्वेक्षणाच्या आधारे पुणे विमानतळ या निर्देशांकात ७४ व्या स्थानी आले आहे. पुणे विमानतळाला ५ पैकी ४.८४ गुण मिळाले आहेत. त्याआधीच्या एप्रिल ते जून तिमाहीत पुणे विमानतळ ७६ व्या स्थानी होते आणि विमानतळाला ४.८१ गुण मिळाले होते. त्यामुळे विमानतळावरील प्रवासी सुविधांचा दर्जा सुधारल्याचे समोर आले आहे. सेवा गुणवत्ता




निर्देशांकात विमानतळावरील ३१ महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यात प्रवेशद्वाराजवळ बसण्यासाठी आसने, प्रवाशांना सहजपणे त्यांचा मार्ग सापडणे, विमानांच्या उड्डाणाची माहिती व्यवस्थित मिळणे, विमानतळ ते टर्मिनल अंतर कमी असणे, विमानतळ कर्मचाऱ्यांची सौजन्यशीलता, वाय-फाय सेवा गुणवत्ता, चार्जिंग स्थानकांची उपलब्धता, मनोरंजन अथवा विश्रामासाठी पर्याय, स्वच्छतागृहे, आरोग्यासंबंधी सुरक्षिततेची काळजी, स्वच्छता आणि वातावरण या इतर गोष्टींचा समावेश आहे. पुणे विमानतळाचे स्थान जुलै ते सप्टेंबर तिमाहीत ३१ पैकी ३ सेवांमध्ये घसरले आहे. त्याआधी एप्रिल ते जून तिमाहीत पुणे विमानतळाचे स्थान १६ सेवांमध्ये घसरल्याने ते नापास ठरले होते. आता पुणे विमानतळाने पास होण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे.

## रुई येथे युवकाचा मारहाणीत मृत्यू

**लासलगाव : वार्ताहर**

**निफाड तालुक्यातील रुई येथे मंदिराजवळ का थुकले असे विचारल्याने ३८ वर्षीय युवकाला केलेल्या जबर मारहाणीत मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मयताचे नाव विकास शांताराम दुशिंग वय ३८ वर्ष आहे. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून २४ तासाच्या आत तीनही संशयितांना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती लासलगाव पोलिसांनी दिली आहे**

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.२० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वा चे सुमारास रुई ता. निफाड येथील पाटालगतचे समाज मंदिराजवळ विकास दुशिंग उभे असताना अजय भिमा बर्डे (वय-२१), रोहन रमेश माळी, (वय-२०), समाधान संजय पवार (वय-२१) सर्व रा. रुई, ता.निफाड जि. नाशिक हे मंदिराजवळ गुटखा खावून धुंकले. त्यावेळी तेथे हजर असलेला विकास यांनी याबाबत बोलल्याचा राग आल्याने त्यास मारहाण केली. तसेच संशयित २ व ३ यांनी जमिनीवर खाली पाडुन छातीवर पोटावर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत मयतास छातीस व पोटास गंभीर दुखापती झाल्याने त्याचेवर सिव्हील हॉस्पिटल नाशिक येथे उपचार चालू असताना तो दि. २४ नोव्हेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता मयत झाला.

याबाबत फिर्यादी गणेश दशरथ केदारे (वय-२५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात कलम गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीनही संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

# मोहम्मद रफींच्या सुरेल गीतांची सलग अकरावी मैफल रंगली

**नाशिक : लोकप्रिय गायक मोहम्मद रफी यांनी शेकडो गाण्यांमधून रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. सर्व प्रकारची गाणी त्यांनी गायली. त्यांची आनंदी गाणी लोकप्रिय ठरली तशीच युगुलगीते, विरहगीते देखील श्रोत्यांना भावली. अशाच सुरेल गाण्यांची खुदा भी आसमाँ से... ही अकरावी विनामूल्य मैफल काल रंगली.**

रफी यांच्या स्वरांची जादू अजूनही श्रोत्यांना खिळवून ठेवते. नव्या पिढीलाही त्यांची गाणी आवडतात. यंदा मोहम्मद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्ताने जानेवारीपासून सुरु असलेल्या या सुरेल मालिकेतील अकरावे पुष्प खुदा भी आसमाँ से... आयोजक गौरी पटेल व सूर शारदा म्युझिकल फाउंडेशनतर्फे गुंफण्यात आली. काल रविवारी सायंकाळी ६ वाजता शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कुर्तकोटी सभागृहात झालेल्या या मैफलीत मोहम्मद रफींनी गाऊन अजरामर केलेली अनेक लोकप्रिय गाणी रसिक श्रोत्यांना ऐकायला मिळाली. मेरे मेहबूब तुझे...,ये दिल तुम बिन कही..., वादा करले साजना..., रिमझिम के




गीत सावन..., ना ना करते प्यार..., दिल तेरा दिवाना है सनम आणि खुदा भी आसमाँ से... या गाण्यांना रसिकांची विशेष पसंती लाभली. मुख्य गायक घनश्याम पटेल यांच्या बरोबरच संजय डेरे, अजय पाटील, अमित गुरव या गायक कलाकारांनी रफींची सुमारे २५ गाजलेली गाणी सादर केली. त्यांना स्मिता पांडे, डॉ. रेखा सोनवणे, डॉ.अनिता पाटील, नीता पवार, गायत्री नायक या गायिकांनी स्वरसाथ दिली. यावेळी राकेश पांडे यांनी सूत्रसंचालन तर मनोहर कापडी यांनी ध्वनीसंयोजन केले.

### 'नो इन्ट्री' असल्याचे सांगितले; तरुणाला बेदम झोडपले

**पुणे :** विरुद्ध दिशेने कार चालवत आलेल्या कारचालकाला नो एन्ट्री असल्याचे सांगितले म्हणून चौघांनी एका तरुणाला बेदम मारहाण केली. लोखंडी वस्तूने मारहाण केल्याने तरुणाच्या डोक्याला जखम झाली आहे.

याप्रकरणी रणजित किशोर शिंदे (वय २८, रा. गंज पेठ) यांनी खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कारचालक, त्याचे तिघे साथीदार अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हा प्रकार शुक्रवारी (दि. २२) रात्री साडेबाराच्या सुमारास भारत ट्रॅव्हल्ससमोरील सार्वजनिक रस्त्यावर गणेश पेठ परिसरात घडला आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहे.

# पाठपुराव्यानंतर शिवडी रेल्वे गेट रस्ता सुधारणा

## निफाड-चांदवड मार्गावरील समस्यतून वाहनधारकांचा सुटकारा

**निफाड । प्रतिनिधी**

**निफाड चांदवड मार्गावरील शिवडी येथील मध्य रेल्वे गेटमधुन जाणाऱ्या रस्त्यात वेळोवेळी रेल्वे प्रशासनाच्या अंतर्गत कामामुळे खड्डे पडून रस्ता नादुरुस्त झाला होता. याबाबत उगाव शिवडी भागातील सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठविल्यामुळे अखेर रस्ता दुरुस्ती झाली आहे.**

निफाड चांदवड मार्गावर शिवडी रेल्वेगेटमधील रस्त्यावर मोठ मोठे खड्डे तयार झाले होते. या शंभर फुटातील रस्त्यावर खड्ड्यांमुळे वाहनधारकांची मोठी त्रेधातितपिट उडत होती. या रस्त्याच्या सुधारणेसाठी शिवडीचे माजी सरपंच प्रमोद क्षीरसागर, बाजार समितीचे माजी संचालक प्रभाकर मापारी, छोटुकाका पानगव्हाणे, दत्तात्रय सुडके, शिवा ढोमसे, शिवडी सोसायटीचे चेअरमन अ‍ॅड.रामनाथ शिंदे, विलासराव मंडलिक, मनसेचे तालुका सरचिटणीस



अब्दुल शेख, सरचिटणीस संतोष साबळे, स्वप्निल पानगव्हाणे, संदीप क्षीरसागर, अरुण क्षीरसागर, प्रमोद शिंदे आदींनी वेळोवेळी आंदोलने व निवेदने देऊन रस्ता दुरुस्तीबाबत पाठपुरावा केला होता. नुकताच हा स्ता डांबरीकरण केला आहे. त्यामुळे वाहनधारकांची होणारी त्रेधातिरपिट वाचली आहे. वाहनधारकांसह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे

# पोटच्या चिमुरडीला गळफास देत जन्मदात्रीनेही केली आत्महत्या

**जळगाव : शहरातील हरीविठ्ठलनगरमधील एका ३६ वर्षीय विवाहित महिलेने आपल्या राहत्या घराच्या तिसऱ्या मजल्यावर ८ वर्षीय चिमुडीला गळफास देऊन स्वतः गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना दि.२४ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास उघडकीस आली आहे. त्यामुळे जळगाव शहरात एकच खळबळ उडाली.**



सोनाली दीपक दाभाडे (वय ३६), तेजस्विनी दीपक दाभाडे (वय ८) असे मयत आई व मुलीचे नाव आहे. पती दीपक दाभाडे हे फॅब्रिकेशनचा व्यवसाय करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात आणि हरिविठ्ठलनगर भागात ते इतर दोन भावांसह वास्तव्याला आहेत. दीपक दाभाडे हे रविवार, दि.२४ रोजी नोव्हेंबर रोजी भावांसह नातेवाईक वारल्यामुळे भुसावळ येथे गेलेले होते. त्यांची पत्नी सोनाली दाभाडे व त्यांची मुलगी तेजस्विनी हे घरी एकटे होते. त्यांनी रविवारी सकाळी ९ वाजेनंतर मुलीला एका स्कार्फने गळफास देऊन स्वतः सोनाली दाभाडे यांनी दुसऱ्या स्कार्फने स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली.

दुपारी १२ वाजेच्या सुमारास पती दीपक दाभाडे व परिवार भुसावळ येथून घरी आले तेव्हा ही घटना उघडकीस आली. तिसऱ्या मजल्यावर पती दीपक दाभाडे गेले असता आतून दरवाजा लावून घेतलेला होता. तेव्हा दरवाजाला धक्का मारून आत गेल्यावर दोघांचे मृतदेह पाहताच त्यांना एकच धक्का बसला व त्यांनी हंबरडा फोडला.

नातेवाईकांनी तत्काळ जळगाव जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दोघांना दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्या दोघांना मृत घोषित केले. दरम्यान, आत्महत्या करण्याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. याबाबत रामानंदनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कमी बससंख्येमुळे पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांना मनस्ताप

**नाशिक : राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने प्रवाशांच्या सेवेसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असताना काही ठिकाणी मात्र बससेवा विस्कळीत होत आहे. नाशिक-पुणे बससेवा यापैकी एक. रविवारी सायंकाळी एक तासापेक्षा अधिक वेळ थांबूनही पुण्याला जाण्यासाठी प्रवाशांचा खोळंबा कायम होता.**

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने नाशिक-धुळे, नाशिक-बोरिवली, नाशिक-पुणे या मार्गांवर बसच्या फेऱ्या अधिक राहतात. विशेषत: नाशिक-पुणे ही बससेवा सातत्याने सुरू राहते. शनिवार-रविवार या आठवड्याच्या शेवटच्या दोन दिवसांमुळे, मतदान तसेच अन्य काही कारणांमुळे रविवारी मेळा बस स्थानकात पुण्याला जाण्यासाठी प्रवाशांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. परंतु प्रवाशांच्या तुलनेत बसची संख्या तसेच फेऱ्या कमी होत्या. स्थानकात काही बस उपलब्ध असताही त्या फेरीसाठी सोडल्या जात नव्हत्या.



खोळंबा झाल्याने किरण जाधव या प्रवाशाने भूमिका मांडली. जाधव हे पत्नीसह पुण्याला जाण्यासाठी रविवारी दुपारी चारनंतर स्थानकात आले. एक तासापेक्षा अधिक वेळ थांबूनही त्यांना शिवशाही, शिवनेरी, शिवाई यापैकी एकही मिळू शकली नाही. नोंदणी दालनाजवळ प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. फलाटावर उभ्या असलेल्या गाड्या आरक्षित असल्याचे सांगण्यात आले. अखेर सहा वाजेला त्यांना बस मिळाली. पुणे येथे नोकरी करणारे शनिवार आणि रविवारच्या सुटीनिमित्त नाशिकला आल्यावर पुन्हा रविवारी दुपारुन पुण्याकडे रवाना होतात. त्यामुळे इतर दिवसांच्या तुलनेत रविवारी पुण्याला जाणाऱ्यांची संख्या अधिक असते. अशी परिस्थिती असताना रविवारीच बससेवेला अधिक खोळंबा झाला. प्रवाशांवर तास्नतास बसची प्रतिक्षा करण्याची वेळ आली.



याविषयी विभाग नियंत्रक अरूण सिया यांनी माहिती दिली. बससेवेला खोळंबा झालेला नाही. जनशिवनेरी, शिवाई यांच्या फेऱ्या निश्चित आहेत. त्यासाठी आधीच नोंदणी केली जाते. अशा स्थितीत प्रवाशांची संख्या वाढल्यास जादा बस कुठून आणणार, असा प्रश्न त्यांनी केला. प्रवाशांना इतर बसपेक्षा शिवनेरी, शिवाईचा प्रवास हा आरामदायी वाटतो. ही अडचण केवळ रविवारी येते, असा दावाही सिया यांनी केला.

## महत्त्वाचे

### रविवारी वारली चित्रसहलीत कला - निसर्गप्रेमींना संधी !



**नाशिक: प्रतिनिधी**

फाउंडेशनतर्फे रविवार दि.१ डिसेंबर रोजी वारली चित्रसहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या सहलीत १५ पैकी फक्त ५ जागा बाकी आहेत. आदिवासी वारली जमातीची कला, परंपरा, निसर्गस्नेही व पर्यावरणपूरक संस्कृती, राहणीमान, साधीसोपी जीवनशैली यांचा जवळून परिचय व्हावा हा या एक दिवसीय सहलीचा उद्देश आहे. दि.२८ पर्यंत नावनोंदणी करता येईल. सकाळी ७ वाजता त्र्यंबकरोडवरील एबीबी सर्कल येथून सहलीला प्रारंभ होईल. चहा, नाश्ता, आदिवासी पद्धतीचे रुचकर भोजन, वातानुकूलित टेम्पो ट्रॅव्हलरने प्रवास यांचा समावेश आहे. जव्हार येथील दिव्य विद्यालयाला भेट देऊन नंतर रामखिंड येथे कागदी लगद्यापासून तयार होणाऱ्या कलात्मक वस्तू, तारपा - घांगळी वाद्यनिर्मिती, बोहाड्याचे मुखवटे, भिंतीवरील देवचौक, वारली चित्रशैली प्रात्यक्षिक अनुभवता येईल. दुपारी डहाणूजवळ रायतळी, गंजाड येथे वारली कलाकारांशी संवाद व पद्मश्री जीव्या सोमा मशे यांच्या कलादालनात त्यांच्या चित्रांचा आस्वाद घेता येणार आहे. याबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी संयोजक संजय देवधर यांच्याशी ९४२२२७२७५५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### हरी महाले

**सोग्रस : वार्ताहर**



हरी रावबा महाले (१०३) राहणार वडाळीभोई (ता. चांदवड) यांचे वृद्धपकाळाने नुकतेच निधन झाले. भास्कर महाले, लिलाबाई मोरे, मंदाबाई पोटे यांचे ते वडील सुशील महाले यांचे ते आजोबा होत.

### रामदास भुसारे

**विंचूर गवळी :**

येथील रामदास सखाराम पा. भुसारे (७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, चार मुली व नातवंडे असा परिवार होत व विंचू गवळी विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र भुसारे यांचे ते वडील होत.



# कांद्याचे बाजारभाव काही आठवडे टिकणार

**लासलगाव : वार्ताहर**
**आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजार पेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीसह जिल्ह्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये सध्या कांद्याच्या भावात चढउतार होत असून कांद्याचे बाजारभाव सरासरी दर ४,००० ते ५,००० रुपयांच्या दरम्यान आहेत. यातच खरिपातील कांद्याची आवक अजून वाढली नसून लेट खरिपातील लागवड घटल्यामुळे कांद्याचे बाजार भाव आणखीन काही आठवडे टिकण्याचा अंदाज आहे.**



आवकेत घट झाल्यामुळे सध्या बाजारात उपलब्ध कांद्याचे प्रमाण फारच कमी असून रब्बी व खरीप असे कांदा आवकेचे गणित असते.यंदा खरिपातील कांदा लागवड वाढली असली तरी पावसाने कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तसेच लेट खरिपातील कांदा लागवडीत ही घट झाली आहे.तर खरिपातील कांदा लागवड साधारणपणे जून व जुलै महिन्यात होत असते त्याची काढणी ऑक्टोबर पासून सुरू होते. परंतु यंदा जून आणि जुलै महिन्यात रोप लावण्यासाठी अनेक भागांमध्ये उपलब्ध झाले नव्हते. त्यामुळे लागवड उशिरा सुरू झाली. तर लेट खरिपाची लागवड सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात होत असून त्याची काढणी डिसेंबरनंतर होते. तर रब्बीची लागवड डिसेंबरनंतर होते व काढणी मार्चपासून सुरू होते.

**लेट खरीपाच्या लागवड क्षेत्रात घट**

राज्यात मागील हंगामात खरीपात २ लाख ८५ हजार हेक्टरवर कांदा लागवड झाली होती.परंतु यंदा लागवड वाढवून ३ लाख ८२ हजार हेक्टर वर पोहोचली. त्यामुळे लागवड क्षेत्र जवळपास एक लाख हेक्टरने वाढले होते. परंतु ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. खरीपातील लागवड वाढली असली, तरी लेट खरीपाची लागवड कमी झाली आहे. शिवाय गेल्या हंगामात लेट खरीपाची १ लाख ६६ हजार हेक्टर वर लागवड झाली होती. मात्र यंदा ५५ हजार हेक्टर एवढीच लागवड झाली आहे.

**येत्या आठवड्यांमध्ये खरीपाची आवक वाढणार**

गेल्या रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन घटल्याने यंदा बाजारातील आवक कमी आहे यामुळे सध्या रब्बीतील कांदा उपलब्धता कमी असून खरीपातील कांदा उशिरा येत आहे. ज्यामुळे बाजारात सध्या कांद्याची उपलब्धता कमी राहणार असून पुढील काही आठवड्यांमध्ये खरिपातील कांद्याची आवक वाढण्यास सुरुवात होईल अशी स्थिती आहे.

## वास्तुशांती आटपून घरी परतणाऱ्या कुटुंबावर काळाचा घाला

**लातूर :**

लातूरच्या उदगीर-नांदेड महामार्गावरील एकुरका गावाजवळ ट्रक आणि कारचा भीषण अपघात घडला आहे. या अपघातात कारमधील एकाच कुटुंबातील चार जणींचा जागीच मृत्यू झाला आहे. तर इतर तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त आहे. पाहुण्यांच्या घरी वास्तुशांती कार्यक्रमासाठी गेलेले कुटुंब घरी परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला आहे.उदगीर तालुक्यातील एकुरका जवळ टेम्पो आणि कारची धडक झाली आणि भीषण अपघात घडला. या घटनेत चार जणी जागीच ठार झाल्याची चटका लावणारी घटना दुपारी दोन वाजता घडली आहे. मंगलबाई गोविंद जाधव, वय ५५ राहणार एकुरका, प्रतिभा संजय भंडे वय ३० वर्ष राहणार दावणगाव, प्रणिता पांडुरंग बिरादार वय २५ राहणार होणाळी, अनन्या रणजित भंडे वय १४ वर्ष राहणार दावणगाव यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. चौघींचेही मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी उदगीर सामान्य रुणालयात दाखल करण्यात आले आहे. तर अन्य तीन जखमींवर देखील उपचार सुरू आहेत. तर या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहे. या घटनेमुळे दावणगाव गावावर शोककळा पसरली आहे.



# द्राक्ष बागाईतदार संघाला दिलेला शब्द पूर्ण करणार

### सत्काराप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवारांचे मनोगत

**निफाड : प्रतिनिधी**
**महाराष्ट्रात भाजपा शिवसेना राष्ट्रवादी महायुतीने निर्विवाद बहुमत मिळविल्याबद्दल महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे वतीने मुंबई येथे जाऊन सत्कार करण्यात आला यावेळी द्राक्ष बागाईतदारांना दिलेला शब्द पूर्ण करण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिले.**

राज्यात युतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा देवगिरी या शासकिय निवासस्थानी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलास भोसले, नाशिक विभागाचे मानद सचिव बबनराव भालेराव, नाशिक विभागाचे माजी अध्यक्ष ॲड. रवींद्र निमसे, संचालक बाळासाहेब वाघ रावसाहेब भोसले आदींनी भेट घेऊन सत्कार केल्या. यावेळी द्राक्ष बागाईतदारांच्या विविध निर्यात आणि देशांतर्गत बाजारपेठेच्या समस्यांबाबत आपण केंद्राकडे पाठपुरावा करुन सोडविण्या दिलेला शब्द पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.



लासलगाव : येथे महायुतीच्या विजयाचा जल्लोष साजरा करतांना लासलगाव मंडल भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते. (छाया : समीर पठाण)

# महायुतीच्या विजयाचा लासलगाव भाजपतर्फे जल्लोष

**लासलगाव : वार्ताहर**
**विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी,शिवसेना शिंदे गट,राष्ट्रवादी अजित पवार गट,आरपीआय यांच्या महायुतीने बहुमत संपादन केले.येवला विधानसभा मतदार संघांचे महायुतीचे अधिकृत उमेदवार मंत्री छगन भुजबळ यांनी मिळवलेल्या विजयाबद्दल लासलगाव मंडल भाजपच्या वतीने पेढे वाटून तसेच फटाक्यांची अतिशबाजी करून विजय साजरा करण्यात आला.**

यावेळी भाजपा जेष्ठ नेते प्रकाश दायमा, भाजपा नासिक जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा स्मिता कुलकर्णी, मंडलाध्यक्ष निलेश सालकाडे, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे महेश मोरे, जैनप्रकोष्ठ मंडळ अध्यक्ष प्रितेश आब्बड, मंडल युवा अध्यक्ष धनंजय वाघचौरे, भटके विमुक्त प्रदेश महामंत्री संपत नागरे, अल्पसंख्याक आघाडीचे भोला पवार, बूथ प्रमुख गणेश निकम, नलिनी सोनवणे, सोनाली कर्डिले, शैला सोनवणे, आरती सोनवणे, नलिनी जाधव, इंदुताई पवार, सविता पवार, ज्योती निकम, अनिता जाधव, चंद्रकला शिरसाठ, संगीता भागवत,प्रतिभा विसपुते, मोरे ताई, मीरा भागवत, रुबीना शेख, वृषाली देवढे, जयश्री भागवत, नलिनी जाधव, मनीषा लुटे, बाळू भागवत, समाधान मासुळे, उत्तम पवार,अनिल भागवत, किशोर देवढे, अनिल सोनवणे, तनपुरे दादा, गणेश जोशी, दीपक मोरे, सचिन बाकलीवाल, चेतन विसपुते, रोहित भागवत, समर्थ नागरे, हर्षद नागरे, वैभव भागवत, सागर मुंजाळ, निलेश जगताप नितिन राजोडे उपस्थित होते.

## राहुरीत निवडणुकीच्या वादातून गोळीबार : दोन जखमी

**उंबरे : वार्ताहर**
**निवडणुकीच्या वादातून राहुरी तालुक्यातील गुंजाळे येथे गोळीबारात दोन जण जखमी झाले आहेत. ही घटना रविवार दि. २४ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. भाऊसाहेब शिवाजी नवले व संजय शिवाजी नवले हे दोघे जखमी या गोळीबारात जखमी झाले आहे.**

याबात जखमी नवले यांनी सांगितले की, सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास आम्ही दोघे गुंजाळे बसस्थानकासमोर असणाऱ्या किराणा दुकानाजवळ उभे होते. यावेळी बाबा चेंडवाल, सोना चेंडवाल, संदीप चेंडवाल, अविनाश चेंडवाल यांनी येऊन आम्हाला शिवीगाळ करत दमदाटी केली. याचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यानंतर त्यांच्याकडे असणाऱ्या गावठी कट्ट्यातून गोळी झाडली.

ती गोळी भाऊसाहेब नवले यांच्या गुडघ्याला लागली. संजय नवले यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करून डोक्यात कुऱ्हाडीचा घाव घातला. या घटनेनंतर हल्लेखोर तेथून पसार झाले असल्याची माहिती जखमींनी दिली. तसेच विधानसभेच्या निकालानंतर रात्री हल्लेखोरांनी नवले यांना फोनवर शिवीगाळ करीत दमदाटी व तुझा बेत बघतो अशी धमकी दिली होती. असेही त्यांनी सांगीतले.

दरम्यान, स्थानिकांनी तातडीने जखमी नवले यांना नगर येथे तातडीने उपचारासाठी नेण्यात आले. जखमी नवले यांच्या पायाला गोळी लागली असून ती शस्त्रक्रिया करून काढण्यात येणार असल्याचे नातेवाईंकांनी सांगीतले. याघटनेची माहिती मिळताच राहुरीचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी सहकाऱ्यांना घेऊन घटनास्थळी भेट देऊन आरोपींना लवकरच ताब्यात घेतले जाईल असे सांगीतले.

# वारंगा मसाई येथे धारदार शस्त्राने शेतकऱ्याची हत्या

**हिंगोली :**
**कळमनुरी तालुक्यातील वारंगा मसाई येथे धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. कळमनुरी तालुक्यात असलेल्या वारंगा मसाई येथील शेतकऱ्याचा जांभरुण शेतशिवारात राहत असलेल्या आखाड्यावर कुऱ्हाडीने वार करून खून करण्यात आलाय. मात्र, खूनाचे कारण अद्यापही स्पष्ट झाले नाही.**

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात असलेल्या वारंगा मसाई येथील साहेबराव गिराम वय वर्ष (५५) हे आपल्या जांभरुण शिवारात असलेल्या शेतावर जागल करण्यासाठी गेले असता त्यावेळी त्यांचा खून करण्यात आला.

साहेबराव गिराम यांचा मुलगा सकाळी शेतात गेला असताना वडील रक्ताच्या थारोळ्यात पडलेले बघून मुलाची घाबरगुंडी उडाली. घटनेची माहिती देण्यासाठी घाबरलेला मुलगा कुटुंबियांकडे गेला. खून झाल्याची घटना गावकऱ्यांना कळताच ग्रामस्थांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. त्याचबरोबर कळमनुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत भिंगारे आदींच्या पथकाने देखील घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळाची पाहणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पोलिसांनी पाहणी केल्यानंतर मयत साहेबराव गिराम यांच्या डोक्यावर कुऱ्हाडी सारख्या शस्त्राने घाव घातल्याचा अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला गेला. पोलिसांनी आता आरोपीचा शोध घेण्यासाठी श्वान पथकाला देखील पाचारण केले असून या खुनाचं नेमकं कारण काय हे स्पष्ट झालेलं नाही. आता पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जातोय.

शेतात खूनाची घटना घडल्याने मोठी खळबळ निर्माण झालीये. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण बघायला मिळतंय. याप्रकरणीत पुढील तपास हा अधिकाऱ्यांकडून केला जातोय. ही खूनाची घटना नेमकी कधी घडली, याबद्दल अजून काही खुलासा होऊ शकला नाहीये. शेतामध्ये खून झाल्याचे कळताच ग्रामस्थांनी मोठी गर्दी केल्याचे बघायला मिळाले. या खूनाच्या घटनेनंतर आता विविध चर्चा या रंगताना दिसत आहेत.

# वंचित फॅक्टरचा मविआला धक्का, मराठवाड्यात मतटक्का गडगडला

**परभणी :**
**मागील निवडणुकीप्रमाणेच २०२४च्या विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारामुळे महाविकास आघाडीच्या निवडून येणाऱ्या तीन जागा पडल्या आहेत. गंगाखेड पाथरी आणि जिंतूर विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीमुळे महाविकास आघाडीला फटका बसल्याचे दिसून येत आहे. तर परभणी विधानसभा मतदारसंघात ऐनवेळी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याने महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे उमेदवार आमदार डॉ. राहुल पाटील यांना फायदा झाला आणि ते विजयी झाले. त्यामुळे मागील २०१९च्या लोकसभा विधानसभा निवडणुका आणि २०२४च्या लोकसभा आणि आता विधानसभा निवडणुकीतही वंचित बहुजन आघाडीमुळे महाविकास आघाडीला प्रचंड नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.**

परभणीच्या पाथरी विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार सुरेश वरपूडकर यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार राजेश विटेकर यांनी तगडे आव्हान दिले होते. लोकसभा निवडणुकीनंतर पाथरी विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचा म्हणजेच काँग्रेसचे सुरेश वरपूडकर सहज निवडून येतील असा विश्वास सर्वांनाच होता. पाथरी विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडी कडून इंजिनिअर सुरेश फड यांना सुरुवातीला उमेदवारी देण्यात आली होती. पण मतदानाच्या आधी दोन दिवस वंचित बहुजन आघाडीने राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार सईद खान यांना जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे बहुतांश मते ही सईद खान यांना मिळाली. या निवडणुकीत सैद खान यांनी ५४ हजार ६४७ मते घेतली आहेत. तर विजयी उमेदवार राजेश विटेकर यांनी ८३ हजार ७६७ मध्ये घेतली आहेत. तर माजी आमदार सुरेश वरपूडकर यांना ७० हजार ५२३ मते पडले आहेत.

आमदार राजेश विटेकर आणि काँग्रेसचे माजी आमदार सुरेश बोरकर यांच्यामध्ये केवळ १३ हजार मतांचा फरक आहे.



वंचित बहुजन आघाडीच्या पुरस्कृत उमेदवारांनी तब्बल ५४ हजार मते खाल्ल्याने महाविकास आघाडीच्या सुरेश वरपूडकर यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

अशीच परिस्थिती जिंतूर विधानसभा मतदारसंघाची देखील आहे. जिंतूर विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेल्या मेघना बोर्डीकर यांना एक लाख १३ हजार ४३२ मते मिळाली आहेत तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसकडून उभे असलेले माजी आमदार विजय भांबळे यांना एक लाख आठ हजार ९१६ मध्ये मिळाले आहेत. माजी आमदार विजय भांबळे यांचा केवळ सहा हजार मतांनी पराभव झाला आहे. तर याच निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक रिंगणात उभे असलेले सुरेश नागरे यांना तब्बल ५६ हजार ४७४ मते मिळाली आहेत.

वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर मते खाल्ल्यामुळे महाविकास आघाडीकडून उभे असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार माजी आमदार विजय भांबळे यांना पुन्हा एकदा अपयशाला सामोरे जावे लागले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतही वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी चांगली मते घेतल्यामुळे विजय भांबळे यांना ३००० मतांच् फरकाने पराभव पत्करावा लागला होता. आता त्याचीच पुनरावृत्ती २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत झाली आहे.

गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे चित्रही तशाच प्रकारचे आहे. गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाकडून निवडणूक रिंगणात दुसऱ्यांना उभे असलेले आमदार रत्नाकर गुट्टे यांना एक लाख ४१ हजार ५४४ मध्ये पडली आहेत. तर त्यांना कडवी झुंज देणारे महाविकास आघाडीचे शिवसेनेचे उमेदवार विशाल कदम यांना एक लाख १५ हजार २५२ मते पडली आहेत. विशाल कदम हे ३१ हजार मतांनी पराजित झाले असले तरी वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक रिंगणात उभे असलेल्या सिताराम घनदाट यांनी ४३ हजार २६ मध्ये खाल्ली आहेत. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर मते खाल्ल्याने महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

## महिलांच्या असामान्य कथांनी कृषीथॉनमध्ये शेतकरी प्रेरित

**नाशिक : प्रतिनिधी**
**बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, पुस्तकांचे हॉटेल चालविणाऱ्या भीमाबाई जोंधळे या साध्या महिल्या पण, माणसाचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्या संघर्ष कथा...झाडे लावण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या संगमनेरच्या दुर्गाताई तांबे, या सर्वांचा उपस्थितांशी संवाद... तसेच कृषीतील प्रयोगशील महिला उद्योजक व महिला शेतकऱ्यांचा सन्मानाने प्रदर्शनास उपस्थित शेतकरी बांधव भारावून गेले होते.**

निमित्त होते आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन कृषीथॉन-२०२४ चे. ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन व मीडिया एक्झीबिटर्स प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने हे पाच दिवसीय प्रदर्शन होत आहे. चौथ्या दिवशी रविवारी (दि.२४) प्रदर्शनास उस्फूर्त मिळाला. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी प्रदर्शनाला भेट दिली व कृषी उपकरण, तंत्रज्ञानाची माहिती घेतली. प्रदर्शनाच्या प्रथम सत्रात महिलांचा शेतीतील सहभाग हा कार्यक्रम झाला. यावेळी कृषीतील प्रयोगशील महिला उद्योजक व महिला शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राहीबाई पोपरे, भीमाबाई जोंधळे, दुर्गाताई तांबे, आयोजक संजय न्याहारकर, साहिल न्याहारकर, अश्विनी न्याहारकर व अंकिता न्याहारकर उपस्थित होते.

राहीबाई पोपरे यांनी आपला देशी वाणाचे बीज गोळा करण्याचा प्रवास सांगितला. या कामावर अनेकांनी टिका केली, पण हे ३० वर्षांपासूनचे काम थांबवले नाही. पूर्वी कष्टप्रद आयुष्य होते, पण आरोग्य चांगले असायचे. आता सर्व सोयी आल्या अन् आरोग्य गेले. म्हणूनच देशी वाणांसह सेंद्रिय शेती करावी. शेवटी जुने ते सोने आहे. शेती व प्रत्येक ताट विषमुक्त होण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. भीमाबाई जोंधळे यांनी एक कविता म्हणून दाखवली व सांगितले की, मी हॉटेलमध्ये ज्ञान व पोटाची भूक भागवते. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती, मतदान, डोहाळे जेवण व वाढदिवसाला मोफत पुस्तके देते. सर्वांनी पुस्तक वाचन चळवळीत सहभागी व्हावे.



**स्थानिक बाजारात चांगली द्राक्ष यावीत**

तिसऱ्या सत्रात द्राक्ष पीक परिसंवाद झाला. यात आत्माचे अभिमन्यू काशीद, राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख, कृषी उपसंचालक जगदीश पाटील, सह्याद्री फार्मचे संशोधन व विकासचे प्रमुख पंकज नाठे, फ्राटेली फ्रुट्स फार्मर प्रोड्युसर कंपनीचे चेअरमन अनंत मोरे, देहातचे वरिष्ठ व्यवस्थापक सुमित उगले, महाएफपीओ फेडरेशन ॲण्ड इ – कृषी (मार्केटिंगचे) डॉ. संजय पांढरे यांनी सहभाग घेतला. या तज्ज्ञांनी सांगितले की, जग भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून पाहत आहे अन् आपण द्राक्ष निर्यात करण्यावर भर देत आहोत. स्थानिक बाजारातही आपण उच्च दर्जाचे द्राक्ष पुरवायला हवेत. तसेच द्राक्ष पीकाचे प्रकार व दर्जा याबाबत ग्राहकांत जागृती व्हायला हवी. यातून ग्राहक वाढतील व शेतकऱ्याला अधिकचे पैसे मिळतील. यावेळी प्रयोगशील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना पुरस्कार वितरण झाले. प्रा. तुषार उगले यांनी सूत्रसंचालन केले.

**चांगल्या मातीने माणसास आरोग्य**

दुसऱ्या सत्रात कॅन बायोसिसचे सहाय्यक उपाध्यक्ष डॉ. प्रशांत पवार यांनी मातीचे आरोग्य व त्यामधील जीवाणूंचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, जिवाणू , माती व पिकांचा संबंध मानवी आरोग्याशी आहे. जिवाणू हे पिकांना अन्नद्रव्य देतात. त्यामुळे सकस अन्न तयार होते. ते मानवाचे आरोग्य राखते.

## महत्त्वाचे

### सिन्नरच्या गणेश पेठेतून दुचाकी पळवली

**सिन्नर : प्रतिनिधी**

शहरातील गणेश पेठ भागातून भरदिवसा चोरट्याने दुचाकी पळवून नेली. दिलीप अंबादास सोनवणे रा. कुंदेवाडी हे कामानिमित्त दुपारी शहरात आले होते. यावेळी त्यांनी आपली एचएफ डिलक्स दुचाकी क्र. एम. एच. १५-एफ. डब्ल्यू. ६९४४ ही मुत्रक फायनान्ससमोर उभी केली होती. मात्र, चोरट्याने संधी साधत तेथून दुचाकी पळवून नेली. दुचाकी चोरी गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर सोनवणे यांनी सर्वत्र शोध घेतला. कुठेही तपास न लागल्याने त्यांनी सिन्नर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अधिक तपास हवालदार महिरे करत आहेत.

### जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने १६ जणांवर गुन्हा दाखल

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील खंबाळे येथे १६ जणांमध्ये हाणामारी झाल्याने त्यांच्याविरोधात वावी पोलिस ठाण्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. खंबाळे येथील संशयित संदिप सिताराम आंधळे, शिवाजी केरु दराडे, मंगेश लहानु मोरे, मंगेश अशोक आंधळे, तुकाराम मनोहर आंधळे, भाऊसाहेब रंगनाथ खाडे, दर्शन चांगदेव खाडे, नवनाथ ज्ञानदेव खाडे, संदिप ज्ञानदेव खाडे, भारत संपत खाडे, प्रकाश शंकर खाडे, मधुकर विठ्ठल सुर्वे, शैलेश सुभाष आंधळे, सोन्या लहानू मोरे, राजाराम विश्राम खाडे यांच्यात आपसात मारहाण झाली. विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुशंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी लागु केलेल्या जमावबंदीच्या आदेशाचे त्यांनी उल्लंघन केल्याने पोलिस शिपाई विक्रम लगड यांच्या फिर्यादीवरुन वावी पोलिस ठाण्यात संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आहे. पुढील तपास हवालदार महाजन करत आहेत.

### ‘त्या’ दोघांना दिले खास गिफ्ट

**मुंबई :** ऑस्ट्रेलियात विस्फोटक खेळी करत गाबाचा घमंड मोडणारा भारताचा यष्टीरक्षक फलंदाज म्हणजे ऋषभ पंत. जीवघेण्या अपघातातून सावरल्यानंतर पंतने ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या पहिल्याच कसोटीत संघासाठी पहिल्या डावात महत्त्वपूर्ण खेळी केली. पण एक वेळ अशी होती की ऋषभ पंत पुन्हा क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन करणार की नाही, याबाबत सर्वांनाच शंका होती. याचं कारण म्हणजे पंतचा जीवघेणा अपघात. ३० डिसेंबर २०२२ हा दिवस ऋषभ पंतसाठी एखाद्या दुस्वप्नासारखा ठरला. याच दिवशी ऋषभ पंतचा रस्ते अपघात झाला होता. पंत दिल्लीहून डेहराडूनला आपल्या घरी जात होता. त्यावेळेस त्याची कारदुभाजकाला धडकली आणि त्यानंतर कारला आग लागली. अपघात होऊनही ऋषभ पंतने मृत्यूला हरवलं आणि साखर कारखान्यात काम करणारे दोन जण त्याच्यासाठी देवदूत बनून आले. रजत आणि निशू अशी या दोघांची नावे असून त्यांनी वेळीच पंतला कारमधून बाहेर काढलं आणि रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेले. या दुर्घटनेतून वाचल्यानंतर ऋषभ पंतने दोघांना खास गिफ्ट दिलं आहे.

# लोकसभा निवडणुकीत लिहिलेली स्क्रीप्ट विधानसभेत उतरली!

## ‘भाऊ खासदार, साहेब आमदार’ ; कार्यकर्त्यांनी ठरवलं आणि करून दाखवलं

**सिन्नर : भरत घोटेकर**

**'भाऊ खासदार, साहेब आमदार' अशी टॅग लाईन लोकसभेच्या निवडणुकीत सिन्नरकरांनी फिक्स केली. आणि पारंपरिक विरोधक वाजे लोकसभेत गेल्याने आपला मार्ग मोकळा होईल, या अपेक्षेने आमदार माणिकराव कोकाटे यांच्या गटाने पूर्ण ताकदीनिशी राजाभाऊ वाजे यांना मदत करत त्यांना लोकसभेत पाठवले. तर विधानसभेच्या निवडणुकीत वाजे गटाने मतदान रुपी आशीर्वाद कोकाटे यांच्या पारड्यात टाकत लोकसभेत केलेल्या मदतीची परतफेड केली. साहजिकच, त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार उदय सांगळे एकाकी पडले आणि कोकाटे पाचव्यांदा विधानसभेत पोहोचून त्यांनी विजयाचा इतिहास रचला. अर्थातच विधानसभा निवडणुकीची स्क्रिप्ट लोकसभेतच लिहिली गेली आणि ती प्रत्यक्षात उतरल्याची अनुभूती सिन्नरकरांनी घेतली.**

लोकसभेच्या निवडणुकीत राजाभाऊ वाजे यांना खासदारकीपर्यंत पोहोचविण्यासाठी कोकाटे समर्थकांनी मोठी भूमिका बजावली होती. राजकीय मतभेद बाजूला ठेवत कोकाटेंच्या कार्यकर्त्यांनी माणिकराव कोकाटे यांना संयमाचा सल्ला दिला. त्यातूनच 'तुमचा खासदार, आमचा आमदार' असा नारा देत वाजे कोकाटेंच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या हातात हात घालून प्रचार करत वाजे यांना लोकसभेत पाठवले. त्याचवेळी ऐन लोकसभा निवडणुकीत उदय सांगळे यांनी राजाभाऊ वाजेंना सोडचिठ्ठी देत मांडलेला सावता सुभा वाजे गटाच्या पचनी पडला नव्हता. त्यामुळे विधानसभेत वाजे गटाकडून कोकाटे गटाने केलेल्या मदतीची परतफेड कर ण्याची व्यूहरचना आखली गेली. शिवाय सांगळे यांनी खासदारांना डावलून आणलेली उमेदवारीही वाजे गटाला ठेच पोहोचवणारी ठरली. असे असले तरी खासदार वाजे यांनी आघाडीचा धर्म निभावून सांगळे यांच्या प्रचारात स्वतः ला झोकून दिले. मात्र, राजाभाऊ महाविकास आघाडीबरोबर असले तरी त्यांचे कार्यकर्ते मात्र सांगळे यांच्या प्रचारात सक्रिय झालेच नाही. त्यामुळे कोकाटे यांना विधानसभेची निवडणूक सोपी झाली. निवडणुकीच्या निकालातून त्याची जाणीवही कोकाटे गटाला झाली. आणि त्यामुळेच मतदानानंतर आणि मतमोजणीनंतर झालेल्या भर सभेत आमदार माणिकराव कोकाटे यांनी खासदार वाजे यांचे वडील 'किंगमेकर' प्रकाशभाऊ वाजे आणि खासदारांच्या पत्नी दीप्ती वाजे यांच्यासह मदत करणाऱ्या सर्वच वाजे समर्थकांचे जाहीर आभार मानले. सिन्नरच्या राजकारणात मराठा - वंजारी हे जातीय समीकरणही निवडणुकीचा 'निकाल' लावण्यास महत्त्वाचे ठरले. मराठा मतदार अधिक असलेल्या भागांमध्ये कोकाटेंनी, तर वंजारी समाजाची मते अधिक असलेल्या गावांमध्ये उदय सांगळे यांना मिळालेल्या आघाडीने त्यावर शिक्कामोर्तब केले. सिन्नरच्या राजकारणात प्रकाशभाऊ वाजे यांची भूमिका नेहमीच ‘किंगमेकर’ची ठरली. लोकसभा निवडणुकीपूर्वीच सांगळे यांच्या बॅनरवरून राजाभाऊ वाजे यांची छबी गायब झाली होती, हे त्यांचे समर्थक विसरले नव्हते. वाजे यांच्याशिवाय पर्याय नाही हे सांगळे यांना अवगत असल्याने त्यांनी प्रत्येक सभेत वाजेंच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात काम करण्याची ग्वाही दिली. मात्र वाजे यांच्या कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामकाजात कुठेही सामावून घेतले नाही. दोन्ही गटांकडून वाजे कुटुंबाला केंद्रस्थानी ठेवण्यात आले होते. लोकसभेच्या निवडणुकीत वाजे यांच्यापासून दूर राहिल्याची किंमत सांगळे यांना पराभवाच्या रूपाने विधानसभेच्या निवडणुकीत मोजावी लागली.



**सिन्नर : सिन्नरला वाजे यांच्या 'शिवबापूर' या निवासस्थानी भेट घेतल्यानंतर वडील प्रकाशभाऊ वाजे यांच्या उपस्थितीत आमदार माणिकराव कोकाटे यांचा सत्कार करताना खासदार राजाभाऊ वाजे.**

### सांगळे यांच्या प्रतिकूल बाजू

■ कोकाटेंनी कागदोपत्री विकास केल्याचा मुद्दा मतदारांना भावला नाही. ■ वाजे समर्थकांचे मन वळविण्यात आलेले अपयश. ■ कोकाटेंच्याच वचननाम्याची भाषणातून होणारी पुनरावृत्ती. ■ मराठा समाजाच्या तुलनेत कमी असलेली वंजारी समाजाची मते. ■ सिन्नर शहरात असलेला कनेक्टिव्हिटीचा अभाव.

### या बाबी ठरल्या निर्णायक

■ सिन्नरकरांना दूरदृष्टी असलेल्या कोकाटे यांचा विकास भावला. ■ खासदार वाजे समर्थकांची झालेली मदत. ■ लाडकी बहीण योजना, कृषी पंपांची वीज बील माफी ■ सिन्नरच्या अवर्षणग्रस्त पूर्वभागात बंदिस्त पूरचाऱ्यांचे पाणी फिरल्याने 'जलदूत' म्हणून तयार झालेली प्रतिमा. ■ प्रशासकीय मान्यता मिळालेल्या नदीजोड प्रकल्पामुळे देवनदी बारमाही प्रवाहित होण्याची शेतकऱ्यांना लागलेली आस. ■ जातीय समीकरणात मराठा समाजाची अधिक संख्येने असलेली मते. ■ कन्या सीमंतीनी कोकाटे हिची शहराबरोबरच ग्रामीण भागातील जनतेशी घट्ट झालेली नाळ.

### आता सिन्नरकरांना मंत्री पदाची आस

गेल्या सहा महिन्यांत उपमुख्यमंत्री अजित पवार तीन वेळा सिन्नरला येऊन गेले. त्या प्रत्येक भेटीत कोकाटे यांना मोठे मताधिक्य देऊन पुन्हा आमदार बनवा, मी त्यांना मंत्रिपद देतो, हा दादाचा वाद असल्याचे पवार यांनी निक्षून सांगितले होते. त्यामुळेच निवडणूक निकालाच्या दोन दिवस अगोदरच मतदार संघात कोकाटे मंत्री झाल्याचे बॅनर झळकले. निकालानंतर आता ‘आम्ही आमचे काम केले, दादा, आता तुम्ही जबाबदारी पार पाडा’. अशा भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त केल्या जात आहे.

## ठाणगावला दहशत माजवणारा बिबट्या जेरबंद

### आजारी बिबट्या उपचारासाठी नाशिकला रवाना

**ठाणगाव : वार्ताहर**

**ठाणगाव - आडवाडी रस्त्यावर रेवगडे मळ्यात दहशत माजवणाऱ्या बिबट्याला तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. शनिवारी (दि.२३) वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दोन वेळेस जाळी लावून बिबट्याला पकडण्याचा प्रयत्न केल्यानंतर तो अयशस्वी ठरला. त्यानंतर तिसऱ्या प्रयत्नात बिबट्या जाळीत अडकल्यानंतर ट्रँक्युलायझर गनने त्याला बेशुद्ध करत जेर बंद केले.**

शनिवारी ठाणगाव येथील पोपट कारभारी रेवगडे यांच्या मालकीच्या शेतात गट नंबर ७/अ मधील ज्वारीच्या शेतात अंदाजे दोन ते अडीच वर्षाचा बिबट्या आजारी अवस्थेत असल्याचे ठाणगाव येथील वन कमिटीचे अध्यक्ष रोहिदास रेवगडे यांना आढळून आले. त्यांनी वनविभागाला कळवल्यानंतर उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, सहाय्यक वनसंरक्षक निर्भवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक येथील इको इको टीम, वन परिमंडळ अधिकारी एस. पी. झोपे, पी. जी. बिन्नर, गोरख पाटील, किरण गोरडे, नीलेश निकम, वन कर्मचारी रोहित लोणारे, वसंत आव्हाड यांनी घटनास्थळी येत बिबट्याला पकडण्यासाठी रेस्क्यू केले. रेवगडे यांच्या ज्वारीच्या शेताला जाळी लावून वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट्याला पकडण्याचा दोन वेळा प्रयत्न केला. मात्र बिबट्या जाळीवरून उडी मारून निघून गेला. तिसऱ्या वेळेस मात्र तो जाळीत अडकल्यानंतर त्याला बेशुद्ध करून ताब्यात घेण्यात आले. वन विभागाचे कर्मचारी, वनमजूर वसंत आव्हाड, सूर्यभान पाटोळे, भारत गांगड, सखाराम मेंगाळ, काशिनाथ कातोरे यांनी बिबट्याला पकडून देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. आजारी बिबट्या रेस्क्यू केल्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी नाशिक येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले. ठाणगाव - आडवाडी रस्त्यावर गेल्या चार-पाच दिवसांपासून दिवसा आणि रात्री बिबट्याचे सातत्याने दर्शन होत होते. या परिसरातील कुत्र्यांवरही हल्ले करून बिबट्याने फस्त केले होते. शनिवारी रेवगडे यांच्या घराच्या बाहेर बिबट्या आढळून आल्यानंतर त्याला पकडण्यासाठी तात्काळ वन विभागाला पाचारण करण्यात आले.



**ठाणगाव : येथे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पिंजऱ्यात जेरबंद केलेला बिबट्या.**

## आमदार कोकाटे यांनी घेतले ‘किंगमेकर’ प्रकाश वाजे यांचे आशीर्वाद

### खासदार वाजे यांच्याकडून कोकाटे यांचा सत्कार

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नर विधानसभा मतदार संढाचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी रविवारी (दि.२४) सकाळी खासदार राजाभाऊ वाजे यांच्या निवासस्थानी जात तालुक्याचे ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ वाजे यांचे आशीर्वाद घेतले. त्यांनी निवडणुकीत केलेल्या मदतीबद्दल आभारही मानले. दरम्यान, खासदार राजाभाऊ वाजे यांनीही आमदार माणिकराव कोकाटे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत शुभेच्छा दिल्या. दरम्यान, वाजे - कोकाटे यांच्या जवळीकीने पराभूत उमेदवार उदय सांगळे यांचे समर्थक कमालीचे अस्वस्थ झाले असून त्यांच्याकडून खासदार वाजे यांना गाव बंदीचे फलक काही गावात लागले आहेत.**

विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत खासदार वाजे आघाडी धर्म पाळत उदय सांगळे यांच्यासाठी प्रचारात सक्रिय होते. मात्र, ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ वाजे यांनी आपल्याला मदत केली असल्याचे आमदार कोकाटे यांनी मतदानाच्या दिवशी झालेल्या आभार मेळाव्यात आणि मतमोजणी नंतरच्या विजयी सभेत स्पष्ट केले होते. विधानसभेच्या निवडणुकीत वाजे कुटुंब दोन्ही उमेदवारांच्या केंद्रस्थानी राहिले होते. रविवारी सकाळी आमदार कोकाटे यांनी सिन्नर शहरात येत खासदार वाजे यांचे निवासस्थान गाठले. तेथे ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ वाजे यांचे त्यांनी आभार मानत आशीर्वाद घेतले. जिल्हा परिषदचे माजी बांधकाम सभापती ॲड. राजेंद्र चव्हाणके, बाजार समितीचे सभापती शशिकांत गाडे यांच्यासह कोकाटे व वाजे यांचे निकटवर्तीय यावेळी उपस्थित होते.



**खासदार राजाभाऊ वाजे यांना गाव बंदीचे वडझिरे गावात लागलेले फलक.**

### गद्दारीचा उल्लेख अन् खासदारांना ‘गाव बंदी’चे फलक

महाविकास आघाडीचे उमेदवार उदय सांगळे यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी खासदार राजाभाऊ वाजे यांना 'गद्दार' संबोधत त्यांना गावबंदी केल्याचे फलक काही गावात लागले आहेत. त्यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण कलुषित झाले आहे. वाजे यांनी सांगळेंचे काम न केल्याने पराभव झाल्याचा आरोप वंजारी बहुल गावांमधून होऊ लागला आहे. दुसरीकडे वाजे समर्थकांनी मात्र या प्रकाराचा खरपूस समाचार घेत ज्या वाजेंनी तुम्हाला जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद दिले, त्यांना तुम्ही संपवण्यासाठी निघाल्याचे नमूद करत जशास तसे उत्तर दिले आहे.

### कोकाटे बैठकीसाठी मुंबईत रवाना

रविवारी (दि.२४) दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नवनिर्वाचित आमदारांची बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलावली होती. या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी आमदार कोकाटे हे खासदार वाजे यांच्या निवासस्थानातून थेट मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते.

## वादातून वर्गमित्राचा गळा चिरला

**पुणे :** पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शाळेतील वादातून वर्गात विद्यार्थ्यांचा गळा चिरल्याची घटना घडली आहे. नववीतील विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाला तो वाद विकोपाला आणि हा प्रसंग जिवावर बेतला आहे. शाळेतील वार्षिक समारंभावरुन वादावादी झाल्यानंतर नववीतील विद्यार्थ्याचा वर्गातच काचेच्या तुकड्याने गळा चिरल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हडपसर भागातील मांजरी भागतील एका शाळेमध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी १४ वर्षीय मुलावर हडपसर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. याघटनेत १५ वर्षीय मुलगा जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, मांजरीतील एका शाळेत तक्रारदार मुलगा नववीत शिकायला आहे. गुन्हा दाखल झालेला मुलगा देखील त्याच्याच वर्गात शिकायला आहे. शाळेत वार्षिक समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे. या वार्षिक समारंभाच्या आयोजनावरुन दोघांमध्ये वाद झाला होता. मंगळवारी अडीचच्या सुमारास जखमी मुलगा वर्गात बसलेला होता. तेव्हा आरोपी मुलगा अचानक पाठीमागून आला. त्याने काचेच्या तुकड्याने त्याच्या गळ्यावर वार केला. या घटनेत तो जखमी झाला. मुलगा गंभीर जखमी झाल्यानंतर वर्गात मुले घाबरली. एकच गोंधळ उडाला. मुलांनी शिक्षकांना घटनेची माहिती दिली. शिक्षकांनी मुलाला तत्काळ रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर हडपसर पोलिसांना घटनेची माहिती दिली. गळ्यावर वार केल्यानंतर देखील तो त्याला धमकावत होता. त्याला जिवे मारण्याची धमकी दिली. पोलिसांनी याप्रकरणी १४ वर्षीय मुलाला ताब्यात घेतलं आहे. हडपसर पोलीस या घटनेचा संपूर्ण तपास करत आहेत. या शाळेतील आणखीन कोणाला अशा पद्धतीने दमदाटी केली जात आहे का याचा देखील विचार पोलीस करत आहेत.

वार्षिक समारंभाच्या आयोजनावरुन दोघांमध्ये वाद झालेला होता. मंगळवारी (१९ नोव्हेंबर) दुपारी अडीचच्या सुमारास मुलगा वर्गात बसलेला असताना त्याचवेळी वर्गातील दुसरा मुलगा पाठीमागून आला. त्याने काचेच्या तुकड्याने त्याच्या गळ्यावर वार केला. या घटनेत तो जखमी झाला. त्यानंतर तत्काळ जखमी मुलाला रूग्णालयात दाखल करण्यात आले, पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली आहे.

## निफाडच्या गढीचे दिलीप बनकर तिसऱ्यांदा शिलेदार

### यतीन कदम : बाळासाहेब क्षीरसागरांच्या भूमिकांही ठरल्या निर्णायक!

**निफाड : प्रतिनिधी**

**निफाडचे राजकारणात विजयापेक्षा पराभवाचे गणित मांडत डावपेच आखले जातात हे पुनश्च एकदा अधोरेखित झाले आहे कधीकाळी सहकारात वरचष्मा असलेल्या निफाड विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार दिलीप बनकर १२०२५३ मते मिळवत तिसर्यांचा विजय संपादीत केला. प्रतिस्पर्धी शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे अनिल कदम (९१०१४) यांचेवर तब्बल २९२४३ मतांची आघाडी घेत चितपट केले आहे या निकालाचे सारांशाला राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच भाजपाचे यतीन कदम, मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या स्पष्ट भुमिका विजयाचा मार्ग प्रशस्त करण्यात पोषक ठरल्या आहेत.**

निफाड विधानसभा निवडणुकीचे रण तापण्यापुर्वीच अनिल कदमांनी मतदारसंघ बळीराजा संघर्ष यात्रेच्या माध्यमातुन पिंजुन काढला होता त्यानंतर उमेदवारी मिळविण्यात सरशी घेतली होती निष्ठावान या बँनरखाली कदमांनी प्रचाराचा श्रीगणेशा केला मतदारसंघ दुसर्यांदा पिंजुन काढत वाडी वस्त्यांवर प्रचार करत मोठी वातावरण निर्मिती केली यात तरुणांचा सहभाग दिसत होता मात्र निवडणुक जस जशी रंगात येत होती तसतसे वातावरण बदलत होते शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष दिलिप मोरे यांनी उघडपणे राजीनामास्त्र वापरत आमदार दिलीप बनकरांचे समर्थन केले दरम्यानचे कालावधीत भाजपाकडुन उमेदवारी मिळणारच या प्रेरणेतुन यतीन कदम यांनीदेखील निफाड मतदारसंघात भाजपा कार्यकर्त्यांसह मतदारांच्या भेटीगाठी घेऊन विधानसभा लढण्याची पायाभरणी केली होती उमेदवारी वाटपाच्या स्पर्धेत आपल्या कार्यकर्त्यांसह सुमारे दोनशे गाड्यांचा ताफा घेऊन मुंबई येथे ठाण मांडले.

भाजपा नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार सुनील तटकरे यांच्या भेटी घेऊन उमेदवारीचा सस्पेन्स वाढविला होता पुनश्च एकदिवशीय सर्वेअंती राष्ट्रवादी अजित पवार गटाकडुन विद्यमान आमदार दिलीप बनकरांना उमेदवारी जाहिर झाली. यतीन कदमांनी कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. अखेरच्या क्षणी पक्षनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाला शिरसांवंद्य मानत उमेदवारी न करण्याचा निर्णय यतीन कदमांनी घेतला त्याचवेळी उबाठा गटाचे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला होता पाठिंब्याबाबत यतीन कदमांनी कार्यकर्त्यांचा मेळावा घेत प्रस्तावित उमेदवारांबाबत भुमिका स्पष्ट करतांना महायुतीचा घटक पक्ष म्हणुन राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दिलीप बनकर यांना निवडुण आणण्याचा दृढनिश्चय केला.

पिंपळगांव बसवंत येथे अनिल कदमांच्या प्रचारार्थ शरद पवारांची झालेली सभा अन सभेत पवारांकडुन दिलीप बनकरांबाबत अवाक्षरही न काढल्याबाबत सोशल मिडीयात झालेले ट्रोलींग चांगलेच गाजले प्रचार अखेरच्या टप्यात आला.

असतांना संजय राऊतांची निफाडला झालेली सभा फार परिणामकारक ठरली नाही. शरद पवारांनी प्रचारसभा घेतलेल्या मैदानात आमदार दिलिप बनकर यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सभेला झालेली गर्दी यतीन कदमांचे रोखठोक भाषण जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांची व्यासपीठावर उपस्थिती व जाहिर पाठिंबा यामुळे दिलीप बनकरांच्या राजकिय गणितात बेरीज होत गेली प्रचारातील मुद्यांमध्ये अनिल कदम हे डी पी आमदार अन जागेवर प्रश्न सोडविण्यात पारंगत अशी छबी निर्माण केली गेली तद्वतच विद्यमान आमदार दिलीप बनकर यांची प्रचारयंत्रणा सुत्रबध्द वाटचाल करत होती सायखेडा परिसरातील गावांतील वंजारी समाजाचे प्राबल्य लक्षात घेता भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांची झालेली सभा व त्यास मिळालेला प्रतिसाद बनकरांच्या विजयाचा मार्ग प्रशस्त करुन गेला कारण सभेबरोबरच गोदाकाठच्या गावांचा महत्वाचा प्रश्न असलेल्या नांदुरमधमेश्वर धरणाच्या गेटबाबत केलेले काम हे गोदाकाठच्या जनतेवरील जलसंकट कायमचे दुर करणारे ठरले असल्याने विद्यमान आमदार व सरकारबाबत जनमत सकारात्मक होण्यास पोषक ठरले.

गावागावात शासनामार्फत आमदार निधीतुन केलेली कामे याचा लेखाजोखा प्रचारातुन मांडला जात होता शिवाय टिम बी कडुन प्रचारादरम्यान लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळाल्याबाबतची पडताळणी हे महिला मतदारांना जाणीव करुन देणारे मुद्दे, कृषी पंपांची विजबिल माफी, पिक विमा, नुकसानभरपाई या मुद्यांचा प्रभावही या मतदानातुन दिसुन आला. हि विधानसभा निवडणुक आमदार दिलीप बनकर व माजी आमदार अनिल कदम यांचेतील चौथी लढत होतीया निवडणुकीतील विजयाने विद्यमान आमदार दिलीप बनकर हे तिसर्यांदा प्रतिनिधित्व करत आहेत. बनकर कदम यांचेतील सामना घासुन होईल असे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात मात्र दिलीप बनकरांना मिळालेले २९२४३ मतांधिक्य हे केंद्रात व राज्यात असलेल्या सरकारची जनहितकारी धोरणे,विरोधी पक्षांमध्ये निवडणुकीपुर्वीच होत असलेल्या मुख्यमंत्री पदाबाबतच्या कुरबुरी, सत्ताधार्यांविरोधात वैयक्तिक टिका टिप्पणी पलिकडे विकासाचा हरविलेला अजेंडा हेदेखील घटक बनकरांना विजयी आघाडी वाढविण्यास पोषक ठरले आहेत.

विद्यमान आमदार दिलीप बनकरांचा विजयाचा वारु वेगवान करण्यासाठी भाजपाचे यतीन कदम, मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, शिवसेना शिंदे गटाचे सहसंपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ, शिवसेना तालुकाध्यक्ष अनिल कुंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे, सतिष मोरे, मविप्रचे संचालक शिवा पा गडाख, सिध्दार्थ वनारसे, जगन्नाथ कुटे, निफाडच्या नगराध्यक्षा डॉ कविता धारराव नगरसेवक सागर कुंदे, दिलिप कापसे, उगांवचे छोटुकाका पानगव्हाणे, माधवराव चव्हाण, ज्ञानेश्वर पानगव्हाणे,नंदु सांगळे, गणपतराव हाडपे, अण्णासाहेब मुरकुटे, गुलाब पठाण, संपतराव वल्टे, मधुकर राजोळे, बबनराव जगताप, सोपान खालकर, ज्ञानेश्वर खाडे, शरद काळे, राजेंद्र बोरगुडे,बाबासाहेब शिंदे ,रामेश्वर जगताप, विलासराव वाघ, नितिन ताकाटे, अजय गवळी यांचेसह शिवसेना भाजपा राष्ट्रवादी व मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांची रसद विजयाचा झेंडा रोवण्याचा पुरक ठरली आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४



« कांद्याचे बाजारभाव काही आठवडे टिकणार « पान ६



» द्राक्ष बागाईतदार संघाला दिलेला शब्द पूर्ण करणार » पान ६

# कसमादेचे मतदार, लाडक्या बहिणींची सीमा हिरेंवर आभाळमाया!

**नाशिक पश्चिम मतदार संघात झालेल्या तिरंगी लढतीत भाजपाच्या सीमाताई हिरे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवत हॅटट्रिक साधली. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर काही मंडळींचा झालेला विरोध, भाजपाच्या काही मंडळींनी दुसऱ्या पक्षात केलेला प्रवेश यामुळे निकाल काय लागणार? याबाबत मोठी उत्सुकता होती. परंतु लाडक्या बहिणींची माया आणि कसमादे भागातील मतदारांबरोबरच हिंदुत्वाच्या मुद्यामुळे सीमाताई हिरे यांनी तिरंगी लढतीत मोठे मताधिक्य मिळवत नाशिक पश्चिममध्ये पुन्हा बाजी मारली. तीन टर्म आमदारकी मिळाल्याने आता आगामी मंत्रिमंडळात त्यांना मंत्रीपद मिळते की नाही? हे काही दिवसांत स्पष्ट होईलच. मंत्रिपद मिळाल्यास त्यांच्या रुपाने या भागाला पहिल्यांदाच अशी संधी मिळून इतिहास घडू शकतो.**



**नाशिक पश्चिम विश्लेषण**

**अश्विनी पांडे**

राज्यातील सर्वांत मोठा मतदार संघ असलेल्या नाशिक पश्चिमच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निवडणूकीच्या सुरुवातीपासूनच मतदार संघात कोणाला उमेदवारी मिळणार ते कोण जिंकून येणार याची उत्सुकता होती. दहा वर्षे आमदार असलेल्या सीमा हिरे यांच्या बाबतीत पक्षात नाराजी असल्याचे निवडणुकीच्या सुरुवातीला दिसले होते. इतकेच नव्हे तर सीमा हिरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नाराज झालेल्या दिनकर पाटील यांच्यासह अनेकांनी थेट भाजपाचे कार्यालय गाठून उमेदवारीला विरोध केला. मात्र, भाजपाने कोणताच बदल न केल्याने नाराज झालेल्या व प्रत्येक वेळी अन्याय सहन करीत आलेल्या दिनकर पाटील यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत मनसेत प्रवेश केला. आणि विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकला. शिवसेना ठाकरे गटाकडून सुधाकर बडगुजर रिंगणात होते त्यामुळे निवडणूक चुरशीची होईल अशी चर्चा होती. सीमा हिरे यांना निवडणूक थोडी खडतर जाईल असा अंदाज राजकिय जाणकारांकडून व्यक्त करण्यात आला होता. मात्र, निवडणूक निकाल पाहता सीमा हिरे यांनी एकहाती निवडणूक जिंकत हॅटट्रिक केली. लाडक्या बहिणी आणि हिंदुत्वाबरोबरच सिडको, सातपूर भागात असलेल्या कसमादेच्या मतदारांची साथ लाभल्याने हिरे पुन्हा चमकले. सीमा हिरे यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या सुधाकर बडगुजर व मनसेकडून निवडणूक लढवणाऱ्या दिनकर पाटील यांचा ६८ हजार ११७ मतांनी पराभव केला. सीमा हिरे यांना १,४१ हजार ७२५ मते मिळाली. तर ७२,६६१ मते मिळवून बडगुजर दुसऱ्या तरी ४६६४९ मते मिळवून दिनकर पाटील तिसऱ्या स्थानावर राहिले. सीमा हिरे यांच्या बाबतीत निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच पक्ष अंतर्गत नाराजी होती. त्यामुळे त्यांना निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती मात्र सीमा हिरे यांची मतदार संघात असलेली सोज्वळ आणि शांत प्रतिमा याचा त्यांना फायदा झाल्याचे दिसून आले. सुधाकर बडगुजर यांची नकारात्मक प्रतिमा आणि दिनकर पाटील यांनी ऐन वेळी दुसऱ्या पक्षात जात निवडणूक लढविली मात्र त्यांना तिसर्या स्थानावर समाधान मानावे लागले. हिरे यांच्या साठी नरेन्द्र मोदी यांची सभा त्याचबरोबर लाडकी बहीण योजना ही गेमचेंजर ठरली. लाडक्या बहिणी हिरे यांच्या मदतीला आल्याचे मतांच्या आकडेवारी वरुन दिसून येत आहेत. तसेच भाजपाने दिलेला एक है तो सेफ हे या घोषणेचा परिणाम हिंदू मत एकवटण्यास झाला. त्यामुळेच भाजपचे मताधिक्य वाढले. कसमादे पट्ट्यातील मतदार पाठीशी राहिल्याने सीमा हिरे यांचा विजय सुखकर झाला. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली सभा, मतदार संघात झालेल्या विकासकामांचे ब्रँडिंग आणि जनसंपर्काचा हिरेंना फायदा झाला.

## ठाकरे बंधूच्या सभा निष्प्रभ

उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी घेतलेल्या सभा निष्प्रभ ठरल्याचे चित्र मतांच्या आकडेवारी नुसार दिसून येत आले. उद्धव ठाकरे यांनी सुधाकर बडगुजर, योगेश घोलप, वसंत गीते यांचा साठी सभा घेतली तर राज ठाकरे यांनी दिनकर पाटील यांच्या साठी नाशिक पश्चिम मतदार संघात सातपूर अणि सिडको येथे दोन सभा घेतल्या..मात्र दोन्ही ठाकरे बंधूनी घेतलेल्या सभा निष्प्रभ ठरल्याचे आकडेवारीवरून दिसून आले. त्यात गंगापूररोड सारखा परिसर या मतदार संघात येतो. येथील सुशिक्षित मतदारही सीमा हिरेंच्या पाठीशी राहिला. याउलट परिस्थिती बडगुजर यांची होती. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पोलिसी कारवायांचा ससेमिरा आणि सलिम कुत्ता प्रकरणात झालेली नकारात्मक प्रतिमा याचाही फटका बडगुजर यांना बसल्याची चर्चा आहे.

# नाशकात भाजप तर, ग्रामीणमध्ये राष्ट्रवादीच 'दादा'

**नाशिक : विधानसभा निवडणुकीच्या निकालातून शहरात भाजप तर, ग्रामीणमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे वर्चस्व असल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीतील शिवसेना शिंदे गटाकडे दोन जागा राहिल्या. देवळालीत जागा मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न अपयशी ठरला.**

नाशिक शहरात १५ वर्षांपासून असणारे भाजपचे एकहाती वर्चस्व कायम राखण्यात पक्षाला यश मिळाले. त्याआधी मनसेला केवळ एकदाच असे वर्चस्व राखणे शक्य झाले होते. सलग तीन निवडणुकीत नाशिक मध्य, नाशिक पश्चिम आणि नाशिक पूर्व हे तीन मतदारसंघ आपल्याकडे राखण्यात भाजपला यश मिळाले. इतकेच नव्हे तर गतवेळच्या तुलनेत अधिक मताधिक्यांनी भाजप विजयी झाले. शहरावरील हे वर्चस्व पक्षाला महापालिका निवडणुकीत कामी येणार आहे. ग्रामीण भागात राष्ट्रवादी अजित पवार गटाने लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटासह महाविकास आघाडीची निर्माण झालेली सद्दी विधानसभेत मोडून काढली. ग्रामीणमधील वाट्याला आलेल्या सर्वच्या सर्व सात जागा त्यांनी मिळवल्या. यात येवला, सिन्नर, निफाड, कळवण, दिंडोरी, देवळाली आणि इगतपुरी मतदारसंघाचा समावेश आहे. देवळाली मतदारसंघातील काही शहरी भाग वगळता हे सर्व मतदारसंघ ग्रामीण भागातील आहेत. ग्रामीण भागावर अजित पवार गटाने पूर्णपणे वर्चस्व प्रस्थापित केले आहे. भाजपला ग्रामीणमधील चांदवड व बागलाण या दोन मतदारसंघात विजय मिळाला. शिवसेना शिंदे गटाला मालेगाव बाह्य व नांदगाव या पूर्वीच्या जागा राखण्यावर समाधान मानावे लागले. देवळाली मतदारसंघात राजश्री अहिरराव यांना अधिकृत उमेदवारी देत शिंदे गटाने संख्याबळ वाढविण्याचा प्रयत्न केला. मात्र तो यशस्वी झाला नाही. त्यामुळे नाशकात भाजप तर ग्रामीणमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट दादा राहिले.






नाशिक आज

# गांवकरी

■ नाशिक, सोमवार , दि. २५ नोव्हेंबर २०२४




◀◀ कोटक इक्विटी हायब्रिड फंड ◀◀ पान ३



▶▶ यार्डले लंडनने केले कल्याणी प्रियदर्शनला नवीन ब्रँड अम्बॅसडर ▶▶ पान ३

## महत्त्वाचे



नाशिक : पश्चिम विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने यश मिळवून विजयाची हॅट्रिक केल्यानंतर सीमा हिरे यांना खांद्यावर उचलून आनंद उत्सव साजरा करताना त्यांचे पती महेश हिरे. (छाया : जगदीश सोनवणे)

### निमाच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. प्रतिभा वाघ यांची निवड



**नाशिक :** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) या संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी येथील डॉ. प्रतिभा अजय वाघ यांची निवड करण्यात आली आहे. असोसिएशनच्या बैठकीत डॉ. प्रतिभा यांच्या नावावर सर्वमताने एकमत झाल्याने त्यांची या पदी निवड घोषित करण्यात आली. दि १ डिसेंबर रोजी मावळते अध्यक्ष डॉ. सुजित सुराणा पदाची सूत्रे डॉ. प्रतिभा वाघ यांच्याकडे सोपविणार आहेत. यानिमित्त आयएमए हॉल येथे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. निमा ही आयुर्वेदमधील पदवीधर डॉक्टर्सची राष्ट्रीय पातळीवरील संघटना आहे.

# एकच चर्चा.. अविश्वसनीय !

## निवडणूक निकालावर कुठे खुशी कुठे गम

**नाशिक : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली असून, राज्यात महायुतीचा महाविजय झाला असला तरी अनेक राजकीय जाणकारांसह मतदारांनीही या निकालावर संशय व्यक्त केला आहे. तर चर्चांमध्ये एकच शब्द ऐकावयास मिळत आहे तो म्हणजे 'अविश्वसनीय'! तरीही या निकालामुळे कुठे खुशी तर कुठे गम असल्याचे चित्र दिसून आले.**



राज्यात सर्वत्र महायुतीला कौल मिळाल्याने अनेक मातब्बर नेत्यांना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आहे. या निकालानुसार महायुतीला प्रचंड मोठं बहुमत मिळालं आहे. महाविकास आघाडीचा मोठा पराभव झाला आहे. यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडीला तर भोपळाही फोडता आलेला नाही. त्यामुळे या पक्षांच्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह उभी ठाकले आहे. नाशिक जिल्ह्यातदेखील मतमोजणी आधी अनेक राजकीय अंदाज बांधण्यात आले होते. जिल्ह्यातील पंधराही मतदार संघातून कोण निवडून येणार आणि कोणाला फटका बसणार यावर विचारमंथन झडले होते. मात्र, राजकीय विश्लेषक, जाणकारांसह मतदारांनाही आपला अंदाज खर वाटू शकला नाही. जिल्ह्यात नांदगावचे आमदार सुहास कांदे, मालेगाव बाह्यचे आमदार दादा भुसे, येवल्यात छगन भुजबळ, नाशिकमधून सीमा हिरे, देवयानी फरांदे, इगतपुरीतून हिरामण खोसकर यांना पराभवाचा शंभर टक्के सामना करावा लागनार असल्याचे भाकित आनेकांकडून वर्तविण्यात येत होते. मात्र, सर्व भाकित वर्तविणाऱ्यांच्या भूवया या निकालाने उंचावल्या आहेत.

दम देणे, धमकीचा कॉल भर सभेत ऐकवून कांदे यांच्या विजयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. तर ड्रग्जप्रकरणामुळे प्रा. देवयानी फरांदे यांना तिकिटदेखील उशिर मिळाल्याने त्यांच्या विजयाची खात्री होत नव्हती. तसेच सीमा हिरे यांच्यापुढे दिनकर पाटील, सुधाकर बडगुजर यांचे तगडे आव्हान मानले जात होते. त्याचप्रमाणे खोसकर यांच्याबद्दल इगतपुरीतच नाराजीचा सूर असल्याचे सांगितले जात होते. त्याचप्रमाणे येवल्यातजरांगे फॅक्टरमुळे भुजबळांच्या मतांवर परिणाम होण्याची शक्यता सांगितली जात होती. त्यातच अराठा उमेदवार त्यांच्या विरोधात असल्याने भुजबळांचा विजयही होतो की नाही अशी चर्चा होती. परंतु मतदारांनी दिलेला कौल आणि सर्वच महायुतीतील उमेदवारांचा विजय अविश्वसनीय असल्याची चर्चा निकालानंतर होताना दिसू लागली आहे. नेत्यांच्या सभांना असलेली गर्दी मतांमध्ये वोभागली गेली नसल्याने अनेकांना त्याचाही फटका बसल्याचे सांगण्यात येत आहे. गर्दी पैसे देऊन आणली गेल्याने त्याचा मतांवर कोणताही परिणाम झाला नसल्याचे यावरुन दिसून आले. सभांना किंवा प्रचारात अलेली माणसंदेखील रोजंदारीने आणल्याने अनेकांना गर्दी दाखवता आली असली तरी निकालांती लोकांनी खरी स्थिती दाखवून दिल्याचेही यानिमित्ताने बोलले जात आहे.

**आता पुढे काय?**

निवडणुकीच्या कालावधीत अनेकांना ३०० ते ५०० रुपये रोजाने काम मिळाले होते. त्यामुळे अनेकांच्या घरच्या चुली पेटत होत्या. मात्र, आता निवडणूक संपली असल्याने पुढे काय करवे असा प्रश्नही रोजंदार वर्गाला पडला आहे. तर रात्रीची खाण्यापिण्याची सोय करण्यासाठीदिवसभर नेत्याच्या पाठीमागे फिरणाऱ्या कार्यकर्त्यांनाही आता पुढे आपली सोय कशी होणार, याची चिंता सतावू लागली आहे. त्यामुळे त्यांनाही पुढील निवडणुकांचे वेध लागल्याचे दिसून येत असून, नेत्याला दिलासा देत पुढच्या वेळी तुम्हीच निवडून येणार, असा आशावाद निर्माण करण्यात येत आहे.

## देवयानी फरांदे यांचे जंगी स्वागत



**नाशिक : प्रतिनिधी**

**अशोक स्तंभ मित्र मंडळाकडून सलग तिसऱ्यांदा आमदारपती निवड झाल्याबद्दल प्राध्यापक देवयानी फरांदे यांचे जंगी स्वागत यावेळी दोन बुलडोजर गुलाल व पुष्पहार अर्पण करत जल्लोष स्वागत करण्यात आले यावेळी फुलांचा वर्षाव तसेच फटाक्यांचे आतिश बाजी करत संपूर्ण अशोक स्तंभावर जय श्रीराम घोषणा बाजी करण्यात आल्या यावेळी अशोक स्तंभ मित्र मंडळाचे पदाधिकारी सचिन मोरे व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.**

## दरोड्याच्या तयारीतील तिघे पोलिसांच्या ताब्यात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

**गावठी बनावटीचे पिस्तोल, शस्त्रसाहित्य आणि दरोड्याच्या तयारीत असलेल्या आठ जणांच्या टोळीतील तीन जणांना उपनगर पोलिसांनी गस्ती दरम्यान पकडले. या कारवाईमुळे एक मोठा अनर्थ टळला असून, नागरिकांमध्ये पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेबद्दल समाधान व्यक्त केले आहे.**

२३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री २:४० वाजेच्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुयोग वायकर यांच्यासह गस्ती पथक आणि सुंदर नगर चौकीतील पोलिस कर्मचारी जय भवानी रोडवरील शकुंता पेट्रोल पंप शेजारील मोकळ्या मैदानात गस्त घालत होते. त्यावेळी पोलिसांना एका टोळीचे सदस्य दरोड्याच्या तयारीत दिसले. टोळीत असलेल्या व्यक्तींपैकी स्वप्नील उर्फ भूषण गोसावी, दानिश हबीब शेख, बबलू यादव, सागर म्हस्के, तुषार पाईकराव, सुरज भालेराव, अनिकेत देवरे आणि रोहित लोंढे यांच्यापैकी तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या घटनेच्या वेळी, पोलिसांना पाहून इतर टोळीचे सदस्य पळून गेले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी स्वप्नील उर्फ भूषण गोसाव, दानिश शेख,बबलू यादव यांच्या जवळ गावठी बनावटीचे पिस्तोल, दोन जिवंत काडतूसे, लोखंडी कोयता, नायलॉन दोरी आणि मिर्ची पूड सापडली. यावरून ते दरोड्याची तयारी करत होते, असे स्पष्ट झाले. पोलिसांनी यावर दरोड्याच्या तयारीचा गुन्हा दाखल केला असून, शस्त्रबळाचे धारक असलेल्या दोघांना शहर पोलीस आयुक्तांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दलही कारवाई केली आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार विनोद लखन यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल केला आहे.

यासोबतच इतर आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पोलिसांच्या मते, या टोळीसाठी अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. या घटनेच्या संदर्भात पोलिस आयुक्त संदिप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी आणि उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांनी पथकाचे कौतुक केले आणि त्यांचा उत्साहवर्धन केला.




# संपादकीय

## इकडं तिकडं सारखंच

महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल एकाच वेळी लागत होता. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतदार फरक करतात, लोकसभेचा कल विधानसभेत चालतोच, याची काही हमी नसते, हे दोन्ही राज्यांत दिसून आले. महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती जबरदस्त मुसंडी मारत असताना झारखंडमध्ये मात्र भाजपाच्याच नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीची तितकीच जबरदस्त पीछेहाट होत होती. महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीच्या विरोधात नकारात्मक नव्हे, तर सकारात्मक लाट दिसत होती आणि झारखंडमध्येही इंडिया आघाडीच्या सरकारच्या विरोधात सकारात्मक कल दिसून येत होता. याचा अर्थ दोन्ही राज्यांतील मतदारांनी सत्तेच्या बाजूने मतदान केले. याचा परिणाम महाराष्ट्रात सत्तेवर येण्याची खात्री असलेल्या महाविकास आघाडीचा पालापाचोळा झाला, तर झारखंडमध्ये सत्ता मिळण्याची आशा बाळगून असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात भाजपाच्या पदरी निराशा पडली. भाजपाचा दोन्ही राज्यांत प्रचार जवळपास सारखाच होता. पण, एक ठिकाणी प्रचार यशस्वी ठरला, तर दुसर्या ठिकाणी काहीच मात्रा चालली नाही. महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांमध्ये फरक आहे. हेच मतदारांनी दाखवून दिले आहे. बटेंगे तो कटेंगे, एक हैं तो सेफ़ हैं, व्होट जिहाद, वक्फ बोर्ड हे आक्रमक मुद्दे महाराष्ट्र सुसाट वेगाने पळत असताना झारखंडमध्ये ते अजिबात चालले नाही. इंडिया आघाडीने विशेषतः झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाने भाजपाचा हा प्रचार हाणून पाडला. पण, तिथल्या आदिवासी मतदार भाजपाच्या धार्मिक प्रचाराला बळी पडले नाहीत. धार्मिक मुद्दे महाराष्ट्रात भाजपाला सत्तेजवळ घेऊन गेले, तर तेच मुद्द्यांनी झारखंडमध्ये भाजपाला सत्तेपासून दूर नेले. धार्मिक प्रचार इकडे महाराष्ट्रात स्वस्तात पडला, तर तिकडे झारखंडमध्ये महागातच पडल्याचे म्हणता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा आदींनी आक्रमक प्रचार केला. भाजपाच्या प्रचारात संथाल परगणा या आदिवासी पट्ट्यात बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न उपस्थित करुन या भागाला 'मिनी बांगलादेश' म्हणून संबोधले. सत्ता मिळाली, तर बेकायदेशीर घुसखोरांना हुसकावून लावू, असे कथानक भाजपाने रंगविले. हे कथानक सत्ताधारी आघाडीने झारखंडवर उलटविले. भाजपा समाजात फूट पाडण्याचा आणि जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप सत्ताधार्यांनी केला. आदिवासी आणि अल्पसंख्याकबहुल भागात मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न मतदारांनीच नाकारला. घुसखोरीमुळे झारखंडच्या आदिवासी भागात मुस्लिमांची लोकसंख्या वाढत आहे. जमीन बळकावण्यासाठी मुस्लिम आदिवासींशी विवाह करत असल्याचेही कथानक भाजपाने रंगविले. आदिवासी आणि मुस्लिम यांच्यातील एकतेला भाजपा छेद देत असल्याचा प्रचार झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेत्यांनी करुन हे कथानक उधळून लावले. झारखंडमध्ये आदिवासींची लोकसंख्या २६.२ टक्के आहे, तर मुस्लिमांची संख्या १४.५२ आहे. बहुसंख्य आदिवासीबहुल विधानसभा मतदारसंघांत मुस्लिम रहिवाशी आहेत. या दोघांची मिळून एक व्होट बँक आहे. राज्यातील ८१ पैकी निम्म्या मतदारसंघात या दोन समुदायांना प्रभाव आहे. त्यामध्ये संथाल परगणा, कोल्हान, दक्षिण छोटानागपूर या विभागांचा समावेश आहे. येथेच भाजपाचे कथानक फसले. भाजपाच्या पराभवास इतरही कारणे आहेत. झारखंडमध्ये मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी महिलांना दरमहा १००० रुपये देणारी मैया सम्मान योजना आधीच सुरू केली होती. या योजनेला शह म्हणून महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा भाजपाने केली होती. तिला महिलांनी प्रतिसाद दिला नाही. महाविकास आघाडीनेही महाराष्ट्रात ३००० रुपये देण्याची घोषणा केली होती पण लाडक्या बहिणींनी १५०० ला पसंती दिली. झारखंड आणि महाराष्ट्रातील महिलांमध्ये हे एक साम्य दिसून आले. झारखंडमध्ये भाजपाचा प्रभाव का पडला नाही? याची इतर कारणेही आहेत. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना यावर्षी जानेवारी महिन्यात आर्थिक घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आली होती. भ्रष्टाचाराचे आरोप करुन सोरेन यांना घेरण्याचा भाजपाचा प्रयत्न फसला. सोरेन यांच्या पत्नी कल्पना यांनी जनमत संघटित करुन सोरेन यांचा राजकीय बळी देण्याचा प्रयत्न भाजपाने केल्याचे लोकांच्या मनावर बिंबवून सोरेन यांच्याविषयी सहानुभूती निर्माण करत भ्रष्टाचाराचा मुद्दा निकाली काढला. याशिवाय ईडी, सीबीआय यासारख्या तपास यंत्रणांचा गैरवापर भाजपा इंडिया आघाडीच्या नेत्यांविरुद्ध करत असल्याचे मतदारांच्या लक्षात आणून देण्यात हेमंत व कल्पना सोरेन यांना यश आले. आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे भाजपाला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार हेमंत सोरेन यांच्यासमोर उभा करता आला नाही. बाबूलाल मरांडी, अर्जुन मुंडा, चंपाई सोरेन हे माजी मुख्यमंत्री आपापल्या मतदारसंघात अडकून पडल्याने त्यांना राज्यभर प्रचारही करता आला नाही. सोरेन यांच्या तोडीचा नेताही भाजपाकडे नव्हता. अशा अनेक कारणांनी भाजपाला झारखंडमध्ये सत्तेपासून पुन्हा एकदा वंचित राहवे लागले. महाविकास आघाडीची जी गत महाराष्ट्रात झाली तीच गत राष्ट्रीय लोकशाही आघाडी विशेषतः भाजपाची झारखंडमध्ये झाली. लोकसभा निवडणुकीत झारखंडमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला १४ पैकी ९ जागा मिळवत ५१ विधानसभा मतदारसंघांत आघाडी घेतली होती. इंडिया आघाडीने लोकसभेच्या केवळ ५ जागा जिंकल्या होत्या. यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विधानसभा निवडणुकीत विजयाची आशा होती. मात्र, या आघाडीला केवळ २४ जागा मिळाल्या. त्यात भाजपाच्या २१ जागा आहेत. ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन, जनता दल युनायटेड, लोकजनशक्ती यांना प्रत्येकी एक जागा मिळाली. लोकसभा निवडणुकीतील यशाची पुनरावृत्ती भाजपाला करता आली नाही. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३० जागा जिंकून १५६ विधानसभा मतदारसंघात आघाडी घेणार्या महाविकास आघाडीची जी अवस्था झाली, तीच अवस्था भाजपाची म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीची झारखंडमध्ये झाली. झारखंड मुक्ती मोर्चा (३४), काँग्रेस (१६), राष्ट्रीय जनता दल (४), कम्युनिस्ट-मार्क्स व लोनिन (२) या इंडिया आघाडीने ५६ जागा जिंकून दोनतृतीयांश बहुमत प्राप्त केले. भाजपाला सत्तेपासून वंचित राहवे लागले. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांत फरक आहे. एक फॉर्म्युला एक राज्यात चालला, तर तो दुसरीकडे चालेलच, याचीही काही हमी नसते. महाराष्ट्रात महाविकास आत्मपरीक्षण करेल, तर तेच झारखंडमध्ये भाजपावर करण्याची वेळ आली आहे.

## विचारधन



### भगवंत कल्पनेच्या पलीकडे आहे

मनुष्याचा स्वभावच असा असतो की, आपल्या कल्पनेत जेवढे येते तेवढेच आपण सत्य मानतो. पण आपली कल्पनाच किती संकुचित असते, याचा कोणी विचार करीत नाही. जो कल्पनेच्या पलीकडे आहे, जिथे कल्पना थांबते, ज्याला कल्पना बांधू शकत नाही, त्याला कल्पनेने कसे ओळखता येईल? जो ज्ञानाच्या पलीकडे राहिला आहे त्याला माझ्या तोकड्या ज्ञानाने कसे अजमावता येणार? माझ्या बुद्धीच्या पलीकडे तो आहे. तेव्हा त्याच्या इच्छेनेच त्याचे खरे ज्ञान होणार आहे. अविद्या ती हीच की, आपल्या कल्पनेने होणारे ज्ञान हेच खरे मानणे.

याकरिता श्रद्धा आणि कल्पना यांतला फरक ओळखावा. खरी श्रद्धा तीच की, जी कल्पनेच्या पलीकडे राहते. प्रल्हादाइतके आपण नामाला सत्यत्व देत नाही. कल्पनेची मजल प्रल्हादाने नाही चालविली. कल्पनेच्याही पलीकडच्या गोष्टी जर आपल्या यच्किंचित संसारातसुद्धा घडतात, तर भगवंत त्या कल्पनेच्या पलीकडे राहिला असे मानायला काय हरकत आहे? सूर्यप्रकाश जसा सर्व ठिकाणी भरलेला असतो, त्याप्रमाणे देवळात, घरात, तीर्थक्षेत्रांत, सर्व ठिकाणी परमात्मा भरलेला आहे. परमात्मा फक्त विद्वानांचा किंवा श्रीमंतांचा नसून, तो सर्वांचा आहे. भगवंत सर्वांचा आहे, म्हणूनच सर्वांना तो सुसाध्य असला पाहिजे. एखादा मोठा गणिती हिशेब लवकर करू शकतो; परंतु खेडेगावातले अडाणी लोक गणित न शिकताही हिशेब बरोबर करतात आणि त्यांचा व्यवहार बरोबर चालतो. तसे विद्वानाला कदाचित भगवंत लवकर प्राप्त होईल, पण अडाणी माणसालादेखील तो प्राप्त होऊ शकेलच. भगवंताची दृष्टीच अशी आहे की, त्याला आपले अंत:करण स्पष्ट दिसते. ते जसे असेल त्याप्रमाणे भगवंत आपल्याला जवळ किंवा दूर करतो. मनुष्य जन्माला आला की, सगळी नाती त्याला आपोआप येतात, त्याचप्रमाणे परमात्मा आनंदरूप आहे असे म्हटले की, बाकीचे सर्व गुण त्यामध्ये आले असे समजावे. जसा मारुतीमध्ये देवअंश होता तसाच तो आपल्यामध्येही आहे. त्याने तो फुलविला, पण आपण झाकून तो विझवून टाकला, याला काय करावे? मामलेदाराला बरोबर असलेल्या शिपायाची भीती वाटत नाही. चोराला मात्र त्याच्याबरोबर असलेल्या शिपायाची भीती वाटते. त्याचप्रमाणे भगवंत आपल्या पाठीमागे आहे ही जाणीव ज्याला असते. त्याला उपाधीची भीती वाटत नाही; कारण ती त्याच्याच इच्छेने आली आहे अशी त्याची खात्री असते. आपण आपले मागले घडलेले सर्व भगवंताला अर्पण करावे, मग पुढची जबाबदारी त्याच्यावर पडते.

# अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय

**अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे.**



अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले.

अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे.

या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन

**कटाक्ष**

**श्याम ठाणेदार**

**९९२२५४६२९५**

केले. याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली.

लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

या निकालाने काँगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

## पुन्हा एकदा ईव्हीएमवर शंका उपस्थित

नुकताच १५ व्या. विधानसभेचा निकाल लागला यामध्ये महायुतीला पुर्ण बहुमत प्राप्त झाले तर महाविकास आघाडीतील कोणत्याही एका पक्षाला विरोधीपक्ष म्हणून देखिल बसण्याची संधी मिळालेली नाही या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे त्यामुळे विरोधी पक्षांकडून पुन्हा एकदा ईव्हीएम तथा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनवर शंका उपस्थित केली जात आहे विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पीएम् मोदींनी दिल्लीत जंगी सेलिब्रेशन केले महाराष्ट्राच्या विजयाने सर्व रेकॉर्ड मोडले असून गेल्या ५० वर्षातील सर्वात मोठा विजय असल्याचे नमूद केले आहे तर महायुतीतील नेते लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरल्याचे म्हणत असून लोकसभेतील दुरुस्ती करुन विधानसभेला आम्हाला जिंकता आल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत विरोधीपक्ष म्हणून देखिल बसण्याची संधी न मिळणे एवढी महाविकास आघाडीवर नाराजी आहे काय ?

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हा निकाल पूर्णपणे अनपेक्षित आणि अनाकलनीय असल्याचे म्हंटले आहे देशातील विविध राज्यांतील पोटनिवडणुकांचा निकाल पाहिला तर भाजपा सोडुन वेगळ्या पक्षांना संधी मिळते मात्र सार्वत्रिक निवडणुकीत भाजपा, भाजप पुरस्कृत यांच्या बाजूने निकाल येतो याचा गांभीर्याने विचार करने गरजेचे असल्याचे जनतेतून बोलले जात आहे !

**- राजू जाधव, मांगूर**

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना



चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय

**पुण्यतिथी**

अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

# चांगली माणसे

चांगली माणसे शोधायची म्हटले तर ते फार अवघड काम नाही. चांगल्या माणसांचा शोध घ्यायचा नसतो ती आपोआप आढळतात. ज्याप्रमाणे सुगंधी फुलांचा सुगंध आपोआप दरवळतो आणि सारा परिसर सुगंधित बनतो त्याप्रमाणे चांगली माणसे त्यांच्या किर्ती सुगंधा मुळे स्पष्ट व उठावदार दिसतात.वाईट लोकांच्या दुनियेत चांगली माणसे संख्येने कमी असले तरीही चांगली माणसे ध्रुव ताऱ्या प्रमाणे प्रकाशमान होताना दिसतात.चांगली माणसे आपल्या अवतीभवती असतात फक्त गरज असते चांगल्या माणसांचा शोध घेण्याची नजर आपल्या ठायी असायला हवी.

नेमके कोणाला चांगली माणसे म्हणायचे?या प्रश्नाचे उत्तर शोधताना चांगल्या माणसांची खास वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.चांगली माणसे खरोखर इतरांपेक्षा वेगळे असतात. त्यांचे व्यक्तिमत्व दिलखुलास असते,स्वभाव मनमिळाऊ असतो,चारित्र्य बावनकशी सोने असते,वर्तन चांगले असते,ते कष्टाळू असतात, भ्रष्टाचार व बेइमानी त्यांना मुळीच आवडत नाही.चांगली माणसे खोटे बोलत नाहीत, खोटे वागत नाहीत.ते नेहमी सत्याचा मार्ग स्वीकारतात. ते आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतात.कामचुकारपणा त्यांना कधी शिवत नाही,हरामाची कमाई त्यांना आवडत नाही.चांगल्या माणसांना समाजात एकोप्याने व नातलगांसोबत मिळून मिसळून राहायला आवडते.चांगली माणसे जातीयता पाळत नाहीत,इतरांच्या धर्माचा ते द्वेष करत नाहीत. समाधान आणि आनंदी वृत्ती हे चांगल्या माणसांची खास लक्षणे असतात.चांगली माणसे शेतकऱ्यांचा भाजीपाला विकत घेताना घासाघीस करत नाहीत.

चांगली माणसे कोणाची निंदा करत नाहीत,कोणाला नावे ठेवत

**मंथन**

**बबन गुळवे**

नाहीत. चांगली माणसे परस्त्रीकडे वाकड्या नजरेने बघत नाहीत. सर्व आया बहिणींचा सम्मान करतात. चांगली माणसे व्यसनांच्या आहारी जात नाहीत, कोणाला त्रास देत नाहीत. शक्य असेल तेव्हा गरजू लोकांना व अडचणीत असलेल्या मित्रांना मदत करतात,आपल्या आईवडिलांना वृध्दाश्रमात कधीच पाठवत नाहीत.बहिणभावाला जीव लावतात!शेतीच्या वाटणीसाठी कोर्टात जाणे चांगल्या माणसांना आवडत नाही,ते कोणाची फसवणूक करत नाहीत.चांगली माणसे सार्वजनिक ठिकाणी कचरा करत नाहीत,पर्यटन स्थळांची नासधूस करत नाहीत,झाडांना व प्राण्यांना इजा करत नाहीत.चांगली माणसे वृक्षारोपण करतात,पक्षांना व प्राण्यांना लळा लावतात.एवढ्या चांगल्या गुणांचे धारक असणारे चांगली माणसे आता दुर्मीळ होत आहेत.अशी ही चांगली माणसे समाजाची,देशाची शान असतात.

आपल्या घरात, समाजात, गावात, शहरात, देशात अनेक चांगली माणसे असतात. त्यांना शोधा,त्यांचे निरीक्षण करा.त्यांचे गुण आत्मसात करा,त्यांच्या सारखे कर्तृत्ववान होण्याचा प्रयत्न करा.

महाराष्ट्रात, भारतात अनेक संत, महात्मे, समाजसुधारक, महामानव, थोर विचारवंत, शास्त्रज्ञ, लेखक, कलावंत, उद्योगपती, शेतकरी, सैनिक आणि आदर्श शिक्षक चांगली माणसे होऊन गेले ज्यांचे नाव नेहमी आपल्या सर्वांचे तोंडी घेतले जाते.या सगळ्या चांगल्या माणसांचा आदर्श आपण जोपासला तर आपणही चांगले व्यक्ती बनू शकतो.परंतु,दुर्दैव असे की आजकाल चांगला माणूस बनण्यापेक्षा वाईट व्यक्ती बनण्याची स्पर्धा लागली आहे. याचेच वाईट वाटते.आणि मन सतत म्हणते,माणसा तू कधी होशील रे माणूस?

## जनमनाचे प्रतिध्वनी

### विश्वास सार्थ ठरावा

राष्ट्राची ही विधानसभा निवडणुक निवडणुकीपूर्वी व निवडणुकीनंतर न भूतो न भविष्यती अशीच ठरली. लोकसभा निडणुकीनंतर मविआचा या निवडणुकीत दुनावलेला आत्मविश्वास व त्याच कारणाने सावध झालेले महायुतीतील घटक पक्ष यांच्यातील अटीतटीची झुंज देशपातळीवर लक्षवेधक ठरली. सवलत मोफत योजना,तिकीट वाटप व प्रचाराचे योग्य नियोजन,राष्ट्रीय पातळीवरच्या महनीय नेत्यांच्या राज्यातील सर्वच भागात प्रचारसभा,त्यांनी केलेल्या अति परिणामकारक घोषणा आदी कारणामुळे महायुतीने अभूतपूर्व व नेत्रदिपक विजय मिळवत इतिहास घडवला.मात्र सर्वसामान्य जनतेला निवडणुक प्रचारात ,जाहिर वा वचननाम्यात दिलेली आश्वासने यांची पूर्तता नवीन येणाऱ्या महायुती सरकारला करावी लागेल व पारदर्शक कारभाराने प्रगती विकासाची कामे करून जनतेने त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवावा लागेल!

**- विजय भदाणे, नाशिक**

### हवामान बदलामुळे आजारात वाढ

सध्या भारतामध्ये लहान मुलांची संख्या ४४ कोटी एवढी आहे. पण २०५० पर्यंत ही संख्या ३५ कोटी पर्यंत खाली येऊ शकते. त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हे मोठे आव्हान असणारा आहे. युनिसेफ नये जागतिक पातळीवर मुलांच्या एकूण स्थितीबाबत एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. सध्या लोकसंख्येत काही बदल होत आहेत. दिवसेंदिवस पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे हवामान बदलाचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा अवघड होत चालला आहे.तंत्रज्ञानामध्ये सुद्धा सतत बदल होत आहेत. या सर्वांचे परिणाम लहान मुलांच्यावर होणार आहेत. युनिसेफ तर्फे असे म्हटले आहे कि २००० च्या तुलनेत आठ पट जास्त उषातेच्या लाटांना लहान मुलांना समोर जावे लागेलदक्षिण आफ्रिका इत्यादी... दारिद्र्य कमी शिक्षण आरोग्याची हेळसांड अशा अनेक समस्या जाणवू लागतील. याशिवाय काही देशात सतत युद्धाचे वातावरण आहे. त्याचाही परिणाम लहान मुलांच्यावर होऊ शकतो.

**- शांताराम वाघ, पुणे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टॅंडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### 'ओला इलेक्ट्रिक'ने केली तब्बल ५०० कर्मचाऱ्यांची कपात




**नवी दिल्ली :** विद्युत दुचाकीनिर्मिती क्षेत्रातील 'ओला इलेक्ट्रिक'ने विविध विभागांतील ५०० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. कर्मचारी पुनर्रचनेचा भाग म्हणून काही कर्मचाऱ्यांची गच्छन्ती करण्यात आल्याचे बोलले जात आहे. विक्रीपश्चात सेवांमधील उणिवांमुळे ग्राहकांच्या वाढलेल्या तक्रारींमुळे कंपनीला अडचणींचा सामना करावा लागला होता. बरोबरच आर्थिक ताळेबंदाची मजबुतीचेही कंपनीपुढे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर, उत्पन्नांत सुधारणा आणि दीर्घकालीन नफा वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कंपनीने अनावश्यक कर्मचारी कमी करण्याचे पाऊल उचलले आहे. पुनर्रचनेमुळे विविध विभागांतील मनुष्यबळावर परिणाम होणार आहे. यापूर्वी 'ओला इलेक्ट्रिक'ने जुलै आणि सप्टेंबर २०२२ मध्ये अशाच प्रकारच्या पुनर्रचनेमुळे अंदाजे १,००० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले होते. त्या वेळी कंपनीने वापरलेल्या वाहनांची विक्री, क्लाउड किचन आणि किराणा सामान वितरण व्यवसाय बंद करून, विद्युत वाहन विभागावर लक्ष केंद्रित केले. पुढे सप्टेंबर २०२२ मध्ये, कंपनीने कपातीची दुसऱ्या फेरीत आणखी काहींना नारळ दिला. भांडवली बाजारात सूचिबद्ध असलेल्या 'ओला इलेक्ट्रिक'चा तोटा सरलेल्या सप्टेंबर तिमाहीत ५ टक्क्यांनी कमी होऊन ४९५ कोटींवर स्थिरावला आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत तो ५२४ कोटी रुपये होता. तर महसूल ३८.५ टक्क्यांनी म्हणजेच ८९६ कोटींवरून वाढून १,२४० कोटींवर पोहोचला आहे. शुक्रवारच्या सत्रात 'ओला इलेक्ट्रिक'चा समभाग १.९३ टक्क्यांनी वधारून ६९.१४ रुपयांवर बंद झाला. कंपनीच्या समभागांच्या बाजारभावानुसार, तिचे ३०,४९६ कोटी रुपयांचे बाजार भांडवल आहे. महिन्याच्या सुरुवातीला, केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण अर्थात 'सीसीपीए'ने ओला इलेक्ट्रिकने उत्पादित केलेल्या दुचाकी आणि विक्रीपश्चात सेवांसंबंधित उणिवा आणि तक्रारींची तपशीलवार चौकशी करण्याचे आदेश दिले. दाखल झालेल्या १०,६४४ तक्रारींपैकी ९९.१ टक्के तक्रारींचे निराकरण करण्यात आल्याचा कंपनीचा दावा आहे.

### अदानींकडून भारताच्या भांडवली बाजाराचीही दिशाभूल?



**मुंबई:** ताजे लाचखोरीचे प्रकरण उजेडात येण्याच्या दीड वर्षांपूर्वीच मार्च २०२३ मध्येच अमेरिकेचा गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात 'एफबीआय'च्या विशेष पथकाने अब्जाधीश गौतम अदानी यांचे पुतणे सागर अदानी यांच्याशी अमेरिकेत झडतीच्या वॉरंटसह संपर्क साधला होता. त्यांची काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे त्यासमयी जप्त केली गेली. अमेरिकेत न्यायालयीन पंचापुढे (ग्रॅण्ड ज्युरी) जातीने उपस्थित राहण्याचा हुकूमनामा त्या वेळी त्यांना सुपूर्द केला गेला. त्यानंतर गौतम अदानी यांनी त्या वॉरंट आणि हुकूमनाम्याच्या प्रत्येक पानाची छायाचित्रे काढून ती स्वत:ला ईमेल केली होती, असे आता उघडकीस आले आहे. मात्र त्याच आठवड्यात, ११ मार्चला अदानी समूहाने अब्जाधीश अध्यक्ष गौतम अदानी यांच्या विरुद्ध अमेरिकेत सुरू असलेल्या कोणत्याही तपासाबाबत माहिती नाही, असा दावा करणारे निवेदन प्रसिद्धीसाठी जारी केले होते. आता न्यू यॉर्कमधील न्यायालयांकडून थेट अदानी यांच्या अटकेचे वॉरंट जारी झाले आहे. मात्र त्यानंतरही सर्व आरोप निराधार असल्याचे म्हणत समूहाने ते फेटाळले आहेत. परंतु गेले वर्षभर या चौकशीसंबंधाने माध्यमांमध्ये पुढे आलेल्या वृत्तांनाही 'वदंता' म्हणत समूहाकडून ते फेटाळले गेले. प्रत्यक्षात अशी चौकशी सुरू असल्याचे प्रकटन समूहाने अथवा समूहातील कंपनीने केव्हाही केले नाही. या अपुऱ्या अथवा भ्रामक प्रकटनावर खरे तर भारतीय बाजार नियामकांकडूनही समूहाला कारणे दाखवा नोटीस बजावली जावी, असा मतप्रवाह आता पुढे येत आहे. अमेरिकेतील आरोपपत्रात, अदानी समूहाने अमेरिकी वित्तीय संस्था आणि गुंतवणूकदारांची केवळ दिशाभूल केल्याचा आरोप आहे. प्रत्यक्षात मागील वर्षभर भारतातील भांडवली बाजार आणि भागधारकांची 'खोटी' आणि 'भ्रामक' विधाने करून समूहाने फसवणूक केल्याचे उपलब्ध तपशिलावरून स्पष्ट होत आहे.

### 'सेबी'कडून अदानी समूहाकडून प्रकटन नियमाच्या उल्लंघनाची चौकशी




**मुंबई :** भांडवली बाजार नियामक 'सेबी' अमेरिकेतील ताज्या आरोपांचा एक भाग म्हणून अदानी समूहाकडून प्रकटन (डिसक्लोजर) नियमांचे उल्लंघन झाले काय याची चौकशी करणार असून, त्यात हयगय आढळून आल्यास कारवाई केली जाईल, मात्र लाचखोरीचे आरोप हे नियामकांच्या कक्षेत येत नाहीत, अशी माहिती सूत्रांनी दिली. ताज्या प्रकरणांतून उघडकीस आलेल्या तपशिलांनुसार, सेबीच्या 'ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स' दंडकांचे अदानी समूहाकडून उल्लंघन झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. या नियमांचे पालन न केल्याचे आढळल्यास 'सेबी'च्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागू शकते. शिवाय मोठ्या दंडाची देखील आकारणी केली जाईल. अब्जाधीश गौतम अदानी आणि त्यांच्या सात अधिकाऱ्यांवर लाच घेतल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. मात्र अदानी समूह एकाच वेळी अपिलात जाताना, दंड भरून प्रकरण निकाली काढण्याचा संभाव्य प्रयत्न करू शकतो. अदानी समूहासाठी पहिला उपाय म्हणजे अपील दाखल करणे हा असेल. कारण ठरावीक कालमर्यादेत त्याची दखल घेतली जाऊन, प्रकरण निकाली काढण्याचे पर्याय शोधले जाऊ शकतात, असे वकिलांनी सांगितले. अमेरिकेत लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये अनेकदा 'डिफर्ड प्रॉसिक्युशन ग्रीमेंट्स' किंवा 'नॉन-प्रोसिक्युशन ग्रीमेंट्स'द्वारे सामंजस्यांद्वारे निवाड्याच्या (सेटलमेंट) माध्यमातून मार्ग काढले जाऊ शकतात. शिवाय अमेरिकेत न्यायाधीशांना दंडाच्या प्रमाणाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे. ते मोठा दंड लावून आरोपीला मुक्त करू शकतात.

# कोटक इक्विटी हायब्रिड फंड




**२५ नोव्हेंबर १९९९ ला सुरू झालेली ही योजना २५ वर्षे पूर्ण करून २६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. योजनेकडे ७ हजार कोटी रुपयांची मालमत्ता व्यवस्थापन करण्यासाठी असून योजनेने एक वर्षाची वाढ २७.८ टक्के, ३ वषे १३.५ टक्के, ५ वर्षे १८ टक्के, आणि १० वर्षे चक्रवाढीने वार्षिक सरासरी वाढ १२.८ टक्के दिली आहे. योजनेकडे १ लाख २४ हजार गुंतवणूकदार खाती आहेत. योजनेने ७३ टक्के गुंतवणूक शेअर्समध्ये आणि २७ टक्के गुंतवणूक ऋण पत्रांमध्ये केली आहे. गुंतवणुकीची जोखीम कमी असावी अशी इच्छा असलेल्या गुंतवणूकदारांसाठी ही एक चांगली योजना आहे.**

**अॅक्सिस स्मॉल कॅप फंड**

२९ नोव्हेंबर २०१३ या दिवशी सुरू झालेल्या या योजनेने ११ वर्षे पूर्ण करून १२ व्या वर्षात पदार्पण केलेले आहे. योजनेकडे २५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता व्यवस्थापनासाठी आहे. १ वर्षे २६.७ टक्के, ३ वर्षे १८.१ टक्के, ५ वर्षे २६.५ टक्के आणि १० वर्षे चक्रवाढीने वार्षिक सरासरी वाढ १८.९ टक्के आहे. स्मॉल कॅप हा गुंतवणूक प्रकार जोखीम असलेला आहे. त्यामुळे ज्या गुंतवणूकदाराला जोखीम घेण्याची मानसिकता आहे त्याने या योजनेकडे यायला हवे. किमान ३ ते ४ स्मॉल कॅप योजना असाव्यात. योजनेची निवड करतांना खूपच मोठ्या प्रमाणावर मालमत्ता असली तर ते त्रासदायक होते. त्याचबरोबर खूप कमी मालमत्ता असली तरी सुध्दा ते त्रासदायक असते म्हणून फक्त आणि फक्त भांडवलवृध्दी बघण्याऐवजी कोणत्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक केलेली आहे. याची माहिती योजनेच्या माहितीपत्रकात उपलब्ध असते ती माहिती वाचली पाहिजे.

**एच.डी.एफ.सी. बिझनेस सायकल फंड**

३० नोव्हेंबर २०२२ या दिवशी योजनेची सुरूवात झाली. योजनेला फक्त २ वर्षे झाल्याने आणखी काही वर्षे देणे योग्य ठरेल. मालमत्ता ३ हजार २०० कोटी आहे. एक वर्षाची वाढ आधारभूत निर्देशांकापेक्षा कमी आहे. गुंतवणुकीचा हा प्रकार सर्वसामान्य गुंतवणूकदारांसाठी नाही. व्यवसायातली व्यापारचक्रे चढउतार ज्याला समजतात. त्याने योग्य वेळी गुंतवणूक करणे आणि योग्य वेळी बाहेर पडणे हे केले पाहिजे.

**डी.एस.पी. हेल्थ केअर फंड**

३० नोव्हेंबर २०१८ ला ही येजना आली. ६ वर्षे पूर्ण करून ७ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. योजनेकडे ३ हजार कोटी रुपयांची मालमत्ता व्यवस्थापनासाठी असून १ वर्षे ४९.१ टक्का, ३ वर्षे २१.१ टक्का, ५ वर्षे चक्रवाढीने वार्षिक सरासरी वाढ ३०.९ टक्के आहे. जोखीम आणि भांडवलवृध्दी सर्वात जास्त क्षेत्रिय फंडामध्ये असते. परंतु प्रत्येक गुंतवणूकदाराकडे किमान १ तरी हेल्थकेअर फंड असावा आणि त्यासाठी डी.एस.पी. हेल्थकेअरचा विचार करायला हवा. हा फंड ज्या कंपन्यात गुंतवणूक करतो त्या कंपन्यांची उत्पादने घरात कोणी आजारी असल्यास खरेदी करावी लागतात. सनफार्मा, सुवेन फार्मास्टिकल, इप्का लायब्रेरीटीज लुपिन सिंपला, अलाबिक फार्मा इत्यादी औषध उद्योगातल्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक आहे. या योजनेत गुंतवणूक करायला हवी.

शेअर बाजार समालोचन
प्रमोद पुराणिक
९८२२०७८८२९

**शेअरबाजार साप्ताहिक समालोचन**

सोमवार ते शुक्रवार गेल्या आठवडा खूप मोठ्या प्रमाणावर चढउतार असलेला ठरला. शुक्रवारी मात्र निर्देशांकाने १९६१ अंशाची भर घालून ७९ हजार ११७ ला पोहोचल्याने संवेदनशील निर्देशांकाने १९.८ टक्के वार्षिक वाढ दाखवली तर निफ्टीने वार्षिक वाढ २०.७ दाखवली. अदाणी प्रकरण बाजाराला किती त्रासदायक ठरते. हे पुढे काय घटना घडू शकतील त्यावर अवलंबून आहे. मात्र आजसुध्दा या बाजारात गुंतवणुकीच्या अत्यंत चांगल्या संधी उपलब्ध आहे. स्मॉल कॅप निर्देशांकाने ३२.९ टक्के भांडवलवृध्दी दाखवली. तर हेल्थ सेक्टर निर्देशांक ४३.६ टक्के आणि पॉवर सेक्टर निर्देशांक ५४.५ टक्के भांडवलवृध्दी दाखवतो आहे. पॉवर सेक्टर विचारात घेतल्यानंतर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चढउतार होतील याचा अंदाज करता आला पाहिजे. अशा वेळेस वर्षभर जो निर्देशांक फारसा चालला नाही अशा एफ.एम.सी.जी. या निर्देशांकाचा विचार करायला हवा. कारण या निर्देशांकाने वार्षिक वाढ फक्त ९ टक्के दिली आहे. पुढील वर्षी वार्षिक वाढ अपेक्षित नाही म्हणून या क्षेत्राशी निगडित असलेल्या म्युच्युअल फंडाच्या योजनांमध्ये गुंतवणूक करून पुढील वर्षात आकर्षक नफा कमावण्याची संधी मिळू शकेल. कारण अगदी सोपे आहे. कोणतेही क्षेत्र कायमस्वरुपी कमी वाढ दाखवत राहील असे कधीही होत नाही. म्हणून एफ.एम.सी.जी. कडे यायला हवे.

| अ. नं. | योजनेचे नाव | निव्वळ मालमत्ता मूल्य रुपये | मालमत्ता कोटी रुपये | भांडवलवृध्दी एक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | एल.आय.सी. | ३१४ | ३८६ | ३९.८ |
| २) | टाटा | ४१.३ | ९४६८ | ३८.२ |
| ३) | क्वॉन्ट | २६०.० | २६३३१ | २८.२ |
| ४) | इन्व्हेस्को | ३९.५ | ५३५३ | ३५.२ |
| ५) | निप्पॉन | १६८.१ | ६१०२७ | ३३.४ |
| ६) | कोटक | २६६.२ | १७५९३ | ३२.९ |
| ७) | बँक ऑफ इंडिया | ४७.२ | १५३७ | ३०.१ |
| ८) | एच.एस.बी.सी. | ८३.२ | १६९२० | २९.९ |
| ९) | एललवीर्ज | ४२.८ | ४२५६ | २९.४ |
| १०) | डी.एस.पी. | १८९.८ | १६१४७ | २८.२ |
| ११) | एस.बी.आय. | १७२.२ | ३३१०७ | २८.१ |
| १२) | फ्रँकलिन | १७०.६ | १३९४४ | २८.६ |
| १३) | कॅनरा रोबेको | ३८.६ | १२३२४ | २७.९ |
| १४) | अॅक्सिस | १०१.४ | २३९५२ | २६.७ |
| १५) | सुंदरम | २४९.१ | ३४५० | २५.८ |
| १६) | एच.डी.एफ.सी. | १३४.२ | ३३५०४ | २५.७ |
| १७) | बिर्ला | ८४.९ | ५१८१ | २५.३ |
| १८) | आय.सी.आय. | ८४.७ | ८४३५ | २३.८ |
| १९) | युनियन | ४७.८ | १६२८ | १९.९ |

## 'सिल्व्हर ईटीएफ'ना चमक; ऑक्टोबरअखेर मालमत्ता १२,३३१ कोटींवर; परताव्यात 'गोल्ड ईटीएफ'ला मात

**मुंबई:** 'सिल्व्हर एक्स्चेंज ट्रेडेड फंड'मधील (सिल्व्हर ईटीएफ) व्यवस्थापनाखालील मालमत्ता (एयूएम) ऑक्टोबर २०२४ अखेर चार पटींनी वाढून १२,३३१ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये २,८४४.७६ कोटी रुपये होते. वर्ष २०२२ मध्ये चांदीमधील गुंतवणूक पर्याय म्हणून म्युच्युअल फंडांना 'सिल्व्हर ईटीएफ' योजना सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे.



देशांतर्गत चलनवाढीचा दबाव आणि भू-राजकीय अनिश्चितता यापासून सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याप्रमाणेच चांदीमध्येदेखील गुंतवणूक करण्यास गुंतवणूकदारांमध्ये उत्सुकता आहे. सिल्व्हर ईटीएफअंतर्गत गुंतवणूकदार खाती अर्थात फोलिओंची संख्या ऑक्टोबर २०२४ मध्ये २१५ टक्क्यांनी वाढून ४.४७ लाखांवर पोहोचली आहे, जी वर्षापूर्वी फक्त १.४२ लाख होती.

गोल्ड ईटीएफपाठोपाठ सिल्व्हर ईटीएफदेखील गुंतवणूकदारांमध्ये लोकप्रिय बनली आहेत. बाजारात सिल्व्हर ईटीएफ योजनांची संख्या एप्रिल २०२३ मध्ये आठ होती. ती ऑगस्ट २०२४ अखेर १२वर पोहोचली आहे. आज ग्रामीण आणि शहरी भागात सोने न परवडणारा मोठा वर्ग आहे. त्यांना चांदीत गुंतवणूक करायची तर प्रत्यक्ष चिप किंवा बार घ्यावे लागतात. सोन्याच्या तुलनेत चांदी वजनाने जास्त आणि त्याची राखण किंवा वाहतूकही अधिक खर्चीक ठरते. याबरोबर चांदीच्या खरेदीवर जीएसटीशी संबंधित खर्चामुळे गुंतवणूकदार चांदीच्या ईटीएफला प्रत्यक्ष चांदी खरेदीपेक्षा प्राधान्य देत आहेत, असे 'इक्रा अॅनॅलिटिक्स'चे वरिष्ठ उपाध्यक्ष अश्विनी कुमार म्हणाले. 'सिल्व्हर ईटीएफ'द्वारे चांदीमध्ये डिमॅट युनिट्सच्या माध्यमातून गुंतवणूक केल्यामुळे प्रत्यक्ष चांदी खरेदी करून ती दीर्घकाळासाठी बाळगण्यात येणाऱ्या कटकटी आणि खर्च यापासून मुक्ती मिळते.

परतावा कामगिरी कशी?

सिल्व्हर ईटीएफची परतावा कामगिरी उल्लेखनीय राहिली असून गोल्ड ईटीएफलाही तिने मात दिली आहे. १ महिना, ३ महिने, ६ महिने आणि १ वर्षाच्या कालावधीतील सरासरी परतावा अनुक्रमे ७.५७ टक्के, १६.०२ टक्के, २०.२५ टक्के आणि ३२.४९ टक्के राहिला.

सामान्य गुंतवणूकदाराला 'सिल्व्हर ईटीएफ'चे फायदे चांदी हे गरिबांचे सोने असे म्हटले जाते. परंतु दुकानातून छोट्या-छोट्या तुकड्यांत चांदी घेणे किंवा चांदीच्या वस्तू घेणे अशा गुंतवणुकीतून आर्थिक फायदा क्वचितच होतो. याचे कारण म्हणून, दुकानातून मिळणारी चांदी किती शुद्ध असेल, त्याची लावलेली किंमत आणि एकदा ती विकत घेतल्यावर बाळगण्याची जोखीम अधिक त्यावरील खर्च हे घटक सांगितले जातात. शिवाय चांदीचे विशिष्ट कालावधीनंतर काळे पडणे आणि बाजारात विकण्याची वेळ आली तर प्रचलित बाजारभावावर लावली जाणारी घट पाहता गुंतवणुकीचे साधन म्हणून चांदीकडे पाहणे कठीण होते. यावर उत्तर म्हणजे कागदी स्वरूपात तसेच प्रचलित बाजारभावात चांदी खरेदी-विक्रीची मुभा देणारा 'सिल्व्हर ईटीएफ' हा अधिक चांगला पर्याय ठरतो. एकदा त्यात गुंतवणूक केली की, वर दिलेल्या सर्व समस्या ही त्या म्युच्युअल फंडाची जबाबदारी असते. त्यासाठी तुलनेने अतिशय क्षुल्लक शुल्क आकारून संबंधित फंड व्यवस्थापक ही जबाबदारी पार पाडत असतो.

## 'विप्रो'कडून बक्षीस समभाग पात्रतेसाठी ३ डिसेंबर रेकॉर्ड तारीख निश्चित

**मुंबई:**

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी विप्रोने शुक्रवारी पूर्वघोषित एकास-एक बक्षीस समभाग योजनेसाठी ३ डिसेंबर 'रेकॉर्ड तारीख' घोषित केली आहे. याचा अर्थ त्या तारखेला अथवा त्या आधी विप्रोचे भागधारक म्हणून नोंद असलेल्यांना या योजनेसाठी पात्र मानले जाईल. कंपनीने 'रेकॉर्ड तारखे'ची घोषणा केल्यानंतर शुक्रवारच्या सत्रात विप्रोचा समभाग २.६० टक्क्यांनी वधारून ५७१.६५ रुपयांवर स्थिरावला.

गेल्या महिन्यात १७ ऑक्टोबर रोजी, विप्रोच्या संचालक मंडळाने प्रत्येकी दोन रुपये दर्शनी मूल्य असलेल्या एका समभागास एक बक्षीस समभाग (१:१ बोनस शेअर) देण्यास मान्यता दिली. बक्षीस समभाग मंजुरीच्या तारखेपासून म्हणजे दोन महिन्यांच्या आत म्हणजेच १५ डिसेंबर२०२४ पर्यंत जमा केले जातील. विप्रोच्या भागधारकांना बक्षीस समभाग देण्याची ही तिची १४ वी वेळ आहे. आघाडीच्या ५० कंपन्यांमध्ये सर्वाधिक वेळा बक्षीस समभाग देणारी ती कंपनी ठरली आहे. गेल्या वर्षी एप्रिल २०२३ मध्ये विप्रोच्या संचालक मंडळाने १२,००० कोटी रुपयांच्या समभाग पुनर्खरेदी (बायबॅक) योजनेला मंजुरी दिली होती. याआधी २०१९ मध्ये तीनास एक बक्षीस समभाग दिला होता.




## यार्डले लंडनने केले कल्याणी प्रियदर्शनला नवीन ब्रँड अम्बॅसेडर

**नाशिक:**

यार्डले लंडन या २५४ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या सुगंध आणि पर्सनल केअर ब्रँडने त्यांची ओळख असलेली परफ्यूम्ड ब्युटी टॅल्क श्रेणी पुन्हा सहर्ष लॉन्च केली आहे. आकर्षक आणि काळास अनुरूप असलेल्या डिझाईनचे हे कलेक्शन अशा रीतीने तयार करण्यात आले आहे की, ते आजच्या आधुनिक, महत्त्वाकांक्षी स्त्रियांना आकर्षित करेल आणि त्याच वेळी यार्डलेची शालीनतेची आणि गुणवत्तेची परंपराही जपेल.

दक्षिण भारतीय चित्रपटांत आपल्या सौंदर्याबद्दल ओळखली जाणारी कल्याणी प्रियदर्शन यार्डले टॅल्क रेंजचा नवीन चेहरा बनली आहे. तिचे स्वाभाविक सौंदर्य यार्डलेच्या शाश्वत सुसंस्कृततेस पूरक ठरणारे आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीव्हीसी मध्ये यार्डले टॅल्क तिचा आत्मविश्वास वाढवून दिनचर्या कशी उन्नत करते हे दाखवून कल्याणी पुढे जाण्याच्या प्रगतीच्या कल्पनेचे उदाहरण सादर करते. तिची मोहकता, शक्ती आणि आत्मविश्वास यामधून यार्डलेची मूल्ये झळकतात आणि महिलांना आत्म-जागरूकता करून देऊन स्व-अभिव्यक्तीसाठी प्रेरित करतात.

या टीव्हीसी मध्ये सुरुवातीला कल्याणी आपल्या मैत्रिणीशी एका सौंदर्य स्पर्धेविषयी चॅटिंग करताना दिसते. चॅट करत असताना ती यार्डले टॅल्क लावते ज्यामध्ये नैसर्गिक तेज आणि दीर्घ काळ टिकणारा सुगंध प्रदान करणाऱ्या ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्सना हायलाइट करण्यात आले आहे. सौंदर्य स्पर्धेच्या ठिकाणी ती आत्मविश्वासाने पावले टाकते आणि सगळ्यांचे लक्ष वेधून घेते. एक ज्युनिअर मॅनेजर तिला चुकून स्पर्धकच समजते, पण कल्याणी हसत हसत खुलासा करते की, ती फक्त तिकडे प्रेक्षक म्हणून






आली आहे. तिचे सौंदर्य आणि आत्मविश्वास पाहून ती प्रभावित झालेली दिसते. या दृश्यातून हेच दाखवले आहे की, कशा रीतीने यार्डले महिलांना पुढचे पाऊल टाकण्यास आणि आत्मविश्वासाने वावरण्यास मदत करते.

नवीन अम्बॅसडर आणि सशक्त संदेश लाभलेली यार्डलेची परफ्यूम्ड ब्युटी टॅल्क आता एका आकर्षक आधुनिक पॅकेजिंग मध्ये आली आहे, ज्यातून या ब्रँडची जागतिक ओळख आणि स्थायी वारसा व्यक्त होतो. ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्सपासून बनलेली ही पावडर दीर्घ काळ टिकणारा फुलांचा सुगंध प्रदान करून त्वचेस तेज देते आणि दैनंदिन दिनाचर्येला लक्झरीची जोड देते. ही पावडर व्हीगन, क्रौर्य-मुक्त आणि पॅराबेन्स व सल्फेट्स मुक्त आहे, त्यामुळे दैनंदिन वापरासाठी सौम्य आहे. यार्डलेचा विशिष्ट सुगंध त्यात आहे. ही पावडर नैसर्गिक सौंदर्य वाढवते आणि स्टाइल आणि आत्मविश्वास देते व यूझरला पुढचे पाऊल टाकण्यास, जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास प्रोत्साहन देते.

या नवीन यार्डले लंडन ब्युटी टॅल्क रेंजमध्ये इंग्लिश लव्हेंडर, इंग्लिश रोझ, मॉर्निंग ड्यू, रॉयल रेड रोझिस आणि इम्पिरीयल जॅस्मिन सहित ८ प्रकारचे सुगंध आहेत. वेगवेगळ्या गरजांनुसार हे वेगवेगळे सुगंध निवडता येतील. ही पावडर सहजपणे घाम शोषून घेते आणि दिवसभर त्वचा चमकदार आणि सुगंधाने दरवळत ठेवते.

ही रेंज पुन्हा लॉन्च करण्याबाबत टिप्पणी करताना यार्डले इंडिया आणि थायलंडचे सीनियर उपाध्यक्ष आणि बिझनेस प्रमुख श्री. मनीष व्यास म्हणाले, नवीन पॅकेजिंग आणि सुधारित परफॉर्मन्ससह यार्डलेचे जागतिक स्तरावर पुन्हा लॉन्चिंग होत आहे. भारतात, आम्ही टॅल्कम पावडर, साबण आणि हँडवॉश द्वारे सुरुवात केली आहे आणि पाठोपाठ डीओ आणि परफ्यूम देखील रीलॉन्च करणार आहोत.

आमच्या २५४ वर्षांच्या दीर्घ परंपरेचा सन्मान जपत आजच्या स्त्रीला आत्मविश्वासाने पुढे पाऊल टाकण्यास प्रवृत्त करणारी जागतिक दर्जाची उत्पादने देण्याबाबतची आमची वचनबद्धता कायम आहे. ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्स, प्रीमियम पॅकेजिंग आणि व्यापक श्रेणी यांच्या बळावर आम्हाला खात्री वाटते की, उपभोक्ते नवीन यार्डले ऑफरिंगचे प्रेमाने स्वागत करतील.

यार्डले लंडन त्यांच्या नवीन ब्युटी टॅल्क श्रेणीची शालीनता अनुभवण्यासाठी तुम्हाला आमंत्रित करत आहे. निसर्ग-प्रेरित घटक आणि टिकून राहणारा फुलांचा सुगंध यामधून या रेंजची पुनर्कल्पना करण्यात आली आहे. यार्डलेच्या कालातीत लक्झरीने आपले दैनंदिन ब्युटी रुटीन उन्नत करा. ही उत्पादने आता मोठ्या दुकानांमध्ये तसेच यार्डले लंडनच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध आहेत.

## धुमधडाका

### घोडेबाजार

लोकशाहीतील महासंग्रामाचा
अंतिम फैसला निर्विवादपणे झुकला
महायुतीच्या बाजुने
भव्य विजयाने सत्तागड राखला महायुतीने
मविआचे स्वप्न भंगता
खचली अपयशाने
वदंता एकच युतीस बळ दिले,
तारले लाडक्या बहिणीने

■ विजय भदाणे

## वारे निवडणुकीचे

## सोलापूर जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार



**सोलापूर :** एकेकाळी संपूर्ण सोलापूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जायचा. परंतु गेल्या २५-३० वर्षांत हा बालेकिल्ला ढासळत गेला आणि मावळत्या विधानसभेत सोलापुरात काँग्रेसकडे केवळ एकच जागा होती. आता ही एकमेव जागा देखील गमावल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार झाला आहे. सुमारे चार दशके सत्ताकारणात राहिलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या उत्तराधिकारी असलेल्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या 'उद्योगा'मुळे पक्षावर हे गंडांतर आल्याचे आता राजकीय वर्तुळात उघडपणे बोलले जात आहे. यापूर्वी २०१४ आणि २०१९ अशा सलग दोनवेळा सोलापूर लोकसभा निवडणुकीत सुशीलकुमार शिंदे यांना पराभवाचे धक्के बसले होते. योगायोगाने त्यांच्या कन्या प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केल्यानंतर गेल्या लोकसभेत त्या निवडूनही आल्या. परंतु लोकसभा निवडणुकीत त्यांना स्वतःच्या शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून अवघ्या ७९६ इतके तुटपुंजे मताधिक्य मिळाले होते. भाजपने हे मताधिक्य रोखून धरले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची तयारी करताना शिंदे कुटुंबीयांनी पक्षाची ताकद न वाढविता उलट गुंता निर्माण केला. विशेषतः खासदार प्रणिती शिंदे यांची अपरिपक्वता दिसून आली. एकीकडे भाजपचा धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयोग आणि दुसरीकडे एमआयएम पक्षाची घुसखोरी, यातच स्वपक्षातील नाराज मंडळींनी सोडलेली साथ काँग्रेससाठी धोकादायक ठरली. हा धोका दूर करण्याच्या दृष्टीने शिंदे कुटुंबीयांनी गांभीर्याने पावले उचलली नाहीत. भाजपकडून देवेंद्र कोठे हे मोठ्या मतफरकाने निवडून येणे ही बाब सुद्धा शिंदे कुटुंबीयांच्या दृष्टीने जखमेवर मीठ चोळणारी असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे सोलापूर दक्षिण मतदारसंघातही महाविकास आघाडीमध्ये लाथाळ्या वाढल्या. त्याची परिणती काँग्रेसचे अस्तित्वच हिरावून घेणारी ठरल्याचे आता उघडपणे बोलले जात आहे. सोलापूर लोकसभा क्षेत्रात पूर्वी सहापैकी भाजपचे चार आमदार होते. आता ते पाच झाले आहेत. एकट्या मोहोळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने थोडी इभ्रत राखली आहे. काँग्रेसला तब्बल वीस जिल्ह्यात एकही जागा मिळालेली नाही. त्यामुळे काँग्रेसला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे. पक्षाची बांधणी करण्याबरोबरच ग्राऊंड लेव्हलला काम करावे लागणार आहे तरच भविष्यात काही चमक दाखविता येऊ शकेल.

# शरद पवारांची 'पॉवर' जिल्ह्यात फेल

**शरद पवार यांच्या शब्दावर नाशिक जिल्ह्याने १९८५ ला तब्बल १४ आमदार निवडून देण्याची किमया केली होती. त्यामुळे नाशिक आणि शरद पवार हे एक समीकरण दृढ झाले. जिल्ह्यात शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळेच राष्ट्रवादीतील फाटाफुट झाल्यानंतर राष्ट्रवादीचे जिल्ह्यतील सहाही आमदार अजित पवार गटात गेले. परंतु काही मंडळींनी शरद पवारांची साथ संगत करत राष्ट्रवादीची फेर बांधणी केली. त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत जाणवला.**



नाशिक, दिंडोरी आणि धुळे या तिन्ही लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीने एकजिनसीपणाने प्रचार करत मविआचा झेंडा फडकविला. परिणामी विधानसभा निवडणुकीत नाशिक जिल्ह्यात शरद पवार यांच्या पक्षाकडून निवडणूक लढविणाऱ्यांच्या इच्छुकांत मोठी रस्सीखेच निर्माण झाली. एकाच जागेसाठी डझनभर इच्छुक पुढे आले. परंतु आता प्रत्यक्ष निकालानंतर काकांपेक्षा पुतण्याच भारी ठरल्याचे चित्र आहे. आज शरद पवार यांच्या पक्षाला जिल्ह्यात एकही जागा मिळविता आलेली नाही. लोकसभा निवडणुकीत जी पॉवर दिसून आली ती विधानसभा निवडणुकीत कुठे हरविली? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

राष्ट्रवादीतील फाटाफुटीनंतर शरद पवार यांनी नाशिक जिल्ह्यात निफाड, येवला भागाचा दौरा केला. त्यानंतरच्या लोकसभा निवडणुकीत रामकृष्ण हरी वाजवा तुतारी अशी घोषणा सर्वदूर पसरली. परिणामी दिंडोरी मतदार संघात भाजपाच्या केंद्रीय मंत्री असलेल्या भारती पवार यांना नवख्या प्रकाश भगरे यांनी पराभवाची धुळ चारली. तर नाशिकमध्येही राजाभाऊ वाजे यांना ठाकरे गटाने उमेदवारी दिली. आणि राजाभाऊ वाजेंनीही सलग दोन वेळा खासदारकी भोगलेल्या हेमंत गोडसेंचा दीड लाखांहून अधिक मतांनी पराभव केला. शरद पवारांची ही जादू विधानसभेतही कायम राहिल, असे वातावरण नंतर निर्माण झाले. परंतु ही हवा फार काळ टिकली नाही. लोकसभेची जी लाट होती. ती विधानसभेत गायब झाली. सहा जागा असताना त्यांनी पाचच जागांवर उमेदवार उभे केले. त्यातही उमेदवार जाहीर करताना कमालीचा विलंब लावला. शिवाय ज्यांनी पहिल्यापासून पक्षाची धुरा सांभाळली त्यांच्याऐवजी ऐनवेळी पक्षात आलेल्यांना उमेदवारी देत तुतारी फुंकायला लावली. येवला., दिंडोरी, पिंपळगाव, नाशिक पूर्व, सिन्नर या मतदार संघात एकाच दिवशी सभा घेतल्या. या सभांना प्रतिसादही चांगला मिळाला. दिंडोरी आणि येवल्यात आक्रमकपणे भाषण केले. परंतु काकांपेक्षा पुतणे अजित पवार यांचीच पॉवर निकालात दिसून आली. पूर्वी सहाच जागा राष्ट्रवादीच्या होत्या. त्यात इगतपुरीच्या हिरामण खोसकर यांच्यामुळे एकीची भर पडली.येवल्यात जातीय समीकरणे मोठ्याप्रमाणात उफाळून आली. शरद पवारांनी मराठा कार्डाचा वापर केला. परंतु येवल्याच्या जनतेने विकासाला प्राधान्य देत भुजबळांनाच बळ दिले. अवघ्या तीन चार महिन्यातच काकांची पॉवर का ओसरली अशी चर्चा आता जोर धरत आहे.

## महायुतीमध्ये कोणत्या पक्षाला किती मते मिळाली?



विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पारड्यात मतदारांनी भरभरुन मतांचे दान दिले. त्यामुळेच महायुतीला २३४ जागा मिळाल्या. महायुतीमध्ये कोणत्या पक्षाला किती मते मिळाली, ते पुढीलप्रमाणे..

- भाजपाला १ कोटी ७२ लाख ९३ हजार ६५० मते मिळाली.
- दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस असून काँग्रेसला ८० लाख २० हजार ९२१ मते मिळाली
- शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख ९६ हजार ९३० मतं मिळाली.
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ७२ लाख ८७ हजार ७९७ मतं मिळवीली. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने ६४ लाख ३३ हजार १३ मतं प्राप्त केली. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ लाख १६ हजार ५६६ मते मिळाली.

### शरद पवारांचा सर्वात कमी स्ट्राइक रेट

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा यावेळी सर्वात कमी स्ट्राइक रेट पाहायला मिळाला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने १० पैकी ८ जागा जिंकल्या होत्या. तर साताऱ्याची जागा पिपाणी चिन्हामुळे गेली होती. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांचा स्ट्राइक रेट ८० टक्के होता. मात्र विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांचा स्ट्राइक रेट ११.६२ टक्के इतका आहे.

# महायुतीचा विजय म्हणजे 'ईव्हीएम' घोटाळा

## दिनकर पाटील : बॅलेट पेपरवर मतदान होण्यासाठी विरोधकांनी एकत्र यावे

**नाशिक : प्रतिनिधी**

मतदार पाठीशी असताना आमचा पराभव होवूच कसा शकतो? नाशिक पश्चिममध्ये भाजपचा नव्हे तर ईव्हीएम मशीनचा विजय झाला आहे. भाजपसह महायुतीतील पक्षांनी देशातील लोकशाही नेस्तनाबुत करण्यासाठी राज्यात 'ईव्हीएम घोटाळा' केला आहे. याची चौकशी व्हायलाच हवी.

याशिवाय आगामी निवडणूका बॅलेट पेपरवर घ्याव्यात या मागणीसाठी राज्यातील सर्व विरोधी नेत्यांना एकत्र यावे, अशी मागणी माजी नगरसेवक



दिनकर पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.

नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघात मनसेच्या तिकिटावर लढलेल्या दिनकर पाटील यांना तिसऱ्या क्रमांकाची अवघे ४६ हजार ६४९ मते मिळाली. भाजपच्या आमदार सीमा हिरे यांनी तब्बल ६८ हजार १७७ मतांनी विजय साकारत या मतदार संघात हॅट्रीक साधली. मात्र, हा विजय भाजपचा नसून, ईव्हीएम मशीनचा असल्याचा आरोप केला.

पाटील म्हणाले, राज्यात ज्यांचा पराभव अशक्य आहे, अशा अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला. नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघात आमदार सीमा हिरे यांच्याविषयी मतदारांमध्ये प्रचंड नाराजी होती. प्रचारादरम्यान ती आम्हाला दिसून आली. याशिवाय मतदार संघातील सर्व गावांनी मनसेला पाठींबा दिला होता. मतदार संघातील तरुण, महिला, पुरुष ज्येष्ठ हे सर्व पाठीशी असताना, पराभव होणे ही न पटणारी बाब आहे. महायुतीने ईव्हीएम मशीन घोटाळा करून विजय साध्य केला आहे. या विरोधात राज्यातील सर्व विरोधी नेत्यांनी एकत्र येवून आवाज उठवायला हवा. तसेच आगामी निवडणूका या बॅलेट पेपरवर घ्याव्यात ही मागणी लावून धरायला हवी, असेही दिनकर पाटील यांनी स्पष्ट केले.

## विधानसभेत अवघ्या २१ लाडक्या बहिणी



विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. या निवडणुकीत लाडक्या बहिणी गेम चेंजर ठरल्याची जोरदार चर्चा आहे. परंतु प्रत्यक्ष सभागृहात फक्त २१ लाडक्या बहिणी दिसणार आहेत.

यंदा विधानसभा निवडणुकीत एकूण ४ हजार १३६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी २५० च्या जवळपास महिला उमेदवार होत्या. म्हणजेच एकूण उमेदवाराच्या सहा ते सात टक्केच महिलांना संधी मिळाली. आता निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्याही ७ टक्क्यांच्या घरातच आहे. २५० पैकी फक्त २१ महिला उमेदवार विजयी ठरल्या.

यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक १४ महिला उमेदवार जिंकून आल्या असून यामध्ये १० उमेदवारांचा पुन्हा विजय झाला आहे. यामध्ये चिखलीतील श्वेता महाले, जिंतूरमधून मेघना बोर्डिकर, नाशिक मध्यमधून देवयानी फरांदे, नाशिक पश्चिममधून सीमा हिरे, बेलापूरमधून मंदा म्हात्रे, दहीसरमधून मनीषा चौधरी, गोरेगाव येथून विद्या ठाकूर, पर्वतीमधून माधुरी मिसाळ, शेवगावमधून मोनिका राजळे आणि कैजमधून नमिता मुदंडा यांचा समावेश आहे.

भोकरमधील श्रीजया चव्हाण, कल्याण पूर्वमधून सुलभा गायकवाड, वसईममधून स्नेहा पंडित, फुलांब्रीमधून अनुराधा चव्हाण या नव्या महिला उमेदवारांनीही यंदा दणदणीत विजय मिळवला.

साक्रीतून मंजुळा गावित, कन्नडमधून संजना जाधव या शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षातून निवडून आल्या. तर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार) सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली) आणि अनुशक्तीनगरमधून सना मलिक तर, श्रीवर्धमधून आदिती तटकरे यांचा विजय झालाय. तर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने १० महिला उमेदवारांना निवडणूक लढवण्याची संधी दिली होती. परंतु, त्यातील एकही महिला उमेदवाराचा विजय झाला नाही.

# नाशिकमधून मंत्रिमंडळात कुणाला मिळणार संधी?

## दादा भुसे, भुजबळ, फरांदे, कोकाटे, आहेरांच्या नावांची चर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यात महायुतीला पंधरापैकी तब्बल १४ जागा मिळाल्याने आता आगामी मंत्रीमंडळात कुणाची वर्णी जिल्ह्यातून लागते. याकडे लक्ष लागले आहे. मागील मंत्रिमंडळात नाशिक जिल्ह्याच्या वाट्याला दोन मंत्री पदे आणि एक विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळाले होते. आता नवीन मंत्रिमंडळात कुणाला संधी मिळते? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

जिल्ह्यात पंधरा जागांपैकी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला सर्वाधिक सात जागा मिळाल्या आहेत. त्यात दिंडोरीतून नरहरी झिरवाळ, येवल्यातून छगन भुजबळ, कळवणमधून नितीन पवार, सिन्नर माणिकराव कोकाटे, इगतुपरी- हिरामण खोसकर, नाशिकरोड देवळाली सरोज अहिरे. निफाडमधून दिलीप बनकर. शिंदे गटाने तीन जागां लढविल्या परंतु



मालेगाव बाह्यमधून दादा भुसे व नांदगावमधून सुहास कांदे हे दोन उमेदवार विजयी झाले. तर भाजपाने चांदवड, नाशिकपूर्व, मध्य , पश्चिम, बागलाण या जागा मिळविल्या. निवडणुकीच्या रणधुमाळीत अजित पवार यांनी सिन्नर येथील सभेत माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपदाचा शब्द दिला होता. तर चांदवडमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल आहेर यांना मंत्री करू असे सांगितले होते. आता नवीन मंत्रिमंडळात शिंदे गटाकडून दादा भुसे, अजित पवार गटाकडून छगन भुजबळ यांची वर्णी लागू शकते. परंतु भाजपाकडून नाशिकमध्ये देवयानी फरांदे, राहुल आहेर यांच्यापैकी नेमकी कुणाला संधी मिळते? याबद्दल उत्सुकता आहे. आगामी महापालिका निवडणुका व जिल्हा परिषद निवडणुकांबरोबरच येऊ घातलेल्या सिंहस्थामुळे प्रत्येक पक्षाला आपली ताकद दाखविण्यासाठी मंत्रिपदे गरजेची आहेत. त्यामुळे प्रत्येकानेच मंत्रिपदासाठी जोर लावण्याचे काम सुरू केले आहे. मागील वेळेस विस्तारात देवयानी फरांदे यांना संधी मिळेल, अशी चर्चा होती. मात्र, कार्यकाल संपला तरी मंत्रिमंडळाचा विस्तार काही झाला नाही.

यापूर्वी राहुल आहेर यांचे वडील डॉ. डी.एस आहेर यांनी मंत्रिपद भूषविले होते. विद्यमान परिस्थितीत नरहरी झिरवाळ यांना विधानसभा उपाध्यक्षपदापेक्षा मंत्रि होण्याची इच्छा आहे. तशी त्यांनी ती बोलनही दाखविली आहे. जिल्ह्यात भाजपाचे पाच, राष्ट्रवादीचे सात तर शिंदे गटाचे दोन आमदार आहेत. अशा परिस्थितीत मंत्रिपदाची कुणाला लॉटरी लागते? याकडे लक्ष लागले आहे.

# वोट जिहाद विरुद्ध मतांच्या धर्मयुद्धात फरांदेंची सरशी



हिंदु -मुस्लिम बहुल मतदार संघ असलेल्या नाशिक मध्य मतदार संघातील लढत भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी तिसऱ्यांदा जिंकली. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या अल्प आघाडीमुळे हौसले बुलंद झालेल्या मविआचे नेते विधानसभेची लढत आपण आरामात जिंकू या भ्रमात राहिले. परंतु हिंदु बहुल भागाने मतदानाच्या दिवशी दाखविलेल्या मतांची वज्रमुठ भाजपाचे कमळ फुलवून गेली. बटेंगे तो कटेंगे हा नारा मतदार संघात चांगलाच घुमला. शिवाय महाविकास आघाडीकडून निवडणूक प्रचारात ड्रग्जचा मुद्दा जोरकसपणे मांडण्यात आला. परंतु प्रचार संपण्याच्या दोन दिवस अगोदर झालेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वेषाने केलेल्या भाषणाचा नाही म्हणायला चांगलाच परिणाम झाला. लोकसभा निवडणुकीत हिंदु विरुद्ध मुस्लिम असे स्वरुप प्राप्त झाले होते. विधानसभेची निवडणूक जाहीर होताच महाविकास आघाडीकडून उमेदवारीसाठी मोठा घोळ घालण्यात आला. ही जागा पारंपरिकरित्या काँग्रेसची त्यामुळे काँग्रेसने ती मिळविण्याचा प्रयत्न (?) केला परंतु त्याला यश आले नाही. काँग्रेस बरोबरच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीनेही या जागेवर दावा ठोकून पाहिला. परंतु ठाकरे गटाने वसंत गिते यांना उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर काँग्रेसच्या हेमलता पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक लढविण्याची घोषणा केली. अर्जही भरला. परंतु नंतर मात्र माघार घेतली. वसंत गिते आणि देवयानी फरांदे यांच्या या पारंपरिक लढतीत दलित आणि मुस्लिम समाज हा महाविकास आघाडीच्या बाजूने झुकल्याने इतर समाज फरांदे यांच्या पाठीशी राहिल्याचे निकालातून स्पष्ट

**नाशिक मध्य विश्लेषण**

**देवयानी सोनार**

होते. केवळ दलित आणि मुस्लिम समाजाच्या भरवशावरच मविआची मंडळी राहिली. शिवाय लोकसभा निवडणुकीत जो एकजिनसीपणा मविआत होता तो विधानसभेला मात्र, कुठे दिसला नाही. त्यामुळेच फरांदे यांना १,०४,९८६ तर वसंत गिते यांना ८७१५१ मते मिळाली.

महाविकास आघाडीचा उमेदवार असला तरी ठाकरे गटाचीच मंडळी प्रभावीपणे प्रचारात सक्रिय होती. त्यातच वोट जिहादचा मुद्दा प्रचारात आल्यानंतर भाजपाने बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है असे उत्तर दिल्यामुळे हिंदु समाज मोठ्या प्रमाणात जागा झाला. जे चित्र लोकसभेला मतदानाच्या दिवशी पहावयास मिळाले. ते पाहून हिंदु समाज मतदानाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात बाहेर पडला. ड्रग्जमुक्त नाशिक, मराठा समाज बांधवांच्या मुलांसाठी होऊ घातलेले मोठे वसतिगृह आणि विकास या मुद्दयांमुळे फरांदे यांच्या बाजूने वातावरण फिरले. फेक नॅरेटिव्हला मतदार भुलले नाहीत. आणि सलग तिसऱ्यांदा आमदारकीची माळ त्यांच्या गळ्यात पडली. ध्रुवीकरणाचा परिणाम मताधिक्यावर झाला असला तरी शेवटी विजय महत्वाचा, हे तितकेच खरे.

**फेक नॅरेटिव्हला चोख उत्तर**

निवडणूक प्रचारात महाविकास आघाडीकडून फरांदे यांच्याबद्दल ड्रग्जचा मुद्दा चर्चेत आणला गेला. परंतु फरांदे यांनी या आरोपांचे वार लिलया परतून लावतानाच विधानसभेत ड्रग्जच्या विरोधात केलेल्या भाषणांची क्लिप मतदारांपर्यंत पोहोचवून आरोपांची हवाच काढून टाकली.